# मी अनुभवलेला भूगोल

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
क्र.



वा. म. गोगटे

REFBK-0027494

सन्दर्भ
भू-प्रवास
८००
२८४९४
२०।८।९४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
८००
ग्रं. क्र. २८४९४
२०।८।९४
शाखा (स्थळ प्रत)

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

| | |
|---|---|
| 14 SEP 1994 | 28 DEC 1994 |
| 14 DEC 1994 | 25 JAN 1995 |
| 17 SEP 1994 | 15 MAR 1995 |
| 21 SEP 19.. | 24 MAY 1995 |
| 28 SEP 1994 | 31 MAY 1995 |
| 1 OCT 1994 | 16 AUG 1995 |
| 26 OCT 1994 | 2 SEP 1995 |
| ... 199. | 22 FEB ... |
| | 23 MAR 1996 |
| | 23 MAR ... |
| | 8 FEB 1... |

# मी अनुभवलेला भूगोल

# मी अनुभवलेला भूगोल

वा. म. गोगटे

RFFBK-0027494

शुभदा-सारस्वत प्रकाशन, पुणे ५

© १९९४, वा म गोगटे

मी अनुभवलेला भूगोल

IBSN 81-85239--99-1
(Mı Anubhavlela Bhugol)

प्रथमावृत्ती २६ जून १९९४

मुद्रक
श्रीपाद ऑफसेट
नवी पेठ
पुणे ४११ ०३०

प्रथम आवृत्ती २६ जून १९९४

अक्षरजुळणी
ला प्रिंट
१०२५/ब, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

प्रकाशक
शुभदा-सारस्वत प्रकाशन
६७ पाटील इस्टेट
पुणे ४११ ००५

मुखपृष्ठ छपाई
रिंच प्रिंटस्
पुणे ३०

मूल्य रुपये १५०/-

# पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे–४११ ००७

प्रा श्रीधर च गुप्ते
एम एस्सी ,पीएच डी
कुलगुरु

दूरध्वनी
कार्यालय [illegible]
घरचा [illegible]
कुलगुरु निवास [illegible]
टेलेक्स [illegible] UNIP IN
फॅक्स (०२१) [illegible]


आपल्या भोवतालची सृष्टी, नैसर्गिक परिस्थिती, मानव-निसर्ग सबध आणि मानव समूहातील सबध यासारख्या गोष्टींचा अभ्यास प्रामुख्याने भूगोलशास्त्रात केला जातो आपल्या भोवताली आपल्याला दिसणारी परिस्थिती जाणून घेण्यासाठी तसेच निसर्गातील विविधता समजून घेण्याची व त्यादृष्टीने आपले जीवन अधिक सुसह्य करण्याची मानवाची धडपड सतत चालू असते सृष्टीचे, विश्वाचे व आपल्या अस्तित्वाचे गूढ उकलण्याचा प्रयत्न फार पुरातन काळापासून सुरू आहे वेद व उपनिषदाच्या काळात व त्यानतरच्या भारतीय सस्कृतीच्या इतिहासात हा विचार सातत्याने करण्यात येत असल्याचे आढळून येते

श्री गोगटे याना त्याच्या जीवनात भूपृष्ठावरील विविध प्रदेशात वास्तव्य करण्याची सधी मिळाली व प्रत्येक प्रदेशातील वास्तव्यात त्याना आढळलेल्या परिस्थितीचे त्यानी सुदर व सहजपणे वर्णन या पुस्तकात केले आहे भूगोलशास्त्राचा जन्म हा अनुभवातून झालेला आहे प्राचीन व अर्वाचीन काळातील अनेक विद्वानानी आपल्याला प्रवासात आलेल्या अनुभवाच्या केलेल्या नोंदीवरून भूगोलशास्त्रात मोलाची भर पडली आहे आधुनिक भूगोलशास्त्राचा पाया गेल्या शतकाच्या मध्यास जर्मनीमध्ये कार्ल रिटर व अलेक्झाडर व्हॉन हुम्बोल्ट या दोन शास्त्रज्ञानी रचला रिटरने केलेल्या प्रवास वर्णनातून व नोंदलेल्याा माहितीवरून निसर्ग मावनसबधाविषयी लिखाण केले तर हुम्बोल्टने जगातील विविध प्रदेशात प्रवास करून तेथील भौगोलिक परिस्थितीची शास्त्रशुद्ध नोंद केली व त्यावरून निष्कर्ष कादला विविध व्यक्तींनी विविध ठिकाणी विविध परिस्थितील आपणास आलेले अनुभव नोंदविले व त्याची शास्त्रशुद्ध चिकित्सा केली तर निसर्गाचे व निसर्ग-मानव

सबधाचे ज्ञान होण्याबाबत मोलाची भर पडते श्री वा म. गोगटे यानी लिहिलेला 'मी अनुभवलेला भूगोल' हा ग्रंथ याच प्रकारचा प्रयत्न आहे श्री गोगटे यानी विविध देशात त्यांना आलेले अनुभव अत्यंत सोप्या व समजेल अशा भाषेत विदित केले आहेत

या ग्रथाची अनुक्रमणिका वाचल्यावरच लक्षात येते की, भूगोलावरील हे लिखाण करताना निरनिराळ्या प्रदेशात अनुभवलेले विविधतेचे अनेक पैलू वाचकांसमोर माडण्यात आले आहेत इतक्या विविध देशांमध्ये व विविध प्रदेशात राहण्याचा योग फार थोड्या व्यक्तींच्या जीवनात येतो श्री. गोगटे हे अशा भाग्यवतापैकी एक आहेत पण विशेष म्हणजे त्यानी या संधीचा अत्यंत सुयोग्य असा उपयोग केला आहे त्याच्या अनुभवातून त्यांनी दिलेली माहिती मनोरंजक आहेच परतु त्याचबरोबर निसर्गातील व मानवी जीवनातील विविधतेचे सोप्या पद्धतीने विश्लेषण करणारी आहे. शालेय व महाविद्यालयीन पातळीवर भूगोल शिकविणाऱ्या अध्यपकाना विषय अधिक आकर्षक पद्धतीने माडण्यासाठी श्री गोगटे यांनी अनुभवलेल्या भूगोलाचा निश्चितच फायदा होईल असे मला वाटते विशेष म्हणजे जरी काही प्रमाणात तात्रिक माहिती दिली असली तरी वर्णन नीरस होणार नाही याची श्री गोगटे यानी या ग्रथात काळजी घेतली आहे

त्याच्या कन्येच्या स्मृतीला प्रेमाजली म्हणून लिहिलेला श्री. गोगटे याचा हा ग्रथ सुबोध व वाचनीय आहे या लिखाणाबद्दल मी त्याचे मन.पूर्वक अभिनदन करतो आपल्या अनुभवाचे भाडार त्यानी इतरांसाठी या ग्रथात खुले केले आहे व त्याचा वाचकाना निश्चित उपयोग होईल

अनुभवलेल्या भूगोलावरील हा ग्रथ प्रसिद्ध केल्याबद्दल शुभदा सारस्वत प्रकाशनचे श्री गोगटे हे सुद्धा अभिनदनास पात्र आहेत

– श्रीधर गुप्ते
कुलगुरू

दिनाक २३ मे १९९४

# मनोगत

वयाच्या अठराव्या वर्षापासून आजपावेतो पायाला चक्रे लावावीत त्याप्रमाणे निरनिराळ्या कारणामुळे भारतात व इतर जगात बराच प्रवास करण्याचा मला योग आला या प्रवासात निसर्ग सौदर्य, मानवाने परिश्रमाने शोधलेल्या व तयार केलेल्या कलाकृती, जीवन सुसह्य व आनदी व्हावे म्हणून केलेल्या अनेक वस्तूचे व गोष्टींचे अवलोकन करण्याची सधी मिळाली हे करताना भूगोल हा विषय नुसता लिहिण्या-वाचण्यासाठीच नसून प्रत्यक्ष अनुभवण्यासाठीही आहे हे मनाला पूर्णपणे पटले

पृथ्वीभोवती तीन-चार प्रदक्षणा घालताना व सत्तर ऐंशी देशाना भेटी देताना आलेल्या अडचणी, अनुभव, व नाना प्रकारचे लोक, त्याच्या भाषा, वागणुकी, चालीरितींचे प्रत्यक्ष अवलोकन करून व त्यातून मिळणारे ज्ञान व आनद या गोष्टी अगदी औरच आहेत माझी मुलगी अजली हिने म्हटल्याप्रमाणे हे सर्व अनुभव एकत्रीत करून एक आगळेच पुस्तक प्रसिद्ध करून वाचकाचे विचार व दृष्टी अधिक विशाल करता यावी म्हणून हा प्रयत्न केला आहे तो कितपत यशस्वी झाला आहे हे वाचकानीच ठरवावयाचे आहे या प्रवास वर्णनात पर्यटक नेहमी ज्या ठिकाणी जातात त्या ठिकाणचे वर्णन शक्यतो टाळून जेथे फारच थोडे लोक जातात अशाच ठिकाणची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे

लेखकाबद्दलची माहिती पुस्तकाच्या उत्तरार्धात थोडी विस्तारीत प्रमाणात दिली आहे कारण त्यातील काही गोष्टी उद्बोधक आहेत व त्या पुस्तकाच्या मुख्य भागात घालणे जरा अप्रस्तुत वाटत होते

एका मित्राने मला विचारले की आपण इतके प्रवास केलेत व जगातील विचित्र व सुदर ठिकाणे पाहू शकलात तर आपल्या घरी एखादा कल्पवृक्षच तर नाही ना त्या मित्राला जरी मला

# ॥ प्रेमांजली ॥



सौ अजली (गोगटे) दांडेकर

जन्म ३ सप्टेंबर १९५३ मृत्यू १२ डिसेंबर १९९३

फक्त चाळीस वर्षाच्या आयुष्यात अंजलीने नेटका ससार करून पतीसमवेत धद्यात व इतरत्र बरोबरीने काम करून दाडेकर व गोगटे कुटुबियांत आपले स्वत चे एक मानाचे व स्वतत्र स्थान निर्माण केले आहे पुढील आयुष्यात जरी प्रकृतीने योग्य ती साथ दिली नाही तरी त्याचा गवगवा किंवा बाऊ न करता तिने स्वत ची अध्यात्माचीही बैठक तयार केली होती एवढ्या लहान वयात तिने जे जे अनुभवले व इतराना शिकवले ते फारच थोड्याना जमते

आम्हाला सोडून जाण्यापूर्वी अजली म्हणे की,

*''दादा, आपण इतके जगभर हिंडलो, प्रवास केले, देशात व परदेशात ठिकठिकाणी बिऱ्हाडे करून राहिलो, तुम्ही तर ७०-८० देशात जाऊन आलात, तर आपल्या अनुभवावर आधारीत एखाद नवीन तऱ्हेच असं पुस्तक लिहा की ज्या योगे वाचकाना बाहेरील जगाची माहिती तर होईलच पण त्याचा दृष्टिकोन आणि वृत्तीही विशाल होईल ''*

अशा विचाराने उशीरा का होईना हे छोटेसे पुस्तक लिहीत आहोत व प्रेमभराने अजलीच्या स्मृतीस अर्पण करीत आहोत

पुणे
१२ जून १९९४

वा म गोगटे
सौ नलिनी गोगटे

समाधानकारक उत्तर देता आले नाही तरी या सर्व गोष्टी कशा जुळल्या व जुळवून आणल्या याचा उलगडा मात्र हे पुस्तक वाचून सर्वांस होईल असे वाटते

हे पुस्तक सर्वसामान्य जिज्ञासू वाचकाना व ज्या तरुण पिढीचे लक्ष आता सर्व जगाकडे लागले आहे त्यांना निश्चित आवडेल असा विश्वास आहे शिवाय भूगोल विषयाच्या सर्व थरातील विद्यार्थ्यांना व त्या विषयाच्या अभ्यासूना हे पुस्तक विशेष उपयोगी ठरेल अशी आशा आहे

या पुस्तकाला पुणे विद्यापीठाचे कुलगुरू व भूगोल विषयाचे विशेषज्ञ व गाढे अभ्यासू डॉ श्रीधर गुप्ते यांनी प्रस्तावना लिहून सुंदर मखमली झालर लावली आहे ज्यांना दिवसातून अठरा तासांपेक्षा जास्त वेळ जबाबदारीचे काम करावे लागते अशा श्रेष्ठ व्यक्तीने माझ्या विनतीला मान देऊन, वेळात वेळ काढून, ही सुंदर प्रस्तावना लिहिली त्याबद्दल मी त्यांचा शतशः आभारी आहे

या पुस्तकाचे हस्तलिखित उत्तम अक्षरात मनलावून लिहिल्याबद्दल कु. वैशाली भावे, शुद्धलेखन तपासून उपयुक्त सूचना दिल्याबद्दल शशिकला दाते व सुदर रेखाचित्रे काढून पुस्तकाची सजावट वाढवण्यासाठी मेधा चक्रदेव हिने अमोल सहाय्य केल्याबद्दल मी या सर्वांना धन्यवाद देत आहे शुभदा सारस्वतचे श्री शरद व शुभदा गोगटे यांनी या पुस्तकाची व्यवस्थित मांडणी करून ते थोड्याच वेळात प्रसिद्ध केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. माझी पत्नी सौ नलिनी हिने दिलेले सहकार्य व उपयुक्त सूचना यामुळेच हे पुस्तक लिहिण्याचे कार्य माझ्या हातून होत आहे याची जाणीव मला पूर्णपणे आहे हे नमूद करावेसे वाटते

शेवटी सर्व वाचकांना हे पुस्तक वाचून ज्ञान मिळून आनद होवो हीच प्रार्थना

**– वा. म. गोगटे**

अमोल अपार्टमेंट
कमला नेहरु पार्क
पुणे - ४११००४
(टे नं ३३२२७७)

## ॥ प्रेमांजली ॥



सौ अजली (गोगटे) दाडेकर

जन्म ३ सप्टेंबर १९५३ मृत्यू १२ डिसेंबर १९९३

फक्त चाळीस वर्षांच्या आयुष्यात अंजलीने नेटका ससार करून पतीसमवेत धद्यात व इतरत्र बरोबरीने काम करून दाडेकर व गोगटे कुटुबियात आपले स्वत चे एक मानाचे व स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे पुढील आयुष्यात जरी प्रकृतीने योग्य ती साथ दिली नाही तरी त्याचा गवगवा किंवा बाऊ न करता तिने स्वत ची अध्यात्माचीही बैठक तयार केली होती एवढ्या लहान वयात तिने जे जे अनुभवले व इतरांना शिकवले ते फारच थोड्यांना जमते

आम्हाला सोडून जाण्यापूर्वी अजली म्हणे की,

*''दादा, आपण इतके जगभर हिंडलो, प्रवास केले, देशात व परदेशात ठिकठिकाणी बिऱ्हाडे करून राहिलो, तुम्ही तर ७०-८० देशात जाऊन आलात, तर आपल्या अनुभवावर आधारीत एखाद नवीन तऱ्हेच अस पुस्तक लिहा की ज्या योगे वाचकाना बाहेरील जगाची माहिती तर होईलच पण त्याचा दृष्टिकोन आणि वृत्तीही विशाल होईल ''*

अशा विचाराने उशीरा का होईना हे छोटेसे पुस्तक लिहीत आहोत व प्रेमभराने अजलीच्या स्मृतीस अर्पण करीत आहोत

पुणे
१२ जून १९९४

वा म गोगटे
सौ नलिनी गोगटे


# मी अनुभवलेला भूगोल

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | हवामान | १ |
| २ | नकाशावरील रेषा – अक्षांश-रेखांश | ९ |
| ३ | पर्वत व ज्वालामुखी | १९ |
| ४ | जलसपत्ती | २७ |
| ५ | समुद्र व महासागर | ३९ |
| ६ | समुद्र किनाऱ्यावरील प्रेक्षणीय ठिकाणे | ५१ |
| ७ | भूगोलाचे आधुनिक पैलू | ७१ |
| ८ | धार्मिक स्थळे | ८९ |
| ९ | दक्षिण अमेरिका व तेथील वास्तव्य | ९७ |
| १० | आणखी भ्रमती | ११३ |
| ११ | अनपेक्षित भेटलेल्या व्यक्ती | ११९ |
| १२ | भूगोल प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी (थोडे आत्मचरित्र) | १३१ |

# १. हवामान

- बदलते तापमान
- हवामानाचा अंदाज



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रमांक
दा. क्र.
ग्रंथ ... (रजि.)

# हवामान

''हिवाळा, उन्हाळा, पुन्हा पावसाळा'', ''नेमेचि येतो मग पावसाळा'', ''श्रावण मासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहीकडे'', ''वसत वनात, मनात हासे, सृष्टीदेवी जणू नाचे उल्हासे,'' या आणि अशा प्रकारची ऋतुवर्णने असलेल्या कितीतरी कविता मराठीत आणि इतरही भाषामध्ये आहेत बदलत्या ऋतुमधल्या बदलत्या सृष्टीसौंदर्याचे वर्णन अशा कवितामध्ये असते आपल्या देशात उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे तीन मुख्य ऋतू आपल्या अनुभवाला येतात याचेच वसत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमत, शिशिर असे उपविभाग ही आपल्याला माहीत असतात पण जगात सगळीकडे असेच हवामान नसते त्यात पुष्कळ विविधता असते

## बदलते तापमान

जगभरच्या हिंडण्यामध्ये आम्हाला ठिकठिकाणच्या वास्तव्यात बदलत्या हवामानाला कसे तोंड द्यावे लागत होते ते पहा प्रथम आमच्या अनुभवाला आलेले आपल्या देशातले हवामान पाहू.

पुण्यात थडीमध्ये कमीतकमी तापमान ३°-४° से व उन्हाळ्यात ४०-४२° से पर्यंत जाते थडीत गरम कपडे व उन्हाळ्यात पखे लावून आम्ही या तापमानावर मात करीत असतो रेल्वे मध्ये नोकरी करताना माझी बदली झाशी, भुसावळ येथे झाली तेथे उन्हाळ्यात तापमान ४५° से पर्यंत जाई तेथे मात्र वाळ्याच्या पडद्याची अगर पाण्याच्या कूलरची जरूरी भासे थडीमध्ये दगडी कोळशाची शेगडी किंवा हीटर वापरीत होतो दिल्लीमध्ये याशिवाय एअरकडिशनरची सोय

होती विशेष म्हणजे या सोयी फक्त एक, दोन खोल्यापुरत्याच घरात बाकी ठिकाणी असह्य परिस्थितीच !

अमेरिकेत जेव्हा न्यूयॉर्क, बोस्टन, नायगारा इकडे जानेवारी-फेब्रुवारीत जात होतो तेव्हा सर्वत्र हिमपात होत असे. तेव्हा तापमान -१५° ते -२०° से पेक्षाही खाली जात असे. तेव्हा मात्र घरे, हॉटेल्स्, सुपर मार्केटस् या ठिकाणी शेगड्या, Room-Heaters नी काम चालू शकत नसे. तेथे सर्व ठिकाणी Central-Heating चीच अत्यंत जरूरी असे

जेव्हा आमची बदली ओमानमध्ये झाली तेव्हा उन्हाळ्यात ४८-५० डिग्री तापमान होई. तेव्हा सारखे एअर कंडिशनर चालू असत

हवामानाच्या बाबतीत दक्षिण अमेरिकेत पेरूची राजधानी **'लीमा'** हे एक आगळेच ठिकाण आहे. एका युनोच्या सेमिनारसाठी मला येथे जुलैमध्ये दोन आठवडे राहाण्याचा प्रसग आला होता **तेथील अक्षांश १२° दक्षिणेला** असून समुद्राच्या किनाऱ्यावरच हे शहर वसलेले आहे तसे पाहिले तर येथील हवा मद्रासप्रमाणे उष्ण पाहिजे, पण वास्तवत· येथे हवामान पूर्णपणे निराळेच आहे येथे वर्षातील ९ महिने आकाश ढगाळलेले असून सूर्यदर्शन क्वचितच घडते. वर्षातून फक्त २ ते ३ इंच पाऊस पडतो व थडीत म्हणजे- जुलै-ऑगस्ट मध्ये ओव्हर कोट घालण्याइतकी पण ओली थडी असते हवेत दमटपणा इतका असतो की भितीवर हात ठेवला तर हाताच्या पजाची आकृती स्पष्टपणे तयार होते. अशा विचित्र हवामानाचे कारण म्हणजे **हुंबोल्ट** नावाचा समुद्रातील शीत प्रवाह पेरूच्या किनाऱ्याजवळून जातो व त्याचा येथील हवामानावर नित्य परिणाम होत असतो

आणखी एका आश्चर्यकारक ठिकाणाला भेट देण्याचा व काही कामानिमित्त तेथे ३-४ दिवस राहाण्याचा मला योग आला ते ठिकाण म्हणजे- इक्वाडोरची राजधानी **क्विटो.** हे शहर अगदी विषुववृत्तावरच आहे म्हणून तेथील हवा


सिंगापूरप्रमाणे गरम असावयास पाहिजे पण प्रत्यक्षात येथे अगदीच वेगळे हवामान आहे हे शहर ८५०० फूट उचीवर अँडीज पर्वताच्या पठारावर वसलेले आहे येथे सकाळी सूर्योदयापासून दुपारी १२ वाजेपर्यंत उन्हाचे अगदी चटके बसतात इतक्या उचीवर हवेत धूलीकण नसल्यामुळे उन्हाची तिरीप फारच तीव्र असते सावलीत मात्र एकदम थड असते दुपारी १२ नतर आकाशात ढग जमू लागतात व पुढील तीन तासात सर्वत्र मेघ जमून गर्जना सुरू करतात. दुपारी ४ च्या सुमारास अगदी जोरात पाऊस पडतो व सध्याकाळी आकाश निरभ्र होते सूर्यास्तानतर थडी पडू लागते आणि रात्री ८-९ वाजल्यानतर ओव्हरकोट घातल्याशिवाय बाहेर पडताच येत नाही अशीच रात्रभर थडी । म्हणजे क्विटो हे विषुववृत्तावर असून सुद्धा उन्हाळा, पावसाळा व हिवाळा या सर्व ऋतूचा अनुभव आठवड्यातले ३-४ दिवस तरी येत असतो.

असे आणखी कितीतरी हवामानाचे अनुभव प्रवास केल्यावर माणसाला येत असतात

## हवामानाचा अंदाज


हवामान व त्याचा अदाज हा एक चर्चेचा व कुचेष्टेचा विषय जगभर झालेला आहे युरोपमध्ये विशेषत इग्लंडमध्ये दोन माणसे भेटल्यावर औपचारिकरित्या प्रथम हवेविषयी बोलतात हे आपल्या भारतीयाना प्रथम काहीसे कृत्रीमपणाचे वाटते कारण आपल्याकडे ठराविक ऋतू म्हणजे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा हे आहेत व त्या ऋतूमध्ये बहुधा ठराविक हवाच असते त्यामुळे या विषयी प्रत्येकवेळी आपण बोलत नाही इग्लडमधील हवा मात्र नेहमी बदलत असते. काही वेळा ढगाळ, तर नतर स्वच्छ ऊन, नतर रिमझिम पाऊस, तर एकदम सोसाट्याचा वारा अशी हवामानातील स्थित्यतरे नेहमीच घडत असतात त्या हवेची तुलना पुष्कळदा स्त्रियाच्या विशेषत सुदर

# पृथ्वीवरील हवामानाचे विभाग
# व ऋतु संक्रमण
## (दक्षिणोत्तर रेषा रेखांश, पूर्वपश्चिम रेषा-अक्षांश)



# २. नकाशावरील रेषा : अक्षांश-रेखांश

- रेखांश, ग्रिनीच मीन टाईम
- अक्षांश
- विषुववृत्त – महत्त्व आणि कौतुक
- भूस्थिर कक्षा
- इंटरनॅशनल डेटलाइन




दक्षिण-उत्तर गोड मिलाफ

# नकाशावरील रेषा : अक्षांश-रेखांश

माणसाची भूगोलाची जवळीक नकाशामुळे होते व नकाशाची जवळीक त्यावरील काढलेल्या रेषामुळे म्हणजे **अक्षांश-रेखांश** याच्या रेषामुळे होत असते अमुक एक गाव, या विशाल पृथ्वीच्या पाठीवर नेमके कुठे आहे ते त्या ठिकाणच्या अक्षाश-रेखाशावरून पट्कन शोधता येते या सर्व रेषा जरी काल्पनिक असल्या तरी त्या काढल्याशिवाय नकाशा पूर्ण होऊच शकत नाही

## रेखांश (Longitude)

भूगोलकारानी सर्व पृथ्वी ३६० अंशात दक्षिणोत्तर रेषानी विभागली असून त्यातील मध्य म्हणजे ० अशाची रेषा इग्लडमधील **ग्रिनीच** या गावातून जाते या ठिकाणाच्या पश्चिमेला १८० अशात्मक व त्याचप्रमाणे पूर्वेलाही १८० अशात्मक रेषा काढल्या जातात जगाचे पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध या ग्रिनीच रेषेने विभागले आहेत ग्रिनीच हे गाव **'टेम्स'** नदीवर लडनपासून फक्त १५ मैलावर असून तेथे **रॉयल ऑब्झर्व्हेटरी** आहे त्यातूनच ही **मेरिडिअनची** रेषा जाते तेथील रेखाश ०°-०'-०" आहे

## ग्रिनीच मीन टाईम (G M T)

ही शून्य डिग्रीची रेषा म्हणजे मेरिडिअन प्रमाण धरून जगातली सर्व घड्याळे लावलेली असतात याचे गणित अगदी सोपे आहे ग्रिनीचपासून आपण पूर्वेकडे जाल तर दर १५ अशाला घड्याळ १ तास पुढे करावे लागते भारताची प्रमाण रेषा अलाहाबाद जवळ म्हणजे ८२।। (पूर्व) या रेषेवर धरली आहे म्हणून आपले घड्याळ इग्लडपेक्षा ५।। तास पुढे असते

न्यूयॉर्क ग्रिनीचच्या पश्चिमेला ७४ अंशावर आहे म्हणून तेथील घड्याळ ५ तास मागे असते. थोडक्यात म्हणजे इंग्लंडमध्ये जेव्हा दुपारी बारा वाजतात तेव्हा आपल्याकडे संध्याकाळचे ५॥ वाजतात व न्यूयॉर्कला सकाळचे ७ च वाजलेले असतात. बऱ्याचशा राष्ट्रांना या बाबतीत इंग्लंडचे हे नाम-वर्चस्व सहन होईना म्हणून काही किरकोळ तांत्रिक सबबी पुढे करून G M T चे नाव U T (Universal Time) असे बदलले आहे.

दुसऱ्या महायुद्धापर्यंत मुंबईतील क्रॉफर्डमार्केटचे घड्याळ आणि मुंबई नगरपालिकेची कार्यालये भारतीय स्टँडर्ड टाईमच्या ३९ मिनिटे मागे असत कारण पालिका आपली घड्याळे मुंबईच्या रेखांशाप्रमाणे (७२॥ डिग्री) लावीत असे उलट कलकत्ता शहरातील सर्व व्यवहार नगरपालिकेच्या वेळेप्रमाणे स्टँ. टा पेक्षा २४ मिनिटे लवकर सुरू होत असत हावरा स्टेशनवरून गावात जाताना दर खेपेला २४ मिनिटे घड्याळ पुढे करावे लागत असे. कारण रेल्वेची घड्याळे स्टँ.टा प्रमाणे चालत असत या सर्व गोंधळाचे कारण म्हणजे स्थानिक लोक आपल्या लोकल टाइम प्रमाणे व्यवहार करीत एके दिवशी भारत सरकारने एक फतवा काढून देशातील सर्व घड्याळे स्टँ. टा प्रमाणेच चालतील असा ठराव केला व देशभर भारतीय स्टँ टाईमची पद्धत सुरू झाली

## अक्षांश (Latitude)

सर्व अक्षांश विषुववृत्त ०° प्रमाण धरून आखले आहेत. या ०° रेषेपासून (म्हणजेच विषुववृत्तापासून) उत्तरेकडे उत्तर गोलार्ध व दक्षिणेकडे दक्षिण गोलार्ध अशी जगाची विभागणी होते रेखांशाप्रमाणे प्रत्येक गोलार्धात १८०° नसून फक्त ९०°च आहेत म्हणजे उत्तर गोलार्धात ९०° व दक्षिण गोलार्धात ९०° असतात उत्तरेकडील ९०° बिंदूस 'उत्तरध्रुव' व

दक्षिणेकडील ९०° बिंदूस 'दक्षिणध्रुव' मानतात पृथ्वी गोलाकार असल्यामुळे अक्षाशाच्या रेषा सरळ नसून ही सर्व वर्तुळे आहेत याचा अर्थ विषुववृत्त म्हणजे एक सरळ रेषा नसून सुमारे ८००० मैल व्यासाचे हे एक वर्तुळच पृथ्वीभोवती कबरपटया प्रमाणे काढले जाते. जसजसे आपण या वर्तुळापासून उत्तरेकडे जातो तसतसे ही वर्तुळे लहान होत जाऊन त्याचा व्यासही कमी कमी होत जातो शेवटी हा व्यास इतका कमी होतो व वर्तुळ इतके लहान होते की ते एका ठिपक्याप्रमाणेच दिसते हा ठिपका म्हणजेच ''उत्तरध्रुव''

तसाच प्रकार दक्षिण गोलार्धाचाही आहे व दक्षिणेकडील ठिपका म्हणजे ''दक्षिणध्रुव''

खरे पाहिले तर हे शास्त्र इतके सखोल आहे की ते समजण्यासाठी स्वतंत्र अभ्यासच करावा लागेल जर एखादे ठिकाण नकाशात कुठे आहे हे दाखवायचे असेल तर तेथील अक्षाश व रेखाश देण्याची जरूरी असते

## विषुववृत्त - महत्त्व आणि कौतुक.

विषुववृत्ताची म्हणजे ०° अक्षाश ही रेषा जगातील आठ देशातून जाते त्यातील बहुतेक भाग खडकाळ आणि दाट जगलाचाच आहे व रेषेचा उरलेला भाग अटलाटीक, पॅसिफिक आणि हिंदी महासागरातून जातो जरी ही एक काल्पनिक रेषा आहे तरी देखील इक्वाडोरमधील **क्विटो** राजधानी पासून १४ किलोमीटर अतरावर, जेथून ही रेषा जाते, तेथे तिथल्या सरकारने एक-दोन इच रूदीची पाढरी रेषा आखली आहे व त्यावर ०° - ०' - ०" अशी पाटीही लावली आहे येथेच पृथ्वी उत्तर गोलार्धात व दक्षिण गोलार्धात विभागली जाते ज्या गृहस्थाने ही जागा शोधून काढली त्याचे एक स्मारकही या ठिकाणी पहावयास मिळते पर्यटकाना रोमँटिक वाटावे म्हणून युगुलातील स्त्री या रेषेच्या एका बाजूस व पुरुष दुसऱ्या बाजूस


उभे राहून चुंबन घेताना फोटो काढून घेतात व त्यावर ''दक्षिणोत्तर मिलाप'' अशी अक्षरे छापून घेतात हे ठिकाण समुद्रसपाटीपासून ८५०० फूट उंचीवर असल्यामुळे सदैव थंडच असते येथून अँडीज पर्वतावरची कोटोपॅक्सि व चिंबोराझो ही १७- १८ हजार फूट उंचीची बर्फाच्छादित शिखरे उन्हात तळपताना दिसतात हा देखावा अगदी मनोरम व रमणीय वाटतो यावरून निसर्ग किती सुंदर आहे व मोठा आहे याची कल्पना येते

## भूस्थिर कक्षा (Geostationary Orbit)

विषुववृत्ताच्या उत्तरेकडील देशात जेव्हा थंडी असते तेव्हा दक्षिण गोलार्धात उन्हाळा असतो, हे सर्वांना परिचित आहेच जरी विषुववृत्तावर वर्षातील सर्व ऋतु सारखेच असतात असे म्हणतात तरी देखील जेव्हा पृथ्वी सूर्याकडे किंवा सूर्यापासून दूर कलते तेव्हा येथेही ऋतूंत थोडासा बदल होतोच

अलीकडे गेल्या २५ वर्षांत विषुववृत्त व त्यावरील हवेतील पोकळी याला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. विषुववृत्तावर २२,३०० मैल उंचीवर जी पोकळ जागा आहे तिला Geostationary Orbit म्हणतात तेथे जे उपग्रह पाठविलेले असतात ते पृथ्वीभोवती पृथ्वीच्याच वेगाने फिरत असतात म्हणून सापेक्षतेने ते स्थिर आहेत असे समजले जाते उदाहरणार्थ भारताचा इनसॅट २ब हा उपग्रह भूस्थिर कक्षेत २२ ३०० मैलावर जरी एका जागी स्थिर आहे असे वाटले तरी तो देखील कायम पृथ्वीच्याच गतीने फिरत असतो आणि त्याचे लक्ष फक्त भारतावरच असते

भारताचा इन्सॅट २ ब व त्या आधी इन्सॅट मालिकेतील पाठविलेले उपग्रह शिवाय इंटलसॅट, स्टार टी व्ही वगैरे उपग्रह याच कक्षेत आपापली जागा घट्ट धरून बसलेले दिसतात जर आपल्याला एखाद्या रॉकेटमधून त्या कक्षेच्या वर्तुळातून चक्कर



विषुववृत्तावर उभारलेल्या स्तंभापाशी श्री बा म गोगटे (पृष्ठ १३)

मारता आली तर ही सर्व उपग्रह मडळी दाटीदाटीने एखाद्या भोजन पक्तीस बसलेली आहेत असे दिसून येईल प्रत्येक उपग्रहाची जागा मात्र आतरराष्ट्रीय करारानुसार निश्चित केलेली असते आता येथे नवीन उपग्रहासाठी जागा मिळणे फारच मुश्किल झाले आहे हे उपग्रह खरे तर स्थिर नसतातच पण ते पृथ्वी इतक्याच गतीने फिरत असल्यामुळे तुलनात्मक दृष्टीने ते स्थिर वाटतात

प्रत्येक देशाचा भूभाग जसा स्वत·च्या मालकीचा असतो तसेच त्यावरील आकाशातील पोकळीही त्याच्याच मालकीची असते असे कायदा म्हणतो याचा अर्थ असा की ज्या आठ राष्ट्रातून विषुववृत्त जाते त्याच राष्ट्राचा वरील पोकळीवर सार्वभौम हक्क आहे. म्हणजे त्या विशिष्ट कक्षेमध्ये जे इतर राष्ट्राचे उपग्रह बसलेले असतील त्यांना जबर भाडे आकारले जाईल असे या राष्ट्राचे म्हणणे आहे हा वाद कदाचित पुढे रगेल असे वाटते !

## इंटरनॅशनल डेट लाईन : (आंतरराष्ट्रीय दिन रेषा)

जेव्हा आपण पश्चिमेकडून पूर्वेकडे जातो तेव्हा नकाशावर रेखाशाची सख्या वाढत जाते ती वाढता वाढता १८० अशापर्यंत जाते. या ठिकाणी एक काल्पनिक रेषा उत्तरेकडून दक्षिणेकडे काढली जाते या रेषेला (१८० अशाची रेषा) ‘आतरराष्ट्रीय दिन रेषा’ म्हणतात तेथून पुढे आणखी पूर्वेकडे गेलो तर नंतर १७०-१६० असे अंश कमी कमी होत शेवटी ग्रिनीचला ० अशापर्यंत आपण पोहोचतो

मात्र ज्यावेळी ही १८० अशाची रेषा आपण ओलांडतो तेव्हा मात्र दिवस किंवा तारीख बदलते समजा, या रेषेच्या पश्चिमेला सोमवार, तारीख ७ हा दिवस असेल तर ही रेषा पार केल्यानतर पूर्वेला रविवार ता ६ हा दिवस असतो म्हणूनच जपानहून सोमवारी सकाळी निघालेले विमान हवाईला

रविवारी म्हणजे आदल्या दिवशीच पोहोचते या उलट हवाईहून बुधवारी निघालेले विमान जपानला आठ तासाचा प्रवास करून शुक्रवारी पोहोचते गुरुवारचा दिवस लुप्तच होतो .

काही वर्षांपूर्वी "Around the world in 80 days" नावाचा डेव्हिड निव्हेन व कँटीन फ्लास्क यानी काम केलेला प्रसिद्ध सिनेमा आपण पाहिला असेल. त्या सिनेमात डेव्हिड निव्हेन लडनहून ८० दिवसात पृथ्वी प्रदक्षिणा करण्याची पैज मारून आपल्या क्लबमधून निघतो त्याचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेला होत असतो जसजसा तो रेखांशाप्रमाणे पुढे जात असतो त्याप्रमाणे तो आपले घड्याळ दर १५ अशाला एक तास याप्रमाणे पुढे करीत असतो तो भारतात अलाहाबाद, कलकत्ता वगैरे ठिकाणे पार करून पुढे पूर्वेला जपानवरून अमेरिका पार करून इंग्लडला पोहोचतो त्या दिवशी त्याच्या कॅलेंडर व घड्याळाप्रमाणे ८१ दिवस झालेले असतात व त्याला वाटते की तो पैज हरला सर्व गणिते इतकी बरोबर करून सुद्धा त्या अत्यत आढ्यतेच्या गृहस्थास पैज हरल्याची नामुष्कीची वेळ आल्यामुळे अत्यत वाईट वाटते


त्याच्या क्लबमधल्या लोकाना तो इग्लडमध्ये आल्याचे समजलेले असते व त्याने पैज जिकल्याबद्दल त्याचे अभिनदन करण्यासाठी सर्व लोक जमलेले असतात जेव्हा तो क्लबवर हिरमुसलेला चेहरा करून येतो तेव्हा आपली कुचेष्टा होणार म्हणून त्याला खात्री वाटत असते पण पाहातो तो अगदी उलटाच प्रकार पैज जिकल्यामुळे त्याच्यासाठी आणलेले हार-तुरे पाहून तो अगदी बुचकळ्यात पडतो समोरच्या मोठ्या कॅलेंडरवरील वार व तारीख पाहतो तो त्याला आश्चर्य वाटते ताबडतोब तो आपल्या खिशातील कॅलेंडरवरची वार व तारीख पाहतो या दोन्हीमध्ये एक दिवसाची तफावत ! असे का घडले याची फोड तेथे जमलेल्यापैकी एका भूगोल शास्त्रज्ञाने डेव्हिड निव्हेनला एकच प्रश्न विचारून केली त्याने विचारले की, ''तू जेव्हा

१८०° रेखाशाची रेषा ओलांडलीस तेव्हा कॅलेंडवरची तारीख एक दिवस मागे सरकवलीस का ?'' त्याने जेव्हा नाही म्हटले तेव्हा सर्व कोडे उलगडले व अशा तऱ्हेने त्याने पैज जिकली

ही १८० अंशाची रेषा उत्तरेकडून दक्षिणेकडे अगदी सरळ काढलेली नाही, तर काही ठिकाणी म्हणजे सैबेरियाच्या बेटाजवळ ती १० अश पूर्वेला जाते व नतर सरळ होते पुढे खाली आल्यावर न्यूझीलंडच्या पूर्वेला पुन्हा ॲल्युशन बेटाजवळ थोडी पूर्वेला सरकते हे असे करण्याचे कारण म्हणजे त्या देशाना आपल्याच देशात या रेषेमुळे दिवस बदलणे गैरसोईचे वाटते म्हणून त्यांनी इतर राष्ट्राच्या समतीने ही रेषा थोडी वाकडी-तिकडी करून घेतली आहे


❖


# मध्य अमेरिका



# ३. पर्वत व ज्वालामुखी

- हिमालय दर्शन
- माऊंट एव्हरेस्ट
- आल्प्स् आणि अँडीज
- वाळवंटातील डोंगर
- वाळूचे रंग
- ज्वालामुखी






## ३. पर्वत व ज्वालामुखी

- हिमालय दर्शन
- माऊंट एव्हरेस्ट
- आल्प्स् आणि अँडीज
- वाळवंटातील डोंगर
- वाळूचे रंग
- ज्वालामुखी

# पर्वत व ज्वालामुखी

प्रत्यक्षात जरी डोंगर, पर्वत चढण्यापर्यंत माझी मजल गेली नसली तरी ते पाहून त्याच्या सौंदर्याचा आनद लुटण्याची मात्र मला मनापासून आवड आहे लहानपणी कऱ्हाडजवळ आगाशिवाचा डोंगर आहे तो अर्धाअधिक पायी चढल्याचे फक्त आठवते

भूगोल शिकताना ठिकठिकाणचे डोंगर व पर्वत, त्याची लाबी, रूदी, उची, त्यातील उच शिखरे, त्यातून उगम पावणाऱ्या नद्या याचा अभ्यास आपण प्रथम करतो नतर त्यापासून होणारे देशाचे फायदे व तोटे, त्यावर बाधलेली थड हवेची ठिकाणे, त्यावर काढलेली चहा, कॉफीसारखी पिके, पर्यटकासाठी बाधलेल्या सुविधा, तारेवरचे पाळणे वगैरे पैसा मिळविण्याची व पैसा खर्च करण्याची साधने असलेला आधुनिक भूगोल आपण वाचतो सिने निर्माते, दिग्दर्शक, तर या निसर्ग सौंदर्याचा भूगोल आपल्या रीतीने दररोज चितारतात व कित्येक दुर्दम्य ठिकाणाचे प्रत्यक्ष दर्शन टी व्ही सिनेमा द्वारे थेट आपल्या दिवाणखान्यात घडवितात हे सर्व जरी सुखासुखी घरबसल्या पाहता येत असले तरी प्रत्यक्षात पहाणे, त्यावरील स्वच्छ व थडगार हवेचा श्वास घेणे या गोष्टींची मजा अगदी वेगळीच आहे

माझ्या जगपर्यटनात जे जे मी भूगोलात वाचत होतो त्यातील काही भाग प्रत्यक्ष मी कसा अनुभवला ते पुढे देत आहे.

दक्षिण भारतातील सह्याद्री, विध्य, सातपुडा याच्या मानाने निलगिरी हा सर्वात उच पर्वत त्या पर्वतावरील उटकमड हे ठिकाण अतिशय रमणीय म्हणून प्रसिद्ध आहे उटी या नावाने ते ओळखले जाते त्याचे मूळ नाव ''उदकमडलम्'' आहे आणि आता अधिकृत रीत्या ते नकाशामध्येही उदकमडलम् या नावाने

दाखवले जाते खूप वर्षांपूर्वी म्हणजे १९४६ मध्ये श्री वा. काळे व आमच्या सौ याच्या समवेत उटीवरील दोडाबेट्टा (उंची-८०००फूट) या ठिकाणी गेल्याचे मला आठवते.

## हिमालय दर्शन

उत्तर हिंदुस्तानात हिमालय एवढा मोठा पसरला आहे की त्याच्या वरची शिखरे व पर्यटक स्थाने अगणित आहेत आम्ही सहराणपूरला रहात असताना (१९४८-४९ मध्ये) आमच्या घरातून व टेनिस कोर्टावरून आम्हाला हिमालयाची हिमाच्छादित राग नेहमी दिसत असे व त्या अद्वितीय सौंदर्याची बहार वाटे परतु त्यावरून येणारा अतिथड वारा जेव्हा प्रत्यक्ष हाडात शिरत असे तेव्हा हे सौंदर्य आता पुरे असेच वाटे. मसूरी, दार्जिलींग, गँगटोक वगैरे ठिकाणी भेटी देऊन आम्ही आमची थोडीफार हौस भागवून घेतली परतु हिमालयाची खरी उच्च शिखरे कधी पाहाता येतील की नाही याबद्दल मात्र रूखरूख लागत असे.

पुढे काही वर्षांनतर म्हणजे १९७७ साली हा योग जुळून आला. युनोतर्फे माझी नेपाळमध्ये दीड महिन्यासाठी नेमणूक झाली नेपाळ हा देश निसर्गसौंदर्याने अगदी ओतप्रोत भरलेला आहे म्हणून ही नेमणूक आम्हाला फारच आवडली त्यातल्या त्यात आम्हाला महाशिवरात्रीला पशुपतीनाथाचे अगदी जवळून दर्शन झाले व त्या देवस्थानातील पुजाऱ्याने आमची रूद्राक्षाची एक माळ, शकराच्या पिंडीवर घालून आम्हाला बहाल केली त्यामुळे आम्ही दोघेही स्वत ला नशिबवान समजून खूष झालो

## ''माऊंट एव्हरेस्ट''

''माऊट एव्हरेस्ट'' म्हणजे हिमालयातीलच नव्हे तर सपूर्ण जगातील सर्वोच्च शिखर त्या शिखरावर चढाई करण्याची महत्त्वाकाक्षा पुष्कळ गिर्यारोहक बाळगून असतात

१९५३ साली एडमड हिलरी आणि शेर्पा तेनसिंग हे दोघेजण माऊट एव्हरेस्ट च्या शिखरावर प्रथमच चढून गेले तोपर्यंत हे शिखर कोणीही सर केलेले नव्हते त्यानतर आजपर्यंत या शिखरावर चढाईच्या अनेक मोहिमा झाल्या आहेत.

असे हे अद्वितीय शिखर आपल्याला बघायला मिळेल असे कधी वाटले नव्हते पण तो योग जुळून आला आम्ही काठमाडूला रहात असताना आमच्या यजमानानी एके दिवशी अगदी पहाटे आम्हाला उठवले आणि काळोखातच आम्ही जीपमध्ये बसून निघालो दोन तास प्रवास केल्यावर आम्ही धूलीखेल या ठिकाणी पोहोचलो जीपमधून उतरल्यावर समोर दर्शन झाले ते हिमाच्छादित माऊट एव्हरेस्टचे ! जगातील सर्वात उच्च पर्वत, सर्वात उच्च ठिकाण आपण पाहात आहोत या कल्पनेने आमच्या अगावर रोमाच उभे राहिले नुकताच सूर्योदय झाला होता आणि सूर्याची पहिली किरणे माऊट एव्हरेस्टवर पडून तो सोनेरी रगाने झळाळत होता पर्वतावर सर्वत्र सोनेच पसरल्याचा भास होत होता ते दृश्य पाहून आमच्या डोळ्याचे पारणे फिटले ''माऊट एव्हरेस्ट (गौरीशकर) हे जगातील सर्वात उच्च पर्वत शिखर आहे'' या रूक्ष वाक्याने ज्या पर्वताची ओळख झाली होती त्याचे प्रत्यक्ष दर्शन फारच सुदर होते

याशिवाय गणेश, माच्छापुछरे ही त्या रागेतील शिखरेही आम्ही पाहू शकलो

## आल्प्स् आणि अँडीज

पुढे युरोपमध्ये गेल्यावर आल्प्स्चे दर्शन झाले रोमहून विमान जेव्हा जिनीव्हाला जाते तेव्हा ते पुष्कळसे आल्प्स् पर्वतावरूनच जाते त्यामुळे इटालियन व स्विस् आल्प्स्ची पूर्ण कल्पना येते आल्प्स्ची शिखरेही बर्फाच्छादितच असतात खुद्द जिनीव्हा शहरातून माऊट ब्लॉंक हे १५,७७१ फूट उचीचे शिखर

स्वच्छ हवा असेल तेव्हा सहज दिसते. स्वित्झरलँडमध्ये युफ्रा नावाचे आल्पसवरील पर्यटकानी जरूर पहावे असे एक ठिकाण आहे तेथे अगदी छोट्या हिल-ट्रेनने न दमता (१३००० फुटावर) जाता येते. इतक्या उचीवर हवा अगदी विरळ असल्यामुळे थोडे जरी चालले तरी दम लागतो तेथून दिसणारा एकदर देखावा अत्यत रमणीय आहे हिवाळ्यात जेव्हा बऱ्याचशा डोंगरावर बर्फ पडतो, तेव्हा स्किईंगसाठी लोक हिरीरीने भाग घेतात. विटर ऑलिपिक्सची स्पर्धाही फार मोठ्या प्रमाणावर होते तेव्हा जगातले स्किअर्स एकत्र जमतात सोंजा हेनी नावाची एक नॉर्वेजिअन मुलगी जगप्रसिद्ध स्की चँपियन होऊन गेली एकदा नॉर्वेमध्ये गेलो असताना तिच्या नावाचा एक सोंजा हेनी स्लोपही (स्कीओीगसाठीचा उतार) पहावयास मिळाला

दक्षिण अमेरिकेत क्विटो शहरात गेल्यावर अँडीज पर्वताची कोटोपॅक्सी व चिंबोराझो ही उत्तुग बर्फाच्छादीत १८-१९ हजार फूट उचीची शिखरेही पहाता आली तसेच एकदा टाझानियातील १९ हजार फूट उचीचे किलिमांजारो हे बर्फाच्छादित शिखरही पाहाण्याचा योग आला यावेळी आमचे विमान त्या पर्वताच्या अगदीच जवळून जात होते.

## वाळवंटातील डोंगर

ज्याप्रमाणे उच उच डोंगर -पर्वताचे सौंदर्य प्रेक्षणीय असते तसेच वाळवटातील डोंगराना आणि वाळूलाही आपले स्वतत्र सौंदर्य असते विमानतळावरून जेव्हा आपण मस्कत शहरात शिरत असतो तेव्हा वाटेतच अगदी वेगळ्या तऱ्हेचे डोंगर पाहून आनद तर होतोच पण शिवाय विचाराना एक वेगळीच चालना मिळते या डोगरावर जरी झाडी अगर हिरवळ नसली तरी त्याचा रग मात्र सारखा बदललेला दिसतो. काही ठिकाणी ताबूस तर त्याच्या शेजारीच पिवळसर रग दिसतो. नतर आणखी पुढे पाहिले तर काळसर रगाचा खडक तर त्याला लागूनच पिंगट किवा राखी रंग दिसतो निसर्गाची ही

डोंगरावरची रगरगोटी ही एक अजब चीजच आहे

ही रग पचमी पहात असताना आणखी बारकाईने पाहिले तर हे नेहमीप्रमाणे पहाडासारखे डोंगर नसून, लाटा आपटून जशी नागमोडी वलये निर्माण व्हावी तसा दर्शनी भाग दिसू लागतो ही असली वलये पाहिल्यावर मन विचार करू लागते की पूर्वी हा डोंगर समुद्राच्या अगदी काठी असून त्यावर मोठमोठ्या लाटा आदळत असाव्यात व त्या मुळे हे नक्षीकाम व रग सगती तयार झाली असावी

## वाळूचे रंग

वाळू हा विषय वाटतो तितका रूक्ष नाही. दुसऱ्या महायुद्धानतर **केरळच्या** समुद्रावरची बरीचशी वाळू बोटीतून परदेशी रवाना होत होती तेव्हा या उपद्व्यापाबद्दल खूप लोक हसत होते त्या वाळूचा पुढे अण्वस्त्राशी सबध येईल हे गुपित फारच थोड्याना त्यावेळी माहीत होते

**ब्राझील** मध्ये वेगळ्या वेगळ्या रगाच्या वाळूचे बीचेस (समुद्रकिनारे) आहेत विशेष म्हणजे ही वाळू मानवानी रगवलेली नसून विधात्याने रूक्ष वस्तूत देखील सौंदर्य असू शकते हे सिद्ध करण्यासाठी ही रगवलेली वाळू निर्माण केली असली पाहिजे रिओला आम्ही जेथे रहात होतो तेथेच एक केशरी-लालसर वाळूचा बीच होता कन्याकुमारीच्या समुद्रकाठी देखील तीन रगी वाळू पुष्कळ वाचकानी पाहिली असेलच

वाळूप्रमाणे मातीचे ही वेगवेगळे रग काही ठिकाणी आढळतात **मॉरीशस बेटाच्या** नैऋत्यभागात 'शामारेल' नावाचे एक ठिकाण आहे तेथे सप्तरगी माती असलेले एक भले मोठे शेत आहे त्यातील माती वाळूप्रमाणे बारीक असून लाटाप्रमाणे खालीवर सर्वत्र पसरलेली दिसते पर्यटकाचे हे एक आकर्षक ठिकाण आहे

## ज्वालामुखी

सेंट्रल (मध्य) अमेरिकेत ज्वालामुखी पुष्कळ आहेत त्यातील काही सुप्त आहेत तर काही अधून-मधून जागे होतात ग्वाटेमालाजवळ एका ज्वालामुखीचा स्फोट होऊन त्यातून लाल रंगाचा लाव्हा (तप्तरस) कसा बाहेर फेकला जातो ते आम्हाला प्रत्यक्ष पहाण्यास मिळाले ज्वालामुखीतून खूप वेळा तप्त राखही खूप उंच उडून दूरवर फेकली जाते या राखेमुळे आसपासच्या शेतावर एक थरच तयार होतो व ती राख शेताच्या मातीत मिसळून सर्व जमीन नापीक होते

साल्व्हाडोरला आम्ही रहात होतो त्या घरासमोरच काही अंतरावर एक भला मोठा सुप्त ज्वालामुखी होता त्या देशात काही शिखरे अधून-मधून धूर सोडताना दिसतात या निसर्गाच्या बदलत्या स्वरूपाची तेथील लोकांना आता सवयच झाली आहे

काही वर्षांपूर्वी एक मजेशीर गोष्ट **साल्व्हाडोर** मध्ये घडली राजधानीपासून ४५ किलोमीटर अंतरावर दोन उंच डोंगर आहेत त्यातील एका डोंगरातून नेहमी धूर येत असे व तेथून अर्ध्या मैलावरील दुसऱ्या डोंगरातून कधीही धूर येत नसे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी या डोंगरावर एका कंपनीने उत्तम हॉटेल बांधून सुंदर बाग-बगीचा केला व प्रत्येक खोलीतून समोरच्या डोंगराचा धूर दिसेल अशी रचना केली पण मजा अशी की ज्या दिवशी या हॉटेलचा उद्घाटन समारंभ झाला, त्या दिवसापासून समोरचा डोंगर शांत होऊन त्यातून धूर येणे बंद झाले तेव्हापासून याबद्दल लोकांचे 'देवाचा कोप झाला आहे' असे तर्क-वितर्क चालू असतात विशेष म्हणजे हे कोठे घडले ते पहाण्यासाठी अजूनही पर्यटक तेथे जात असतात !

❖

# ४. जलसंपत्ती

- नद्यांचे दर्शन
- नर्मदाकाठचे संगमरवरी पहाड
- परदेशातील नद्या
- नाईल नदी
- धबधबे
- सरोवरे आणि विहिरी
- पर्जन्य



# जलसंपत्ती

निसर्गाने मानवाला अनत हस्ताने दिलेली जलसपत्ती ही एक अभूतपूर्व देणगीच आहे मानवाचे तसेच पशु, पक्षी व इतर सर्व प्राण्याचे जीवित या देणगीवरच असलबून असते ही जलसपत्ती विधात्याने आपल्याला नद्या, तळी, विहिरी, पर्जन्य, समुद्र या रुपाने बहाल केली आहे

कुठल्याही निसर्गरम्य ठिकाणी पाण्यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण होत असते, पण पुष्कळदा या अमूल्य ठेवीचा निष्काळजीपणे गैरवापर करून मानव स्वत चेच नुकसान करीत असतो

कुठलाही नकाशा पाहिला तर त्यावर निळ्या रंगात ही जलसपत्ती दाखविली जाते. माझ्या घरी व ऑफिसमध्ये नेहमी जगाचा मोठा नकाशा भितीवर टागलेला असे त्यात अथाग समुद्र, लहान-मोठ्या नद्या, तळी वगैरेंकडे माझे लक्ष प्रामुख्याने जाई व वाटे की एकदा तरी जगात विखुरलेल्या या गोष्टी प्रत्यक्ष पहाता आल्या तर काय बहार होईल

## नद्यांचे दर्शन


साधारणपणे नकाशात बहुतेक नद्या पूर्व-पश्चिम किंवा दक्षिणेकडे खाली वहाताना दिसतात अशा तऱ्हेने पाणी खाली वहाणे हे स्वाभाविक वाटते परतु नाईल सारखी एखादी नदी अगदी खालून वर म्हणजे दक्षिणेकडून उत्तरेकडे वहाते तेव्हा ही नदी उलट्या दिशेने कशी चढत असेल म्हणून कुतूहल वाटते आपल्याला जरी हा विचार वेडगळ आहे असे कळत असले तरी वळत मात्र नाही । सैबेरीयातील नद्या देखील दक्षिणेकडून उत्तरेकडे वहात जाऊन आर्टीक महासागराला मिळतात हे आपण नकाशात पाहतो थडीमध्ये या नद्याच्या मुखाजवळील

पाणी गोठते त्यामुळे त्याचे पाणी समुद्रात न जाता जमिनीवरच सर्का पसरते म्हणून सैबेरियात दलदलीचा प्रदेश फार आहे.

भारतात प्रवास करताना बहुतेक सर्व नद्यांचे दर्शन मला घडले आपण नद्याना पवित्र मानतो व त्याची स्तुतिपर कवने गातो गगा (लाबी २५६४ - कि.मी - १५४० मैल) सिधू (२८८० कि.मी १८०० मैल), कृष्णा (१२८० कि मी - ८०० मैल), याच्यावरची कवने तर आपण दररोजच ऐकतो. अमेरिकेत मिसिसिपी (३७६० कि मी - २३५० मैल), युरोपमधील डॅन्यूब (२८४३ कि.मी - १७७७ मैल), इजिप्तमध्ये नाईल (६६९० कि मी - ४१६० मैल) वगैरे नद्याचे मला प्रत्यक्ष दर्शन झाले. देशोदेशींच्या या नद्यावरील गाणीही जगप्रसिद्ध आहेत कवीला नदीचे अगर समुद्राचे दर्शन होताच आपोआप काव्य स्फुरत असते

काही प्रसग मात्र मनात घर करून रहातात त्यात प्रथम म्हणजे वयाच्या १८ व्या वर्षी कलकत्त्याहून परिक्षा सपवून आम्ही ४-५ जण अलाहाबादला आलो माझ्याबरोबर डिसोझा नावाचा ख्रिश्चन व दोराब नावाचा पारशी मुलगा होता आम्ही सकाळी त्रिवेणीच्या घाटावर गेल्यावर मला साहजिकच तेथे अघोळ करावी असे वाटले माझ्याबरोबरचा नायर व गुप्ता यानाही तसेच वाटू लागले पण घाटावरचे ते अस्वच्छ वातावरण पाहून डिसोझा व दोराब हे आमची, घाटावर अघोळ करण्याबद्दल टिंगल करू लागले पण आम्हाला अघोळ तर करायची होतीच अखेरीस आम्ही एक छोटी नाव भाड्याने ठरवून त्रिवेणी सगमावर स्नान करू शकलो आमच्या बरोबर डिसोझानेही नदीत उडी मारली व दोराब मात्र आमचे कपडे साभाळत होडीतच बसून राहिला.

दुसरा एक प्रसग म्हणजे माझे मोठे बंधू रावसाहेब आणि मी एकदा बनारसपासून दहा मैलावर एक कारखाना पहाण्यासाठी मोटारीतून जात होतो जाता जाता दोरीने



वाळूचे रग (पृष्ठ २५)

गिझा येथील पिरॅमिड्स (पृष्ठ ८१)



बाधलेल्या माणसाच्या आकृती सायकल रिक्षात उभ्या असलेल्या दिसल्या एक दोन अशा रिक्षा पाहिल्यावर ड्रायव्हरला आम्ही गाडी थाबविण्यास सांगितले व हा काय प्रकार आहे असे विचारले त्याने सागितले की, आसपास खेड्यात कोणाचाही मृत्यू झाला तर त्याचे प्रेत सायकलरिक्षात घालून गंगेवर नेतात आणि पाण्यात चक्क सोडून देतात हे अखेरचे गगास्नान व गगेतून स्वर्गाची वाट असा समज !

## नर्मदाकाठचे संगमरवरी पहाड

बरेच वर्षापूर्वी म्हणजे १९४६ मध्ये रेल्वेत नोकरी करीत असता एकदा जबपूरला दोन आठवड्यासाठी मला आमच्या सौ सह जावे लागले एका रविवारी आम्ही नर्मदा नदी काठी असलेले संगमरवरी पहाड पहाण्यासाठी निघालो. त्यावेळी मोटारी, रस्ते वगैरे यथातथाच असल्यामुळे आम्ही मदन महाल या जबलपूरच्या पुढील स्टेशनावर गाडीने गेलो तेथून एक बैलगाडी केली व भेडाघाट नामक ठिकाणी आम्ही पोहोचलो हवा थोडी गरमच होती भेडाघाटला पोहोचल्यावर आमच्या सारखी आणखी तीन चार कुटुबे भेटली व आम्ही एक नाव भाड्याने केली नावाडी सराईत असल्यामुळे थोड्याच वेळात त्याने गाईडचेही रूप धारण केले व आम्हाला जेथे नर्मदेचे पात्र अरूद होऊ लागले तेथे नेले न जशी एखादी प्रशस्त गुहा असावी अशा ठिकाणी आमची नाव नेली पाहतो तो दोन्ही बाजूनी मोठमोठे सफेद पहाड दिसू लागले ते सगरमरवराचेच स्वच्छ खडक होते त्यावरून सूर्यप्रकाश इतक्या तेजाने परावृत्त होत होता की डोळ्यावर गॉगल घालावा असे वाटू लागले मधून मधून जरी या सगमरवराचा रग बदलत होता तरी त्याची सफाई मात्र अगदी तशीच होती

हा प्रवास निदान एक दीड किलोमीटर तरी या सगमरवरी गुहेतून चालला होता तो नावाडी गाईड तेथील

आख्याइका रसभरीत वर्णन करून सागत होता. परतीच्या प्रवासात मात्र तो गप्पच होता त्याचे कारण म्हणजे सर्व प्रवाशानी या सौंदर्याचा आस्वाद घेऊन तो मनात साठवून ठेवावा हे असेल

अलीकडे जबलपूरहून भेडाघाटला जाण्यासाठी बस, टॅक्सी वगैरे आधुनिक सोई झाल्या आहेत त्यामुळे रात्री चादण्यात देखील ही अवर्णनीय शोभा पहाता येते परतु अजून नावा व नावाडी मात्र तसेच आहेत

## परदेशातील नद्या

भारतात अनेक नद्या, त्यावरील धरणे व वीज प्रकल्प पाहिल्यावर परदेशातील नद्या पहाण्याचे माझे स्वप्न साकार होऊ लागले युरोपमध्ये - पॅरिसची **सीन,** व्हीएन्नाची **डॅन्यूब,** लडनची **टेम्स** वगैरे नद्याचे दर्शन झाले. डॅन्यूब नदीतून जेव्हा छोट्या मालवाहू बोटींची ये-जा अगदी शिस्तबद्ध रीतीने पाहिली तेव्हा नद्याचा वाहतुकीसाठी अत्यत कमी खर्चात किती उपयोग होतो हे पटले. पुढे अमेरिकेत **नायगारा,** न्यूयॉर्क येथे **हडसन,** न्यूऑरलिन्स नजीक **मिसिसिपी** वगैरे नद्या पहाता आल्या दक्षिण अमेरिकेत जाताना, जेव्हा आमचे विमान ब्राझीलच्या किनाऱ्यावरून जात होते तेव्हा कॅप्टनने आता आपण **ॲमेझॉन** (लाबी ६४०० कि मी. - ४०००मैल) नदीवरून जात आहोत असे सांगितले ताबडतोब आमच्या नजरा खाली वळल्या व पहातो तो काय ! ती नदी नसून प्रत्यक्ष 'नदच' होता तेथे त्याची रूदी १२-१५ कि मी - ८-१० मैल असावी

जुलै १९७१ पासून २।। वर्षे युनोतर्फे मी सहकुटुब व अजलीसह दक्षिण अमेरिकेत पराग्वे देशात रहात होतो या देशाची राजधानी **असुनसिऑन** (लोकसख्या ८ लक्ष) ही पराग्वे नावाच्या (२५६० कि मी लाब -१६०० मैल) एका मोठ्या

नदीच्या काठावर वसली आहे ही नदी पराग्वे व अर्जेंटीना या देशाच्या सरहद्दीवरून वहाते पराग्वेच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे पश्चिम सीमेवर **पराना** नामक एक मोठी नदी आहे (४५५२ कि मी - २८४५ मैल) ती ब्राझील व पराग्वेची सरहद्द दाखविते आम्ही तेथे असताना या नदीवर जगातील सर्वात मोठा इतायपू नावाचा जलविद्युत प्रकल्प करण्याचे घाटत होते. त्या प्रकल्पातून तयार होणारी वीज ब्राझीलच्या सान् पावलो या शहरानजीक उद्योगीकरणासाठी वापरली जाणार होती. नदीच्या एका तीरावर ब्राझील व दुसऱ्या तीरावर पराग्वेची हद्द यामुळे या प्रकल्पातील उत्पन्नावर व खर्चावर पराग्वेचा अर्धा वाटा होता पण हा देश ब्राझीलच्या मानाने गरीब असल्यामुळे स्वत· काहीही खर्च करण्यास तयार नव्हता अखेरीस अमेरिका, जागतिक बँक याच्या मध्यस्तीने यावर समाधानकारक तोडगा निघून काही वर्षातच दोन्ही देशाना मुबलक वीज प्राप्त झाली आहे.

## नाईल नदी

नकाशा पहात असताना सर्वात लाब नदी **नाईल.** नाईलची लाबी ६६९० कि मी - ४१६० मैल) ही सुदान व इजिप्तमधून खालून वर (म्हणजे दक्षिणेकडून उत्तरेकडे) वहात भूमध्य समुद्राला कशी मिळते याचे नेहमीच कुतुहल वाटे नाईल ही इजिप्तची जीवनदायिनी इजिप्तमधली बहुतेक सर्व लोकवस्ती नाईलच्या दोन्ही किनाऱ्यावर वसलेली आहे ही नदी कैरो शहराच्या अगदी मध्य भागातून वाहते कैरोला अरब लीगचे मुख्य कार्यालय आहे तेथे काही तांत्रिक वाटाघाटी करण्यासाठी आमचे दोघांचे सरकारी शिष्टमडळ गेले होते तेव्हा कैरो पाहण्याचा योग आला नाईल नदी इथिओपियात उगम पावणारी निळी नाईल (Blue Nile) आणि सुदानमध्ये उगम पावणारी शुभ्र नाईल (White Nile) या दोन नद्याच्या सगमाने बनलेली आहे खार्टूम शहराजवळ या नद्याचा सगम होतो आणि

मग ही नाईल नदी सुदान व इजिप्तमधून वाहात जाऊन भूमध्य समुद्राला मिळते

नाईल नदीवर आस्वान शहराजवळ जगप्रसिद्ध आस्वान धरण बांधलेले आहे या धरणाच्यापाण्यात अबु-सिम्बेल (Abu Simbel) इथली खिस्तपूर्व १२५० च्या सुमारास बांधलेली इजिप्शियन मंदिरे बुडणार होती. पुरातन इजिप्शियन संस्कृतीचे हे अवशेष नष्ट होऊ नयेत म्हणून युनेस्कोच्या सहाय्याने ही मंदिरे मूळ ठिकाणाहून हलवून पाणलोट क्षेत्रापेक्षा अधिक उचीवरच्या ठिकाणी जशीच्या तशी परत बाधण्यात आली. त्यानतर १९७१ मध्ये आस्वान धरणाचे काम पूर्ण झाले

शिवाय पूर्वी भूगोलात **टैग्रीस व युफ्रेटिस** या नद्याची नावे वाचली की त्या नद्या वाघिणीप्रमाणे दमदार, अवखळ व दणकट नद्या असतील असे उगाचच वाटायचे. त्या नद्या प्रत्यक्ष कधी पाहता आल्या तर काय बहार होईल असेही वाटायचे युनोच्या एका महत्त्वाच्या कामासाठी, मी जरी ओमानमध्ये कामाला होतो, तरी मला **बगदादला** दहा दिवसांसाठी जावे लागले त्यावेळी इराण-इराक युद्ध अगदी जोरात चालू होते व बगदादचा विमानतळ फक्त रात्रीच काही तास चालू असे शहरात दिवे अगदी मिणमिणते होते अशा स्थितीत रात्री मी व माझ्या सौ बगदादला एका चागल्या हॉटेलात उतरलो व नतर झोपी गेलो दुसऱ्या दिवशी सकाळी खोलीची खिडकी उघडून पहातो तो समोर एका नदीचे अगदी ताजे व नयनरम्य दृष्य दिसू लागले थोडी चौकशी केल्यावर ती नदी टैग्रीस आहे असे कळल्यावर मला मनापासून आनद झाला तीन दिवसानतर आम्ही जेव्हा बॅबिलॉनचे पुरातन अवशेष पहाण्यास गेलो तेव्हा तेथूनच पुढे गेल्यावर युफ्रेटीस नदीचे दर्शन झाले. व माझे जुने स्वप्न साकार झाले तसे पाहिले तर या दोन्ही नद्या नावाप्रमाणे अवखळ नव्हत्या त्या अगदी सथपणे वाहात होत्या

## धबधबे

कधी कधी नद्याना अवखळ स्वरूप येते व त्या लहान मुलाप्रमाणे उड्या मारू लागतात तेव्हा आपल्याला त्याच्याकडे बघतच बसावेसे वाटते त्या जेव्हा वरून एकदम खाली झेप घेतात तेव्हाही अगदी नयनरम्य देखावा दिसतो.

लहानपणी बेळगावला, शाळेतून एकदा आमची ट्रिप **'घटप्रभा'** नदीवरचा **'गोकाकचा'** धबधबा पहाण्यास गेली होती. तेव्हा धबधबा ही काय चीज आहे हे मला प्रत्यक्ष कळले. पुढे काही वर्षांनी आम्ही नातेवाईक मडळींनी एक बस केली व **'शरावती'** नदीवरील **'गिरसप्पा'** (जोग फॉल्स) धबधबा पाहिला जगातील सर्वात उंच धबधब्यात याची गणना का होते हे हा धबधबा प्रत्यक्ष पाहिल्यावरच कळले. चार वेगवेगळ्या प्रवाहातून हे पाणी २८० मी - ९०० फूट खाली कोसळत असते पावसाळ्यात तर हा देखावा अत्यत प्रेक्षणीय असतो येथील वीज निर्मितीचा नवीन प्रकल्प अशा रीतीने आखला आहे की त्यामुळे गिरसप्पा धबधब्याच्या सौंदर्याला बिलकुलही धक्का पोहोचला नाही आम्ही या धबधब्याच्या अवर्णनीय सौंदर्याचा आस्वाद घेत होतो तोच आमची नजर आमच्या पलीकडे बसलेल्या एका गोऱ्या जोडप्याकडे गेली. ते दोघे हातात हात घालून या धबधब्याकडे कितीतरी वेळ टक लावून एकाग्र चित्ताने पहात होते आमचे मेहुणे श्री नाना गांगल इकडे तिकडे येरझाऱ्या घालीत होते त्यांना त्या साहेबाची गाडी दिसली आत त्याचा ड्रायव्हर पेंगत बसला होता त्याला नानानी विचारले, "अरे, तू नाही का धबधबा पहाण्यासाठी पुढे जात ?" त्यावर तो म्हणाला, "उसमे क्या देखना है ? उप्पर का पानी नीचे गिरता हय, बस्स !"

पुढे अमेरिकेत गेल्यावर **नायगारा** दोनतीन वेळा पहाता आला एकदा जानेवारी महिन्याच्या भयानक थडीत हा

मग ही नाईल नदी सुदान व इजिप्तमधून वाहात जाऊन भूमध्य समुद्राला मिळते

नाईल नदीवर आस्वान शहराजवळ जगप्रसिद्ध आस्वान धरण बांधलेले आहे या धरणाच्यापाण्यात अबु-सिम्बेल (Abu Simbel) इथली खिस्तपूर्व १२५० च्या सुमारास बांधलेली इजिप्शियन मंदिरे बुडणार होती पुरातन इजिप्शियन संस्कृतीचे हे अवशेष नष्ट होऊ नयेत म्हणून युनेस्कोच्या सहाय्याने ही मंदिरे मूळ ठिकाणाहून हलवून पाणलोट क्षेत्रापेक्षा अधिक उंचीवरच्या ठिकाणी जशीच्या तशी परत बांधण्यात आली त्यानंतर १९७१ मध्ये आस्वान धरणाचे काम पूर्ण झाले

शिवाय पूर्वी भूगोलात **टैग्रीस** व **युफ्रेटिस** या नद्यांची नावे वाचली की त्या नद्या वाघिणीप्रमाणे दमदार, अवखळ व दणकट नद्या असतील असे उगाचच वाटायचे त्या नद्या प्रत्यक्ष कधी पाहता आल्या तर काय बहार होईल असेही वाटायचे युनोच्या एका महत्त्वाच्या कामासाठी, मी जरी ओमानमध्ये कामाला होतो, तरी मला **बगदादला** दहा दिवसांसाठी जावे लागले त्यावेळी इराण-इराक युद्ध अगदी जोरात चालू होते व बगदादचा विमानतळ फक्त रात्रीच काही तास चालू असे. शहरात दिवे अगदी मिणमिणते होते. अशा स्थितीत रात्री मी व माझ्या सौ बगदादला एका चांगल्या हॉटेलात उतरलो व नंतर झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी खोलीची खिडकी उघडून पहातो तो समोर एका नदीचे अगदी ताजे व नयनरम्य दृष्य दिसू लागले थोडी चौकशी केल्यावर ती नदी टैग्रीस आहे असे कळल्यावर मला मनापासून आनंद झाला तीन दिवसानंतर आम्ही जेव्हा बॅबिलॉनचे पुरातन अवशेष पहाण्यास गेलो तेव्हा तेथूनच पुढे गेल्यावर युफ्रेटीस नदीचे दर्शन झाले व माझे जुने स्वप्न साकार झाले तसे पाहिले तर या दोन्ही नद्या नावाप्रमाणे अवखळ नव्हत्या. त्या अगदी संथपणे वाहात होत्या

## धबधबे

कधी कधी नद्याना अवखळ स्वरूप येते व त्या लहान मुलाप्रमाणे उड्या मारू लागतात तेव्हा आपल्याला त्याच्याकडे बघतच बसावेसे वाटते त्या जेव्हा वरून एकदम खाली झेप घेतात तेव्हाही अगदी नयनरम्य देखावा दिसतो

लहानपणी बेळगावला, शाळेतून एकदा आमची ट्रिप **'घटप्रभा'** नदीवरचा **'गोकाकचा'** धबधबा पहाण्यास गेली होती तेव्हा धबधबा ही काय चीज आहे हे मला प्रत्यक्ष कळले पुढे काही वर्षांनी आम्ही नातेवाईक मडळींनी एक बस केली व **'शरावती'** नदीवरील **'गिरसप्पा'** (जोग फॉल्स) धबधबा पाहिला जगातील सर्वांत उच्च धबधब्यात याची गणना का होते हे हा धबधबा प्रत्यक्ष पाहिल्यावरच कळले चार वेगवेगळ्या प्रवाहातून हे पाणी २८० मी. - ९०० फूट खाली कोसळत असते पावसाळ्यात तर हा देखावा अत्यत प्रेक्षणीय असतो येथील वीज निर्मितीचा नवीन प्रकल्प अशा रीतीने आखला आहे की त्यामुळे गिरसप्पा धबधब्याच्या सौंदर्याला बिलकुलही धक्का पोहोचला नाही आम्ही या धबधब्याच्या अवर्णनीय सौंदर्याचा आस्वाद घेत होतो तोच आमची नजर आमच्या पलीकडे बसलेल्या एका गोऱ्या जोडप्याकडे गेली ते दोघे हातात हात घालून या धबधब्याकडे कितीतरी वेळ टक लावून एकाग्र चित्ताने पहात होते आमचे मेहुणे श्री नाना गागल इकडे तिकडे येरझाऱ्या घालीत होते त्याना त्या साहेबाची गाडी दिसली आत त्याचा ड्रायव्हर पेंगत बसला होता त्याला नानानी विचारले, ''अरे, तू नाही का धबधबा पहाण्यासाठी पुढे जात ?'' त्यावर तो म्हणाला, ''उसमे क्या देखना है ? उप्पर का पानी नीचे गिरता हय, बस्स !''

पुढे अमेरिकेत गेल्यावर **नायगारा** दोनतीन वेळा पहाता आला एकदा जानेवारी महिन्याच्या भयानक थडीत हा

धबधबा पाहिला तेव्हा तो अगदीच निराळा दिसला नेहमीप्रमाणे निळे पाणी खाली पडण्याऐवजी अगदी राड पाणी खाली पडत होते व मधूनच बर्फाच्या मोठ्या मोठ्या लाद्या पडत होत्या नेहमी दिसणारे इद्रधनुष्य सर्वत्र ढगाळ व कुद हवेमुळे अगदी लोपून गेले होते थोड्या वेळात जोराची हिमवृष्टी सुरू झाली व या सौंदर्याने निराळेच रूप धारण केले

जगातील जे जे धबधबे पाहिले त्यातील सर्वात सुदर व अगदी वेगळा असा धबधबा ब्राझीलमध्ये **'इग्वासु'** गावाजवळ आहे तो नागमोडी आकाराचा आहे त्याची रूदी जवळजवळ १ मैल असून सर्वत्र पाण्याची सतत धार पडत असते या धबधब्या जवळच **'इतायपूचा'** सर्वात मोठा वीज प्रकल्प साकार झाला आहे

## सरोवरे आणि विहीरी

जलसपत्तीचा आणखी एक ठेवा म्हणजे सरोवरे नकाशामध्ये भूपृष्ठावर लहानमोठी सरोवरे सर्वत्र विखुरलेली आढळतात भारतात ठिकठिकाणी लहान-मोठी नैसर्गिक सरोवरे आहेत त्यापैकी ओरिसातील **चिल्का** सरोवर व उत्तरेकडे **मानस** सरोवर फारच प्रसिद्ध आहे उत्तर अमेरिका व कॅनडा याच्या सरहद्दीवरील सरोवरे जगप्रसिद्धच आहेत अलीकडे मोठमोठी धरणे बाधून कृत्रिम रीतीने तयार झालेली भली मोठी सरोवरे पृथ्वीच्या पाठीवर सर्वत्र आढळतात

मी पाहिलेले नैसर्गिक व समुद्र सपाटीपासून साडेबारा हजार फूट उचीवर अत्यत रमणीय असे **'टिटिकाका'** नावाचे सरोवर द अमेरिकेतील पेरू व बोलिव्हिया देशातील सरहद्दीवर आहे. इतक्या मोठ्या उचीवर एवढा मोठा गोड्या पाण्याचा साठा क्वचितच सापडतो याची लाबी १७६ कि.मी - ११० मैल व रूदी ७२ कि मी - ४५ मैल असून ६२ ते २८० मी (२००ते ९००) फूट खोली आहे

जी ठिकाणे नद्या, सरोवरे याच्यापासून दूर असतात तेथील लोकाना व शेतीला पाणी मिळावे म्हणून विधात्याने जमिनीखाली पाण्याचा साठा ठेवला आहे तो साठा लोक विहिरी खणून वापरतात यात देखिल देवाने डावा उजवा फरक ठेवलेला आहेच. बेळगावला नळ येण्यापूर्वी सर्वत्र विहीरीचेच पाणी असे व आम्ही रहाटावरून अगर चाकावर दोर टाकून ५०-६० फूट खोल विहीरीवरून पाणी काढत असू. विशेष म्हणजे आमच्या घराच्या ओळीतील सर्व विहीरींना गोडे पाणी असे परतु समोरच्याच ओळीत साधारण १०० फूट अतरावर सर्व घराना तुरट पाणी मिळे ।

## पर्जन्य

मनुष्य प्राणी स्वत च्या वापरासाठी, शेतीसाठी, कारखान्यासाठी, विजेसाठी व जनावरासाठी पाण्याचा प्रचड वापर करीत असतो आता अशी एक वेळ येऊन ठेपली आहे की या जलसपत्तीचा जर मानवाने हात राखून उपयोग केला नाही तर त्याच्यावर पाण्याविना जगण्याची वेळ येणार आहे. या सर्व गोष्टी परमेश्वर पहात आहे व आपल्यावर शक्य तो अशी वेळ येऊ नये म्हणून दरवर्षी आपल्याला पर्जन्याच्या रूपाने मदत करीत असतो भारतातील मॉन्सून हा एक अद्‌भुत प्रकार (Phenomenon) आहे त्यामुळे जून ते सप्टेंबर नैऋत्य मॉन्सून व नोव्हेंबर ते फेब्रुवारी आग्नेय मॉन्सून आपल्याला पाऊस देत असतो या मॉन्सूनचा अभ्यास हे एक स्वतत्र शास्त्रच बनलेले आहे त्याकरिता आपण नुकताच सुपर कॉम्प्युटरचा उपयोग करू लागलो आहोत अलीकडे मार्च-एप्रिल मध्ये वसत गोवारीकर मॉन्सूनचे काय भविष्य सागतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले असते

## चेरापुंजी

जगात सर्वात जास्त पाऊस पडण्याचे ठिकाण म्हणजे आसाममध्ये चेरापुजी हे होय तेथे दरवर्षी सुमारे ५०० इचापेक्षा अधिक पाऊस पडतो एकदा कामानिमित्त आसाममध्ये गेलो असताना एप्रिलमध्ये चेरापुजीस जाण्याचा योग आला. हे गाव म्हणजे एक मोठे खेडेच आहे घरे आणि रस्ते अगदीच बेताचेच आहेत इतका पाऊस पडून सुद्धा दर उन्हाळ्यात या गावात पिण्याचे पाणी मिळणे ही अगदी मुष्किलीचीच बाब असते जगात सर्वात जास्त पाऊस पडणाऱ्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य असावे ही काय दैना ! या दैनेचे मुख्य कारण म्हणजे त्या भागात कोठेही बाध घालून पावसाचे पाणी साठवण्याचा प्रयत्न केला तर तुफान पावसाने सर्व प्रयत्नावर अक्षरश पाणी पडते दरवर्षी यावर काहीतरी उपाय केलाच पाहिजे अशी उन्हाळ्यात चर्चा सुरू होते व थोड्याच दिवसात पाऊस आल्यावर सर्व थडावते. आमच्या लहानपणी बेळगावात नळ येण्यापूर्वी कित्येक वर्षे उन्हाळ्यात अशीच चर्चा चाले व पहिला पाऊस पडल्यावर सर्वजण विसरून जात ही जग रहाटीच आहे


चेरापुजी येथे एक सिमेंट फॅक्टरी आहे त्यावेळी त्याचे चीफ इंजिनियर श्री साने होते एका क्रॉसिगजवळ आमची गाडी थाबली असता त्याची व आमची अनपेक्षित भेट झाली (सन १९६८) - त्याच्याबरोबर आम्ही ती सिमेंट फॅक्टरी पाहू शकलो आश्चर्याची गोष्ट म्हणजे तेच श्री साने फेब्रुवारी ९४ मध्ये पुण्यात आम्हाला एका समारभात भेटले जग किती लहान होत चालले आहे याची ही प्रचिती ।

❖

# ५. समुद्र आणि महासागर

– सुवेझ कॅनॉल

– पनामा कॅनॉल



# समुद्र आणि महासागर

जेव्हा आपण जलसपत्तीचा विचार करतो आणि जगाच्या नकाशाकडे पहातो तेव्हा काही भागात वेगवेगळे खड प्रथम दृष्टीस पडतात त्यानतर या भूभागापेक्षा, पृथ्वीचा फार मोठा भाग जलसपत्तीने व्यापला आहे असे लक्षात येते पृथ्वीचा जवळजवळ दोन तृतियाश भाग पाण्याने व्यापला आहे व भूखड फक्त एक तृतियाश भागातच आहे. त्यामुळे साहजिकच एवढ्या मोठ्या जलसपत्तीच्या ठेव्याकडे दृष्टी वळते. महासागर किती मोठे असतात याची कल्पना खालील आकड्यावरून सहज येईल

| नाव | क्षेत्रफळ (चौरस मैल) | जास्तीत जास्त खोली (फूट) |
|---|---|---|
| १) पॅसिफीक | ६ ३८ कोटी | ३६,१९८ |
| २) अटलाटिक | ३ १५ कोटी | २८,३७४ |
| ३) हिंदी महासागर | २.८३ कोटी | २५,२४४ |
| ४) अरबी समुद्र | १५ लक्ष | १९,०२९ |

(भारताचे क्षेत्रफळ १२ लक्ष चौ मैल
ब्राझीलचे क्षेत्रफळ ३२ लक्ष चौ. मैल)
(१ मै = १ ६ कि मी )

प्रथम मी खरा समुद्र १९५६ च्या जून महिन्यात पी अँड ओ कपनीच्या S S स्ट्रॅथमूर बोटीने इग्लडला गेलो तेव्हाच पाहिला सिव्हील एव्हिएशन मध्ये नोकरी करीत असताना पाच महिने रजा घेऊन रेडिओ आणि वायरलेसच्या उच्च शिक्षणासाठी स्वखर्चाने हा प्रवास केला होता दोन जूनला

शनिवारी दुपारी आमची २४००० टनी बोट मुबईच्या **बॅलर्ड पिअर** वरून निघाली त्यावेळी परदेशाचा प्रवास बोटीने करावयाची पद्धत होती मुबईहून लडनला पोहोचायला तब्बल २१ दिवस लागत तेव्हा बोटीचे भाडे फक्त एक हजार रु होते त्यात सकाळी नाश्ता व दोन वेळचे उत्तम जेवण, चहा व रहाण्यासाठी चागली सोय । जूनचा महिना असल्यामुळे मॉन्सूनचे वारे वहात होते त्यामुळे एवढी मोठी बोटही हालू लागली पहिल्या रात्री फक्त निम्मेच लोक जेवण्याच्या स्थितीत होते सुदैवाने माझ्याजवळ जेष्ठमधयुक्त दळलेली सुपारी होती ती तोंडात धरल्यामुळे या व्याधीपासून मी मुक्त राहिलो पाचव्या दिवशी आमची बोट **'एडन'** च्या बदराला लागली बोटीचा वेग तासाला साधारण २० ते २२ नॉटिकल मैल होता बोटीचा वेग नॉटिकल मैलामध्ये मोजतात कारण बोट जेव्हा समुद्रातून जात असते तेव्हा तिची दिशा नकाशावर काढलेल्या अक्षाश-रेखाषावरूनच ठरवली जाते नकाशावरील १ मिनिटाचे अतर (१ डिग्री = ६० मिनिटे) एक नॉटिकल मैल म्हणजे ६०७६ फूट इतके असते आपल्या रस्त्यावरचा मैल ५२८० फूट म्हणजे ८ फर्लांगाचा असतो म्हणजे पाण्यावरचा मैल अधिक लाब म्हणजे जवळजवळ ९ फर्लांगचा असतो

या चार दिवसात अरबी समुद्राचा विस्तार किती मोठा होता याची मला चागलीच कल्पना आली व मानवाने कितीही बढाया मारल्या तरी निसर्गापुढे तो इवलासाच असतो याची महती पटली चार दिवस सभोवती निळे पाणी व वरती आकाशाची पोकळी यातून बोटीचा मार्ग कसा शोधला जातो हे प्रवाशाना गूढच होते सुदैवाने माझ्याकडे Marine Wireless Officer चे सर्टिफिकेट होते त्यामुळे कॅप्टनच्या परवानगीने मधून मधून मी वायरलेस केबिनमध्ये वेळ घालवून प्रात्यक्षिक शिक्षण घेत होतो व वायरलेस दळणवळणाचे बारकावे समजून घेत होतो

## सुवेझ कॅनॉल

एडनहून ताबडा समुद्र पार केल्यानतर आमची बोट **पोर्टसैदला** आली व बोटींच्या काफिल्यातून सुवेझ कॅनॉलमध्ये सकाळी ७ वाजता शिरली हा (१८९ कि मी) ११८ मैल लाबीचा कॅनॉल ताबडा समुद्र आणि भूमध्य समुद्र याना जोडणारा जलमार्ग होय हा कालवा **फर्डिनांड द लेसेप्स** या फ्रेंच इजिनिअरने १८६९ मध्ये बाधला या बाधकामास १० वर्षे लागली हा कालवा पुष्कळ ठिकाणी इतका अरूद आहे की त्यातून फक्त एकच बोट जाऊ शकते. इतर ठिकाणी याची रूदी कमी जास्त होत असते जगभर हिंडणारा बोटीचा कॅप्टन या कालव्यात मात्र स्वत. बोट चालवू शकत नाही तेथे त्याला कालव्यातील पायलटचीच मदत घ्यावी लागते या कालव्याचा वापर केल्याबद्दल प्रत्येक बोटीला वजनाप्रमाणे भरपूर रोख पैसे डॉलर मध्ये मोजावे लागतात. दररोज या कालव्यातून सरासरी २०० बोटींची वहातूक होत असते काही अरूद भागात, अगदी एकेरी वाहतुकीमुळे एकामागून एक बोटींची ओळ लागलेली दिसते दररोज सकाळी दोन्ही बाजूला एक एक ६०-७० बोटींचा काफीला तयार करतात. या काफिल्यात सर्व बोटी रांगेने एकामागून एक चालू लागतात. निम्म्या वाटेवर एक मोठे तळे आहे तेथे हे दोन काफिले क्रॉस होतात जवळ-जवळ १२ तास प्रवास करून अखेर रात्री ८ वाजता आमची बोट सुवेझला पोहोचली तेथे लेसेप्सचा एक मोठा पुतळा असे. वास्तविक इंग्लडहून परत येताना मला पुन्हा हा कालवा पहाण्याची सधी मिळणार होतीच. परतु एका चमत्कारीक प्रसगामुळे ती कशी हुकली ते पहा.

इग्लडचा अभ्यासी दौरा संपवून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात मी पॅरिसला आलो तेथून रेल्वे मार्गे जिनिव्हा फ्रँकफुर्ट, हायडलबर्ग, मिलान मार्गे इटलीतील जिनोआ बंदरात १५ ऑक्टोबर च्या सुमारास पोहोचलो भारतात परत

येण्यासाठी लॉईड ट्रिस्टीनो कपनीच्या M V व्हिक्टोरिआ बोटीचे तिकीट मी आधीच लडनहून काढून ठेवलेले होते व ठरलेल्या दिवशी बोटीवर चढलो एक दिवसाचा प्रवास करून आमची बोट इटलीतील **'नेपल्स'** बदराला लागली सकाळी नाश्ता घेऊन आम्ही सर्व प्रवासी नेपल्स पहाण्यासाठी खाली उतरलो व सध्याकाळी बोटीवर परतलो पुढील प्रवासासाठी म्हणजे सुवेझला जाण्यासाठी रात्री १० वाजता बोट सुटणार होती. आम्ही सर्व रात्रीच्या जेवणानतर झोपलो दुसऱ्या दिवशी सकाळी पहातो तो आमची बोट नेपल्समध्ये त्याच जागेवर होती थोडयाच वेळात नाश्ता घेत असताना कप्तानानी जाहीर केले की काही तात्रिक कारणामुळे बोट आज रात्री सुटेल तरी प्रवाशानी नेपल्सनजीकच्या ज्वालामुखीतून वाहणाऱ्या तप्तरसाने (लाव्हाने) गाडलेले **कॅप्री** नावाचे शहर पहाण्यास जावे अगर इतरत्र फिरावे आम्ही आनदाने कॅप्री पाहण्यास गेलो व लाव्हातून उत्खनन केलेले जुने शहर आम्हाला पाहण्यास मिळाले. सध्याकाळी परत बोटीवर आलो व नित्याप्रमाणे झोपलो दुसऱ्या दिवशीही बोट तिथेच उभी ! पुढील दोन दिवस असाच प्रकार आणि आम्ही सर्व प्रवासी नेपल्स मध्ये बोटीवर अडकून पडलो होतो.

चौथ्या दिवशी असे जाहीर करण्यात आले की ''इग्लड व इजिप्तची लढाई सुरू झाली आहे व ब्रिटीश विमानाने सुवेझ कालव्यातील काही बोटी बुडविल्याने हा कालवा बद झाला आहे तरी सर्व प्रवाशानी तिकीटाचे पैसे परत घेऊन बोट खाली करावी''

१९५६ पर्यंत जरी हा कालवा प्रत्यक्ष इजिप्तमधून जात होता तरी त्याची मालकी मात्र ब्रिटीश व फ्रेंच सरकारचीच होती याबद्दल इजिप्त वारवार तक्रारी करत असे व हा कालवा आपल्या स्वाधीन करावा अशी मागणी करे परतु लष्करी बळावर व तात्रिक अडचणी पुढे करून इजिप्तचा हा हक्क मान्य

झाला नाही. अखेर चिडून इजिप्तने या कालव्याचे राष्ट्रीयीकरण करून तेथे सैन्य पाठविले व लेसेप्सचा पुतळा पाडून टाकला व लढाईला सुरुवात झाली पण हे सर्व आम्हाला चागलेच भोवले. आम्ही सर्वांनी बोटीच्या अधिकाऱ्याना ही बोट दक्षिण आफ्रिकेच्या केप ऑफ गुड होप वरून हिंदुस्तानात न्यावी अशी गळ घालण्यास सुरुवात केली रोममधील भारतीय दूतावासाशी सपर्क साधून त्यांचा एक भारतीय अधिकारी नेपल्सला बोटीवर बोलणी करण्यासाठी बोलावला पण हे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यामुळे पाचव्या दिवशी आम्ही आमच्या छोट्या सामानासह लीराच्या नोटाची बडले घेऊन बोट सोडली व रेल्वेने रोम मध्ये येऊन दाखल झालो युरोपमधील प्रवासी आपल्या गावी परतले उरलेले ३० पाकिस्तानी व आम्ही ४० भारतीय रोमला परतलो आमच्या मोठ्या ट्रका मात्र कपनीने हिंदुस्तानात पाठविण्याची हमी घेतली


या पाच-सात दिवसामध्ये बोटीवरील ४० समदु खी भारतीय प्रवाशाची एकमेकाशी चागली ओळख झाली व प्रत्येकाचे आपापले ग्रुप्स तयार होत गेले. आमच्या बरोबर श्री मोडक नावाचे मुबईचे एक बडे पोलीस ऑफीसर आपले इंग्लडमधील ट्रेनिग सपवून मुबईस परत चालले होते. ते सर्व प्रवाशाना मधून मधून धीर देत असत त्यात पुण्यात राहणाऱ्या विशीतील दोन पारशी मुली होत्या मधून मधून त्याच्या गगा-यमुना वहात होत्या त्याचे सात्वन आमच्या बरोबर असलेल्या लुथ्रा या पजाबी प्रौढ पण विशेष 'ग' वाल्या बाई करीत होत्या आपल्या प्रवासाचे काही झाले तरी त्यानी लडनमध्ये नुकताच खरेदी केलेल्या महाग डिनर सेटचे काय होईल याचीच त्याना फार काळजी लागली होती त्या म्हणत की ''आता आपले जड सामान केप करून भारतात पोचायला तीन-चार महिने तरी लागतील या काळात जर माझ्या डिनर सेट मधील एक-दोन प्लेटस् अगर कप फुटले तर केवढे

आकाशच कोसळेल !''

जेव्हा आम्ही कॅप्री पहावयास गेलो होतो तेव्हा या बाई आमच्या ग्रुपमध्ये होत्या. एके ठिकाणी काही चित्रकला पहात असताना एका खोलीच्या बाहेर 'फक्त पुरुषांसाठी' अशी पाटी होती आम्ही पुरुष मडळी आत जाऊन ती अर्वाच्च चित्रकला पाहून बाहेर येत होतो. तेव्हा या बाई रागावून इतक्या त्रस्त झाल्या होत्या की त्या म्हणू लागल्या की, ''आत कसली चित्रे असणार की तेथे स्त्रियांना मज्जाव असावा ? माझे लग्न होऊन पचवीस वर्षे झाली आहेत मी सर्व काही पाहिले आहे. आता त्या चित्रात असे काय असणार जे मला माहित नाही, तरी मला आत सोडा.'' म्हणून तिथल्या माणसाशी त्या बाई हुज्जत घालत होत्या. ते ऐकून आमच्यातील एक वयस्क गृहस्थ त्यांना म्हणाला, ''अहो तुम्ही जर सर्व प्रत्यक्षात पाहिले आहे असे म्हणता आहात तर आता या चित्रामध्ये नवीन काय असणार, तर हा नाद सोडा !'' ''पाहिजे असेल तर मी सर्व वर्णन करून तुम्हाला सागेन '' हे वाक्य तो फक्त बोलला नाही.

एका ब्रिटीश कंपनीत काम करीत असलेले केरकर नावाचे गृहस्थ व त्याचा ख्रिश्चन साथीदार मात्र अगदी बिनधास्त होते. ते म्हणत की आणखी जरी रोममध्ये आपल्याला रहावयास लागले तरी काही हरकत नाही आमची कंपनी आमचा पगार व अलौन्स देणार आहे नाही तर मुंबईला जाऊन ताबडतोब कामाला जुंपण्यापेक्षा ही सुट्टी छान आहे पहा प्रत्येकाचे आपापले दृष्टिकोन कसे वेगळे असतात.

या युद्धानंतर हा कालवा काही काळ बद होता. व सर्व वहातूक दक्षिण आफ्रिका मार्गे चालू होती कालवा चालू झाल्यावर इजिप्तने आपले पायलट तयार केले व दररोज भरपूर उत्पन्न मिळविण्यास सुरुवात केली पुढे १९६७ मध्ये या कालव्याचे पुन्हा दुर्भाग्य वर आले व इजिप्त-इस्त्राईलच्या ७ दिवसाच्या लढाईत कालव्यात बऱ्याच बोटी बुडाल्या यामुळे



अगाला मशाली बाधून दोनशे फूट उच कड्यावरून समुद्राच्या येणाऱ्या लाटेत नेमका सूर मारणारा वीर (पृष्ठ ६६)

हा कालवा ५-६ वर्षे बंद पडला

'सुवेझ' नावाचा टायरन पॉवर या देखण्या नटाने काम केलेला १९४० च्या सुमारास एक सुदर इग्रजी चित्रपट निघाला होता वाचकानी हा चित्रपट जरुर पहावा त्या चित्रपटात टायरन पॉवरने उमद्या फ्रेंच इजिनियर लेसेप्सची भूमिका अत्यत सुदर रीतीने केलेली आहे कालवा बाधण्यापूर्वी ब्रिटीश व इतर हितशत्रूच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी त्याने केलेले भगिरथ प्रयत्न, नतर कालवा बाधताना जी असख्य खेचरे कामासाठी वापरली जात त्यांचा गोंधळ, वाळूच्या तुफानाने त्यांच्या तबूतील ऑफीसची व नकाशांची शब्दश झालेली धूळधाण वगैरे प्रसग प्रेक्षकाच्या हृदयाचा ठाव घेतात त्याच्यावर फिदा असलेली दुसऱ्या इजिनियरची सुदर मुलगी व त्याचे प्रेमीय चाळे त्या रूक्ष वाळवटाला प्रेमाची झालर लावून ओलावा निर्माण करीत होती

पुढे लेसेप्सच्या मृत्यूनतर त्याच्या गौरवार्थ फ्रेंच सरकारने त्याचा पूर्णाकृती पुतळा सुवेझ कॅनॉलच्या तोंडाशीच उभा केला होता.

रोममध्ये आल्यावर भारतीय दूतावासाने आम्हाला फार मोठी मदत केली प्रत्येकाला त्याच्या पासपोर्टवर एक हजार रुपये कर्ज मजूर झाले. आम्हाला बोटीत परत मिळालेले पैसे व हे हजार रुपये एकत्र करून दूतावासाने स्विस् एअरचे एक व्हायकाऊट विमान चार्टर केले व आम्ही इस्ताबूल, तेहेरान व कराची येथे थाबत फक्त १८ तासात मुबईस पोहोचलो. जरी एवढी मोठी दगदग झाली तरी बोटीपेक्षा आम्ही सहा दिवस आधी मुबईस पोहोचलो.

युरोप-अमेरिकेला जाणाऱ्या प्रवासी बोटी १९६१ पासून बदच झाल्या त्याला कारण म्हणजे विमानांचे जेट युग सुरू झाले पूर्वी ज्या प्रवासास २१ दिवस लागत तोच प्रवास आता

फक्त ९ तासात होतो पण काही झाले तरी बोटीच्या प्रवासाची मजा औरच सुवेझ कॅनॉलने इजिप्तचे पूर्व व पश्चिम असे दोन अलग भाग झाले आहेत ते जोडण्यासाठी सुवेझ कॅनॉलच्या खालून एक दहा मैल लांबीचा पूर्व पश्चिम बोगदा खणला आहे त्यातून मोटारींची वाहतूक चालू असते अलीकडेच या कालव्यावर एक प्रचंड पूल बांधण्याची इजिप्तची कल्पना आहे हा पूल सॅनफ्रान्सिस्कोच्या गोल्डन गेट पुलाप्रमाणे उंच असला पाहिजे म्हणजे त्याखालून सुपर टँकर्स सहज जाऊ शकतील इजिप्त सरकार जपानशी या बाबतीत सध्या वाटाघाटी करीत आहे

## पनामा कॅनॉल

जगातील दुसरा महत्त्वाचा कॅनॉल म्हणजे पनामा कालवा मध्य अमेरिकेतील पनामा देशात ५० मैल लांबीचा हा पूर्व-पश्चिम कालवा पॅसिफिक व अटलांटिक महासागर जोडण्यासाठी अमेरिकेने १९१४ साली खोदला त्यावेळी ही जागा ९९ वर्षांच्या कराराने अमेरिकेने पनामा देशाकडून भाड्याने घेतली होती त्यासाठी दरवर्षी पनामाला साडेसात कोटी डॉलर्स भाडे मिळे, या कालव्याच्या पश्चिमेस **पनामा** हे शहर पॅसिफिकवर तर **कलोन** हे शहर पूर्वेला अटलांटिक महासागरावर वसलेले आहे

कालव्याच्या मार्गात बरेच उंचसखल प्रदेश आहेत त्यामुळे हा कालवा बांधण्याचे तंत्र सुवेझपेक्षा अगदी निराळेच होते या कालव्यातून मला जरी प्रवास करता आला नाही तरी युनोच्या कामासाठी मी जेव्हा पनामा देशात जात असे तेव्हा मुद्दाम या कालव्याच्या 'मीरा फ्लॉरेस लॉक' जवळ जात असे. तेथून कालव्यातून जाणाऱ्या बोटी अगदी जवळून म्हणजे २५-३० फूट अंतरावरून जाताना दिसतात आपले हात जर थोडे जास्त लांब असते तर बोटीवरील माणसाशी हस्तांदोलन

करता आले असते असे वाटे.

सुवेझ कालव्याप्रमाणे हा कालवा सर्वत्र ३०-३५ फूट खोदला नसून त्यासाठी Water Lock System म्हणजे पाण्याच्या कप्प्याची योजना केली आहे. प्रथम मोठ्या पंपाने पहिल्या कप्प्यात पाणी जमा होते व त्यामुळे समुद्रातून आलेली बोट उचीवर तरंगू लागते यावेळी कप्प्याचा समुद्राकडील दरवाजा बद असतो तेवढ्यात पुढल्या कप्प्यात पाणी भरू लागते व नतर पुढे सरकून या कप्प्यात बोट शिरते व आणखी उंच तरगू लागते असे एकामागून एक, तीन कप्पे (Locks) आहेत व बोट समुद्रसपाटीच्या बरीच उच तरगू लागते व पुढे सरकत असते. हे कप्पे तयार केल्यामुळे त्याखालील खडक फोडण्याचे सर्व श्रम वाचले यानतर पुढे बोट हळूहळू खाली येऊन कालव्याच्या दुसऱ्या टोकाला समुद्र सपाटीला येऊन पुन्हा दुसऱ्या समुद्रात प्रवेश करते या कप्प्यात पाणी भरण्यासाठी फार मोठे पप वापरलेले असून पुष्कळ ठिकाणी बोट ओढण्यासाठी मोठमोठे दोर ओढण्याच्या सुविधा आहेत या कालव्यामुळे जपान व इतर पॅसिफिकमधील देशाच्या बोटींना अटलांटिक महासागरात झटपट प्रवेश करता येतो त्याचप्रमाणे अटलाटिक मधील बोटी पॅसिफिक मध्ये सहज जाऊ शकतात. नाहीतर त्याना अमेरिकेच्या दक्षिण टोकाला म्हणजे . केप हॉर्नला वळसा घालावा लागला असता सुवेझप्रमाणे या कालव्यातून बोट नेताना पायलटची जरूरी असते व त्यासाठी प्रत्येक बोटीला जबर भाडे द्यावे लागते या कालव्यांचे सरक्षण करण्यासाठी अमेरिकेने **'कॅनॉल झोन'** नावाची एक आधुनिक वसाहत पनामा शहराजवळ बांधली आहे पनामा देशातील बहुतेक लोक निग्रोंचे वशज आहेत अलीकडे बरेच संमिश्र लोकही सापडतात पनामा व कलोन येथे आपल्या सिंधी लोकांनी बरीच मोठी दुकाने थाटून आज बरीच वर्षे व्यापार सुरू केला आहे कलोन हे फ्री पोर्ट असल्यामुळे जपानी व इतर सर्व वस्तू

येथे अगदी स्वस्त दरात मिळतात या शहराच्या आसपास मोठमोठी गुदामे असून तेथे व्यापारी सर्व देशातील माल आणून ठेवतात व नतर त्याचे इतर देशात वितरण करतात

कराराची मुदत संपण्याआधीच पनामातील लोकानी हा कालवा आपल्या स्वाधीन व्हावा म्हणून मागणी सुरू केली व बरेच दगेही झाले अखेर प्रेसिडेंट कार्टरने हा कालवा १९९९ साली पनामाला देण्योच कबूल केले आहे आता, अमेरिका दुसरा तसाच कालवा कोठे काढावा याच्या शोधात आहे

पनामा देशात सर्वत्र स्पॅनिश बोलले जाते शहराच्या मध्य भागी गाधीजींचा एक पूर्णाकृती पुतळाही उभा आहे


❖

# ६. समुद्रकिनाऱ्यावरील प्रेक्षणीय ठिकाणे

- थायलंड - पटाया व सोंखला बीच
- इंडोनेशिया - बाली बीच
- ऑस्ट्रेलिया - पर्थ-सिडने
- फिलिप आयलंडची पेनग्विन परेड
- ताहिती व दक्षिण अमेरिका
- अर्जेंटिना - मार देल प्लाता
- ब्राझील - रिओ व सांतोस
- मेक्सिको - अकापुल्को
- उत्तर अमेरिका - मायामी व लॉस एंजलिस
- युरोप - नीस व मोनॅको

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अ. क्र. २७४९४

समुद्र किनाऱ्यावरील सूर्यस्नान !



# समुद्रकिनाऱ्यावरील प्रेक्षणीय ठिकाणे

बोटीने मी जेव्हा प्रथम मुंबई व लंडन प्रवास केला तेव्हा मला **अरबी समुद्र, तांबडा समुद्र, भूमध्य समुद्र** व नंतर **बिस्केच्या उपसागराचे** दर्शन होऊन आमची बोट **इंग्लिश चॅनल** मध्ये जाऊन **'टिलबरी'** येथे अखेर पोहोचली. तेथून रेल्वेचा दीड तास प्रवास करून आमची स्वारी लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर पोहोचली वाटेत आमची बोट एकएक दिवस **फ्रान्सच्या** दक्षिण किनाऱ्यावर **मारसेल्स** व **जिब्रॉल्टर** येथे थांबली त्यामुळे ही गावे आम्हास सहजपणे पाहता आली जेव्हा आमची बोट फ्रान्सच्या पश्चिमेकडील बिस्केच्या उपसागरातून जात होती तेव्हा नेहमीप्रमाणे हा उपसागर खूपच खवळलेला होता, व सर्वत्र भयानक लाटा दिसत होत्या तेव्हा मात्र समुद्राचे रौद्र स्वरूप कसे असते याची कल्पना आली हा समुद्र नेहमीच कमी-जास्त प्रमाणात खवळलेला असतो व बोटींचे आणि प्रवाशाचे हालहाल करीत असतो

या पहिल्या प्रवासानंतर पुढील परदेशाचा व पृथ्वीचा प्रवास कायम विमानानेच करावा लागला त्यामुळे अटलांटिक, पॅसिफिक इत्यादी महासागरांचा विस्तार आकाशातूनच पहावा लागला समुद्र किनारा म्हणजे Beaches ही एक औरच चीज आहे व भारतीयापेक्षा पाश्चात्यांना याचे जबरदस्त आकर्षण आहे त्यामुळे जेथे जेथे शांत समुद्राकाठी पांढरी मऊ वाळू असेल तेथे हे लोक धावत जातात व अर्धनग्न स्थितीत सूर्याच्या किरणांनी अंग शेकून घेतात आपला गौर वर्ण जितका तांबूस होईल तितका करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात सूर्यकिरणांनी अंग पोळू नये म्हणून निरनिराळ्या प्रकारची लोशन्स, क्रीम्स्, तेले वगैरे अंगाला चोपडून वाळवणासारखे त्या वाळूवर तासन्तास पडून राहतात काही लोक छोटा

ट्रांझिस्टर किंवा टेपरेकॉर्डर कानाजवळ ठेवून पडतात तर इतर काही आवडती पुस्तके घेऊन वाचत रहातात काहीकाही लोक आसपासच्या उघड्या बागड्या स्त्रियाचे सौंदर्य न्याहाळण्याचा आनद लुटत असतात

पाश्चिमात्य लोकाना या सूर्य स्नानाची जितकी मजा वाटते तितकी भारतीयाना वाटत नाही कारण पाश्चिमात्याना वर्षात फारच थोडा काळ सूर्य मिळतो त्याउलट भारतात आपल्या सेवेसी तो सदैव हजर असतो ! ज्या ठिकाणी असे बीचेस् असतात त्या ठिकाणी सुंदर-सुदर, अत्याधुनिक शहरे वसलेली दिसतात व ती स्थळे पर्यटकाचे आकर्षण- स्थान बनली जातात भारतात गोवा, केरळचे काही बीचेस् परदेशी लोकाचे आकर्षण म्हणून दिवसेंदिवस भरभराटीचे होत चालले आहेत मुबईला जरी चौपाट्या आहेत किंवा मद्रासला मरीना बीच आहे तरी तेथे सूर्यस्नानासाठी फारसे लोक न जाता सध्याकाळी फिरण्यासाठी किंवा भेळ-पुरी खाण्यासाठीच जातात

परदेशात अशी स्थळे मोठ्या शहरापासून दूरच असतात व पर्यटक तेथे सुट्टी मजेत घालविण्यासाठी जातात तेथे त्याच्या आवडीची व करमणुकीची खूपच साधने व सोयी उपलब्ध असतात मोठी-मोठी हॉटेल्स् रेस्टॉरटस्, कॅसीनो, नाईट क्लब्स्, करमणुकीचे पार्कस् वगैरे सर्व सोयी उपलब्ध असल्यामुळे साहजिकच लोक आपले रहाते घर सोडून मजा लुटण्यासाठी तिकडे जातात.

जगाच्या पाठीवर हिंडत असताना अशी बरीच ठिकाणे पहाण्याचा मला योग आला त्यातील महत्त्वाची ठिकाणे म्हणजे

## थायलंड - पटाया व सोंखला बीच

पटाया बीच हे ठिकाण बँकॉक पासून दीड तासाच्या

रस्त्यावर असून जपानी व युरोपियन पर्यटकाचे फार आवडते स्थान आहे युनोतर्फे आम्ही जेव्हा दोन वर्षे बँकॉकला राहात होतो तेव्हा पाहुण्याबरोबर पटायाला जाण्याचा योग येई. बँकॉकला Sex Capital of East असेही म्हटले जाते म्हणून तेथे पर्यटकाची फार मोठी आवक-जावक सुरू असते या ठिकाणाला अलीकडे जास्त बाजारी स्वरूप आल्यामुळे लोक खाली दक्षिणेकडे सोंखला या गावी जातात हे गाव स्वच्छ, सुदर असून तेथील बीचेस कमी गर्दीचे व आकर्षक राहिले आहेत

## इंडोनेशिया - बाली बीच

बाली बेटावरील हे ठिकाण फार प्रसिद्ध आहे एकदा ऑस्ट्रेलियाहून परत येताना या ठिकाणी उतरण्याचा मला योग आला हे ठिकाण इडोनेशियात बाली बेटावर **डेनपसार** एअर पोर्टच्या नजीक आहे येथे पाढऱ्या मऊ वाळूच्या सुदर चौपाट्या (बीचेस) आहेत चागली चागली हॉटेल्सही माफक दरात मिळतात येथे ऑस्ट्रेलियन व जपानी पर्यटक फार मोठ्या सख्येने येतात अर्धनग्न स्त्रियाना सूर्य स्नानासाठी ही एक फार आकर्षक जागा वाटते

इडोनेशिया हा देश जरी इस्लामिक असला तरी बाली बेटावर बहुताशी हिंदू सस्कृती अजूनही अस्तित्वात आहे येथे रामाची व इतर पुरातन देवळे आहेत आता ती फार जीर्ण झालेली आहेत बहुताशी लोक गरीबच असल्यामुळे या देवळाची व पुरातन वस्तूची व्हावी तशी देखभाल होत नाही पर्यटकासाठी एक भारतीय पद्धतीचा नाचाचा कार्यक्रम रोज रात्री सादर केला जातो वामनाने जेव्हा आपले तिसरे पाऊल बळी राजाच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळात पाठवले तेव्हा उत्तर गोलार्धातून पृथ्वीच्या पोटातून तो दक्षिण गोलार्धात (म्हणजे पाताळात) बाली बेटावर प्रकट झाला म्हणून या

बेटाला 'बाली' असे नाव पडले

आणि म्हणूनच सर्वत्र इस्लामिक संस्कृती असूनसुद्धा या बेटावर अजून हिंदू संस्कृती टिकून आहे, अशी आख्यायिका आहे

## ऑस्ट्रेलिया : - पर्थ

दोन-तीन वर्षांपूर्वी आम्ही पर्थ या पश्चिम ऑस्ट्रेलियातील एका सुंदर ठिकाणी काही महिने रहात होतो हे शहर फ्रिमँटल या बंदरापासून फक्त दहा मैलावर असून अत्यंत सुंदर, स्वच्छ, आणि शांत असे आहे हे शहर मोठे असले तरी गजबजाट किंवा प्रदूषणमुक्त आहे शहराच्या पश्चिमेला हिंदी महासागर असून दहा-बारा मैलात ४-५ तरी उत्तम बीचेस् आहेत येथे त्या मानाने पर्यटक फार कमी असतात म्हणून बाजारीपणाही नसतो

आम्ही अनिवासी भारतीय असल्यामुळे वर्षातून काही महिने भारताबाहेर रहाणे आवश्यक होते तीन वर्षांपूर्वी, आता बाहेर कोठे रहावयाचे हे ठरवत असताना आम्हाला पर्थ येथे जावे असे वाटले तसे पाहिले तर याला खास कारण असे काहीच नव्हते तरी देखील आम्ही एके दिवशी पहाटे पाच वाजता पर्थ विमानतळावर उतरलो विमानातील सर्व प्रवासी अर्ध्या तासात आपापल्या घरी गेले पर्थ विमानतळ लहान असल्यामुळे व त्यावेळी दुसरी कोणतीच फ्लाईट नसल्यामुळे आम्ही दोघेच सामानासह मोठ्या हॉलमध्ये राहिलो कुठे जायचे हे सूर्योदयानंतर, आठ वाजता आम्ही ठरविणार होतो थोड्या वेळाने एक सरदारजी त्या हॉलमध्ये येऊन कुणाला तरी शोधत होता त्याने आम्हाला, त्याचा चुलता येणार होता तो तुम्हाला दिसला का म्हणून प्रश्न केला त्याला आम्ही, तो दिसला व निघूनही गेला असे सांगितले त्याने घरी फोन केला तेव्हा त्याचा काकाच त्याच्याशी बोलला नंतर आम्हाला एखादे

अपार्टमेंट हाऊस पाहिजे आहे असे म्हटल्यावर तो म्हणाला, ''मला अशी योग्य जागा माहीत आहे'' त्याची स्वत ची टॅक्सी होती व तो पर्थ मध्ये गेली ५ वर्षे राहत होता तो म्हणाला, ''आता इथे बसण्याऐवजी माझ्या घरी चला, नाश्ता करा व नतर मी तुम्हाला योग्य ठिकाणी सोडीन'' त्याच्या बोलण्या चालण्यावरून त्याच्यावर माझा विश्वास बसला व आम्ही सकाळी ७ वाजता त्याच्या टुमदार घरी गेलो त्याच्या बायकोने परोठे व चहा केला व ८।। वाजता आम्ही एका अपार्टमेंट हाऊस मध्ये आलो

काही दिवसांतच आम्हाला दोन मराठी कुटुबे भेटली नंतरचा आमचा तेथील मुक्काम अगदी उत्तम झाला ते गाव आम्हाला इतके आवडले की सहा महिन्यानतर आम्ही एक अपार्टमेंट घेऊन पुन्हा पर्थमध्ये तीन महिने राहिलो

पर्थ शहराच्या मधून 'स्वान' नावाची नदी वहाते या नदीचा काही भाग हसाच्या आकारासारखा दिसतो म्हणून या नदीचे नाव स्वान (हस) असे पडले आहे ती आठ मैलांनतर समुद्राला मिळते म्हणून नेहमी या नदीला भरपूर पाणी असते तेथे एक प्रसिद्ध कॅसीनो आहे व इतरही करमणुकीची बरीचशी ठिकाणे आहेत त्यामुळे वेळ कसा जातो हेच कळत नाही असो

## सिडने

सिडने शहर म्हणजे ऑस्ट्रेलियाची मुबई मुबईसारखा गजबजाट, रेल्वे, मोटारी, बसची सारखी वहातूक व भरपूर लोकवस्ती पण सर्वत्र शिस्त-बद्धता, स्वच्छता व इतर सर्व सोयी सिडनेचा ऑपेरा, टॉवर व इतर बऱ्याच गोष्टी प्रसिद्ध आहेत एक उत्तम व सरक्षित बदर म्हणून सिडनेची ख्याती आहे

शहरापासून मोटारने एक तासाच्या अंतरावर

ऑस्ट्रेलियातील प्रसिद्ध नील पर्वताची (Blue Mountains) उच्च राग अगदी निळ्या आकाशाला भिडते आहे असा भास निर्माण करते या रागेमध्ये शेजारी शेजारी तीन शिखरे दिसतात त्याना तीन बहिणी (Three sisters) असे म्हणतात ज्या ठिकाणाहून हा रम्य देखावा दिसतो तो परिसरही अतिशय सुदर असून तेथे पर्यटकासाठी आठवण म्हणून खास वस्तू विकण्याची सोय केलेली आहे. तेथे एक छोटेसे रेस्टॉरटही असून कॉफीच्या कपाबरोबर तुम्ही निसर्गाशी एकरूपच होता

येथेही समुद्रावर चागले बीचेस् असून लोक मनसोक्त सूर्यस्नानाचा आस्वाद घेतात विशेष म्हणजे ज्या प्रमाणे आपण हिंदुस्तानात उन्हाळा सुरू झाला की थड हवेच्या ठिकाणी जातो त्या उलट परदेशात उन्हाळ्यात सर्व लोक बीचेस्वर जातात सिडनेजवळ एक बीच, न्यूडिस्ट बीच म्हणून प्रसिद्ध आहे असे ऐकिवात आहे

जगातील प्रदूषणामुळे वरती गेलेल्या कार्बन डाय ऑक्साईड या गॅसमुळे अटार्क्टिकवरील भागातील ओझोनच्या आवरणात एक भले मोठे भोक पडले आहे त्यामुळे सूर्यापासून येणाऱ्या अल्ट्रा-व्हॉयलेट (अतिनील) किरणाना या आवरणामुळे होणारा प्रतिबध होत नाही व या किरणाचा पाऊस ऑस्ट्रेलियावर होत असतो याचा अर्थ असा की ऑस्ट्रेलियात रहाणाऱ्या लोकाना अल्ट्रा-व्हॉयलेट किरणाचा उपसर्ग जास्त होतो व कातडीच्या कॅन्सरचा सभव वाढतो सूर्यस्नान करणाऱ्या सर्व ऑस्ट्रेलियनाना ही एक टागती तलवारच आहे हा ओझोनचा थर कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे केसाच्या व इतर गोष्टीच्या स्प्रेसाठी वापरण्यात येणारे CFC 11 व CFC 12 या रसायनाचे फवारे हे होय मॉंट्रीयल येथे झालेल्या आतरराष्ट्रीय करारानुसार या रसायनाचा वापर पुढील पाच वर्षात बद होणार असून त्यामुळे ओझोनचा थर आणखी कमी होऊ दिला जाणार नाही तरी सुद्धा हा थर पुन्हा तयार होऊन हे प्रचड भोक बद

होण्यास निदान शभर वर्षे तरी लागतील असा शास्त्रज्ञाचा अदाज आहे

## फिलिप आयलंडची पेनग्विन परेड

दक्षिणेकडे **मेलबोर्न** जवळ आम्हाला एक अगदी नवीनच दृश्य पहाण्यास मिळाले मेलबोर्नपासून (११२ कि मी ) ७० मैलावर **'फिलीप आयलंड'** नावाचे एक बेट दक्षिण महासागरावर वसलेले आहे तेथे दररोज **''पेंग्विन परेड''** नावाचा एक नैसर्गिक कार्यक्रम पहावयास मिळतो या फिलीप आयलडचे टाऊन प्लॅनर श्री जोशी नावाचे एक मराठी गृहस्थ आहेत त्याच्या निमंत्रणानुसार आमच्या सौ व मी एके दिवशी दुपारी तीन वाजता त्याच्या घरी गेलो ते थडीचे दिवस होते व सूर्यास्ताच्या वेळी आम्ही त्याच्यासह 'पेनग्विन परेड' पाहण्यास गेलो व पक्षी जगातील एक आश्चर्य आम्हाला पहावयास मिळाले ते असे

खरे पाहिले तर पेनग्विन धड प्राणीही नाही किंवा पक्षीही नाही. त्याला पख असतात पण पक्षाप्रमाणे तो उडत नाही दोन पायावर नेहमी लुटूलुटू चालत असतो साधारण तीन-चार फूट उचीचे मोठे पेंग्विन अटार्क्टिकामध्ये बर्फाच्या थड हवेत रहातात त्यांचे मुख्य खाद्य म्हणजे समुद्रातील मासे हे होय त्याचे पोट मऊ व पाढरे शुभ्र असते व ते पाण्यावर तरगत इकडून तिकडे जात असतात

ऑस्ट्रेलियाच्या दक्षिण किनाऱ्यावर त्याच्या वसाहती आहेत मात्र हे पेनग्विन उचीला एक ते दीड फूट इतकेच असतात फिलीप आयलडच्या किनारपट्टीवर जमिनीत मोठी बिळे करून ते आपल्या कुटुबियासह एकेका बिळात रहातात दररोज सकाळी सूर्योदयानतर ते आपल्या बिळातून बाहेर येतात आपण जसे ऑफिसला किवा कामावर जाण्यासाठी बाहेर पडतो तसे । आपल्या पिलाना मात्र ते बिळातच ठेवतात.

ते बाहेर पडल्यावर किनाऱ्यापाशी थव्याथव्याने एकत्र जमतात. त्यामध्ये त्याचा एक पुढारी - 'म्होरक्या' असतो. त्याने इशारा केल्यावर तो थवा समुद्रात भक्ष्य शोधण्यासाठी जातो हे थवे फिलीप आयलडच्या किनाऱ्यापासून ५० ते ६० मैल दूर समुद्रात जातात व लहान मोठे जिवत मासे गिळकृत करून पोटात साठवून ठेवतात सध्याकाळी सूर्यास्ताला सर्व थवे किनाऱ्यावर परत येतात किनाऱ्यावर आल्यावर ते तेथेच आपल्या थव्यातील सवगड्यासाठी थाबतात सर्व सवगडी आल्यानतर आपल्या पुढाऱ्याचा इशारा मिळाल्यावर ढेरपोटाने आपल्या ठराविक बिळात आल्यावर ते पोटात साठवलेले मासे तोंडावाटे बाहेर काढतात व आपल्या पिलांना खाऊ घालतात प्रेक्षकाना पेनग्विन परत येताना पहाता यावे म्हणून, पहाण्यासाठी उच्च गॅलऱ्या बाधून खाली सर्वत्र उजेड पडावा म्हणून दिव्याची सोय केलेली आहे दररोज संध्याकाळी शेकडो प्रेक्षक, पेनग्विन किनाऱ्यावर कसे येतात ? आपापल्या सवगड्यासाठी वाट बघत कसे तिष्ठत उभे राहतात ? म्होरक्याचा इशारा मिळताच आपापल्या बिळाकडे कसे जातात ? हे सर्व पहाण्याचा आनद लुटत असतात या पक्षाचा हा शिस्तबद्ध दैनदिन कार्यक्रम पाहून आपल्यालाही अजून काही शिकण्यासारखे आहे याची जाणीव होते

ऑस्ट्रेलियातून **न्यूझीलंडला** गेल्यावर एकदम सर्व लहान, लहान वाटते तेथील सर्वात मोठे शहर म्हणजे ऑकलड हे टास्मन समुद्राच्या किनाऱ्यावर आहे इतर ठिकाणापेक्षा येथे थडी जरा जास्त असल्यामुळे उन्हाळ्यात समुद्राकाठी सूर्य स्नानासाठी लोक फारच भुकेजलेले असतात शहरानजीक एक टेकडी आहे त्यावर जगातील निरनिराळ्या मोठ्या शहरांच्या दिशा व अंतरे लिहिलेल्या पाट्या आहेत त्या लडन ११,००० (+) मैल, न्यूयॉर्क असेच ६,००० (+) मैल, सिडने १५०० (+) मैल वगैरे अंतरे वाचल्यावर आपण कोठे

येऊन पडलो आहोत असे वाटून मन जरा Home Sick होऊन विषण्ण होते. या देशात काही ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत

वाचकहो, अजून आपल्याला माझ्याबरोबर पुष्कळ प्रवास करावयाचा आहे तरी थोडा वेळ कॉफीची सुट्टी घेऊ या !

## ताहिती व दक्षिण अमेरिका

युनोतर्फे पाराग्वे देशात काम करीत असताना दोन वर्षांनतर होम लीव्ह (घरी जाण्यासाठी रजा) मिळाली आमच्या सौ दीड वर्षांनतरच नातेवाईकाना भेटण्यासाठी माद्रीद-लडनमार्गे पुण्याला गेल्या होत्या या खेपेला पॅसिफिक मार्गे हिंदुस्तानात जाण्याचे मी ठरविले व अधिक पैसे भरून नवीन जग पहाण्याचा बेत केला त्यामुळे दक्षिण पॅसिफिकमधील सुप्रसिद्ध रत्न 'ताहिती' हे बेट पहावयास मिळाले


ताहिती हे बेट न्यूझीलड व दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यापासून साधारण मध्यावर आहे हे बेट जरी इतके दूर आहे तरी तो फ्रान्सचाच एक भाग समजला जातो सर्वत्र फ्रेंच कल्चर व बोली आहे त्याला ''छोटे पॅसिफिक पॅरिस'' असेही म्हणतात या बेटाची राजधानी **'पपेटी'.** हे बेट मध्यभागी खडकाळ डोंगराचे असून त्याच्या सभोवती किनारपट्टीवर ठिकठिकाणी वस्ती आहे. खुद्द पपेटी मध्ये उत्तम हॉटेल्स असून पर्यटकांसाठी खूपच सुविधा आहेत पपेटीच्या आसपास लहान मोठी बेटे आहेत त्यातील काही बेटे श्रीमत अमेरिकन व जपानी लोकानी विकत घेतली आहेत व त्यावर आलीशान बगले बाधले आहेत त्या बेटावर मोटार लॉंचने नाहीतर हेलीकॉप्टरने लोक जातात जगातल्या बाजारीपणाला कटाळून जेव्हा लोकाना एकात हवा असतो तेव्हा तो त्याना याच ठिकाणी मिळतो. मार्लन ब्रँडो हा सिनेनट, हॉवर्ड ह्युजेस इत्यादी

श्रीमंत लोकानी अशी बेटे घेतली असल्याचे तेथील गाईड सागत असतात.


एका लाँचमध्ये बसून व नतर मॅटाडोरने या बेटाभोवती फेरफटका केल्यावर ही जागा एवढी जगप्रसिद्ध का झाली याची कल्पना आली किनाऱ्यावर ठिकठिकाणी पांढरी शुभ्र वाळू, हॉटेल्स्नी आपल्या पाहुण्यासाठी खास राखून ठेवलेले खासगी बीचेस्, मधून मधून छोटी रेस्टॉरंटस्, फ्रेंच कॉफी व गरमागरम अर्धचद्राकृती पॅटीस व इतर लज्जतदार पदार्थ, आईस्क्रीमच्या गाड्या व माफक गर्दी यामुळे पर्यटक अगदी खूष होतात शिवाय तेथील अर्धवट कपडे घातलेल्या पॉलिनेशियन सुदर युवतींचे आगत-स्वागत, सर्वत्र शात वातावरण आपल्याला खरी विश्राती देते बेटावर फिरताना ठिकठिकाणी उच नारळाची झाडे दिसतात त्यावर १०-१२ फूटांवर झाडाच्या खोडाभोवती एक-दोन फूट उच असा अगदी चकचकीत ताबूस पत्रा मारलेला दिसतो असे पत्रे बऱ्याच झाडावर पाहिल्यावर मी आमच्या गाईडकडे 'हे काय आहे ?' अशी विचारणा केली त्यावर तो म्हणतो, ''या भागात बऱ्याच मोठ्या घुशी आहेत व त्या झाडावर चढून कोवळे नारळ खातात व आमचे फार नुकसान करतात या गुळगुळीत पत्र्यामुळे त्याना नीट पकड घेता येत नाही व त्यामुळे त्या घुशी वर चढू शकत नाहीत

आमची मॅटाडोर वाटेत किनाऱ्यानजीक एका उच उडणाऱ्या कारज्याजवळ थाबली हे कारजे निसर्गानेच तयार केलेले होते जेव्हा भरतीची लाट काही दगडी कपारींवर आदळत असे, तेव्हा आतील दगड-रचनेने त्या पाण्याचे एक चुळेसारखे १५-२० फूट उच कारजे तयार होत असे लाट निघून गेल्यावर आपोआप कारजे बद फ्रेंच चित्रकार पॉल गॉगिन याने १८९० मध्ये प्रथम ताहितीला भेट दिली व त्याने तेथील निसर्गसौंदर्याची उत्तमोत्तम चित्रे काढली पुढे दोन वर्षांनी तो पॅरिसला परतला पण तेथे रहाणे त्याला पसत पडेना

फतर अली शांह कापार (१७[illegible]-१८३४) या इरा[illegible]च्या राजासाठीचा राजमुकुट.



हिरे, मोती, पाचू, लाल यांचे वजन ७ पौंडापेक्षा अधिक आहे. (पृष्ठ ८०).



१९६७ मध्ये राज्यारोहणाच्या वेळी सम्राज्ञी फराहसाठी बनवलेला रत्नहार यात १० पाचू, ४ टपोरे मोठे मोती आणि ४८६ हिरे बसवलेले आहेत (पृष्ठ ८०)

तो ताहितीसाठी वेडाच झाला पुन्हा तो परत ताहितीत येऊन त्याने उत्तम चित्रे तयार केली. या चित्रामुळे पर्यटकांचा ओघ या बेटावर वाढू लागला रात्री ठिकठिकाणी खुल्या मैदानावर नाचगाणी चालू असतात व शेकोट्यांभोवती लोक चिकन व फ्रेंच वाईनचा आस्वाद घेत मौजेत वेळ घालवितात ''ताहिती म्हणजे ताहितीच'', या वाक्याचा अर्थ तेथे गेल्यावरच कळतो

## अर्जेंटिना - मार देल प्लाता

दक्षिण अमेरिकेत पुढारलेल्या देशात **ब्राझील** व **अर्जेंटीना** याचा समावेश होतो त्यामानाने आम्ही रहात होतो तो **पाराग्वे** देश थोडा मागासलेला होता परतु कामामुळे दोन्ही देशात मला अधूनमधून जावेच लागे.

अर्जेंटिना हा देश धान्य, फळे, भाज्या, गोमास वगैरे गोष्टींनी समृद्ध असून तेथील ६० टक्के जनसंख्या इटालियन वशजाची आहे बाकी सर्व लोक फ्रेंच, स्पॅनिश, व जर्मन याच्या भेसळीचे आहेत या देशात सर्वत्र स्पॅनिश भाषा बोलली जाते. या देशाची राजधानी **'ब्यूनासायरीस'** असून तेथे देशातील जवळजवळ १/३ म्हणजे ९५ लाख लोक रहातात हे शहर अगदी आधुनिक असून अत्यंत पहाण्यालायक आहे. अर्जेंटिनाच्या पश्चिमेस अटलाटिक महासागर असून राजथानीच्या दक्षिणेस सुमारे २५० मैलांवर ''मार देल प्लाता'' नामक अतिशय सुदर समुद्री शहर अटलाटिक महासागराच्या किनाऱ्यावर वसलेले आहे उन्हाळ्यात नेहमीप्रमाणे हे शहर फुलते व देशातील व परदेशातील लोक समुद्रकिनाऱ्याच्या सफेद वाळूवर सूर्यस्नानासाठी अगदी गर्दी करीत असतात आयुष्य कसे आनदात जगावे हे दक्षिण अमेरिकेच्याच लोकाना माहीत आहे शिवाय हे लोक अगदी मनमोकळे व प्रेमळ आहेत या देशाचा फूटबॉल हा राष्ट्रीय खेळ आहे सध्याचा जगप्रसिद्ध फूटबॉल खेळाडू 'डिएगो मॅरीडोना' हा अर्जेंटिनाचाच

खेळाडू आहे. अजली, आमच्या सौ व मी जेव्हा या ठिकाणी गेलो तेव्हा तेथे अचानक रॉय नावाचे एक कुटुब भेटले श्री रॉय जरी बगाली होते तरी त्याच्या सौ महाराष्ट्रीयन होत्या पुढे ५ वर्षांनतर हेच कुटुब आम्हाला पुन्हा ग्वाटेमाला व नतर न्यूजर्सीमध्ये भेटले

## ब्राझील - रिओ व सांतोस

अर्जेटिनाच्या उत्तरेस **ब्राझील** हा प्रचड मोठा देश पसरलेला आहे. या देशाबद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे. थोडक्यात म्हणजे हा देश नैसर्गिक सपत्तीमध्ये अतिशय सधन असून येथे सर्व तऱ्हेचे हवामान दिसते येथील लोक पोर्तुगीज वशाचे असून त्यामध्ये निग्रो लोकाचे प्रमाणही बरेच आहे सर्वत्र पोर्तुगीज भाषा बोलली जाते येथील लोक स्वाभिमानी, जरा फाजील स्वाभिमानी असून पुष्कळ लोक आपण कोणीतरी खास आहोत अशा थाटात परकियाशी वागतात फूटबॉल हा त्याचा राष्ट्रीय खेळ असून 'पेले' हा जगप्रसिद्ध खेळाडू याच देशाचा आहे दक्षिण अमेरिकेत श्रीमत पण सर्वाधिक कर्जबाजारी हा देश आहे

या देशाची पूर्वीची राजधानी **'रिओ डि जानीअरो'** (रिओ) येथे होती सुमारे वीस वर्षापूर्वी ती **ब्रासिलिआ** या एका अगदी नवीन धर्तीवर बाधलेल्या उत्तरेकडील शहरात हलवली आहे रिओ हे मोठे व अतिशय सुदर शहर अटलाटिकच्या किनाऱ्यावर वसलेले आहे या शहरात पर्यटकाच्या दृष्टीने पहाण्यासारखी अनेक सौंदर्य स्थळे आहेत. तेथे युनोचे एक, दोन सेमिनार व इतर कामामुळे आम्हाला जावे लागले हे शहर दरवर्षी फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या 'कार्निव्हल' साठी जगप्रसिद्ध आहे पुण्यातील अनतचर्तुदशीची मिरवणूक जशी २४ तास चालते, त्याप्रमाणे हे कार्निव्हल सतत ७२ तासापेक्षा अधिक काळ चालते यातील

नाच व सगीताचे कार्यक्रम अगदी नेत्रदीपक असतात. विशेषत. निग्रो कलावताना यावेळी सर्वत्र उधाण आलेले दिसते

आपल्या सध्याच्या लिखाणाच्या दृष्टीने रिओची महती तेथील अत्युत्तम बीचेस् (चौपाट्यावर) आहे. येथील **'कोपाकबाना'** हा बीच अगदी जगप्रसिद्ध आहे. हा बीच नैसर्गिक वाळूचा बनला नसून मोठ-मोठ्या लॉऱ्या वापरून बाहेरून उत्तम प्रतीची वाळू आणून ती सर्वत्र पसरवून बनवलेला आहे. उन्हाळ्यात सकाळ झाली की चटया, खाण्या-पिण्याचे पदार्थ व ट्रँझिस्टर्स घेऊन शेकडो कुटुबे या बीचवर सूर्यस्नानासाठी जाताना दिसतात. मग तिथे, अंगाला सनटॅन लोशन लावून तासन्तास अग भाजून घेतात.

काही लोक पतग, व्हॉलीबॉल खेळताना अगर गॉगल लावून सौंदर्य न्याहाळीत फिरताना दिसतात

पाढऱ्या वाळूशिवाय, ताबूस वाळूचे, लाल वाळूचे व इतर रंगीबेरंगी वाळूचे अनेक बीचेस् रिओच्या परिसरात पहावयास मिळतात थोडक्यात रिओ इतके बीच- सपन्न शहर जगात दुसरे नाही

एकदा रिओला मोटरने जाताना आमच्या ब्राझिलिअन मित्राने आम्हाला दुसऱ्या एका किनाऱ्यावरील प्रसिद्ध स्थळी नेले त्या गावाचे नाव **'सांतोस'** (लोकसंख्या ४ लाख). जगप्रसिद्ध अद्वितीय असा फूटबॉल खेळाडू 'पेले' याचे हे गाव येथील बीचेस्‌ही अगदी प्रेक्षणीय आहेत

## मेक्सिको - अकापुल्को

उत्तर अमेरिकेच्या दक्षिणेस 'मेक्सिको' पासून दक्षिणेस जे देश आहेत त्या सर्व देशात (ब्राझील खेरीज) स्पॅनिश भाषा बोलली जाते माझ्या कामानिमित्त ३-४ वेळा मेक्सिकोत जाण्याचा मला योग आला. राजधानी **मेक्सिको सिटी** हे फार

मोठे शहर असून ७००० फूट उचीवर वसल्यामुळे येथे हवा नेहमीच थड असते जगातील अत्यत प्रदूषित शहरामध्ये या शहराचा समावेश होतो. येथे रिफॉर्मा या प्रमुख रस्त्यावर उत्तमोत्तम पुतळे व कलाकृती बसविल्या आहेत महात्मा गाधींचाही एक पूर्णाकृती पुतळा एका मोठ्या चौकात बसविला आहे

मेक्सिको सिटीच्या दक्षिणेस पॅसिफिकच्या किनाऱ्यावर **'अकापुल्को'** नावाचे एक अत्यत सुदर ठिकाण आहे मेक्सिको सिटीतील प्रदूषण टाळण्यासाठी हजारो लोक या किनाऱ्यावर येऊन स्वच्छ हवेचा आस्वाद घेऊन सूर्य व समुद्र स्नान करतात येथील मरीन ड्राईव्ह मुबईसारखा मोठा असून तेथे मरीन म्युझियम, कन्व्हेन्शन सेटर, कॅसीनो व उत्तम रेस्टॉरटस् आहेत. उत्तर अमेरिकेत जेव्हा कडाक्याची थडी असते तेव्हा हजारो लोक येथील ऊबदार हवेत बीचवर मौज लुटत असतात

इराणचा शहा जेव्हा देश सोडून पळाला तेव्हा काही दिवस येथे आश्रयाला राहिला होता पुढे राजकीय दडपणामुळे हे सुदर शहर त्याला सोडावे लागले

येथील हिल्टन हॉटेलमध्ये गॅलरीसारखी एक खास जागा बाधलेली आहे तेथून खाली सुमारे दोनशे फूट खोलीवर समुद्राच्या लाटा जोराने आपटत असतात वरती अगाभोवती पेटलेल्या मशाली बाधून दोन तरूण उभे असतात. लाटेचे पाणी जेव्हा अरूद कपारीमध्ये येते त्यावेळी एक तरुण वरून सूर मारून त्या पाण्यात जातो हा तरुण सुमारे दोनशे फूट खोल सूर मारून पाण्यात आपल्या मशाली विझवतो त्यानतर दुसरा तरुण पुढील लाटेची वाटच बघत असतो.

## उत्तर अमेरिका - मायामी व लॉस एंजलिस

उत्तर अमेरिकेच्या पूर्व, पश्चिम व दक्षिण किनाऱ्यावर ठिकठिकाणी उत्तम बीचेस असून उन्हाळ्यात व हिवाळ्यात तेथे

नेहमीच गर्दी असते

त्यापैकी **फ्लॉरिडा** व **कॅलिफोर्निया** येथील बीचेस अधिक सुदर व श्रीमत लोकाची आराम करण्याची ठिकाणे म्हणून प्रसिद्ध आहेत दक्षिण अमेरिकेत जाताना आम्हाला वरचेवर मायामीवरून जावे लागे **मायामी** हे शहर क्यूबा, सेंट्रल अमेरिका व दक्षिण अमेरिका येथून येणाऱ्या स्पॅनिश बोलणाऱ्या लोकानी इतके गजबजलेले आहे की शहरात तुम्हाला इग्रजी न येता स्पॅनिश येत असेल तर काहीही अडणार नाही तसे पाहिले तर अमेरिकेची इग्रजीनतर दुसरी राष्ट्रभाषा स्पॅनिशच आहे

मायामी बीचवर मोठमोठी हॉटेल्स आहेत या प्रत्येक हॉटेलने हॉटेलच्या पायऱ्यापासून समुद्रापर्यंत कुपणे घालून त्यातील वाळवट काबीज केलेले आहे त्यामुळे सामान्य जनतेसाठी रिकामी वाळवटे फारच थोडी आहेत मायामीपासून दूर गेल्यानतर मात्र विस्तीर्ण बीचेस् रिकामी सापडतात कितीही झाले तरी या ठिकाणाला फार बाजारी स्वरूप आल्यामुळे मन थोडेसे खिन्नच होते

कॅलिफोर्निआत **'लॉस एंजलीस'** (Los Angeles या स्पॅनिश शब्दाचा अर्थ देवदूत असा आहे) ही ''हॉलीवूड सिनेनगरी'' म्हणून जगप्रसिद्ध आहे येथे श्रीमत लोकाचा फार मोठा भरणा असून सर्व काही उत्तम या भाषेतच बोलले जाते पॅसिफिक किनाऱ्यावरचा **मालिबू** नावाचा बीच फार प्रसिद्ध आहे दिवसभर सूर्यस्नान करण्यात लोक मग्न असतात शनिवारी व रविवारी सर्वत्र अफाट गर्दी असते अर्थात येथे सिनेमा सृष्टीतील कोणीच नट-नट्या कधीच दिसत नाहीत त्या आपल्या बगल्याच्या आवारातच सूर्यस्नान घेत असतात विशेष म्हणजे येथे प्रत्येक बगल्यात किवा चागल्या घराशेजारी एक स्विमिग पूल असण्याची पद्धत आहे ज्या लोकाना नोकर ठेवणे परवडत नाही त्याना या पूलची देखभाल मात्र स्वत च करावी

लागते

वाचकहो, आतापर्यंत आपण माझ्याबरोबर खूप प्रवास केलात परतु भारतात पोचायला अजून आपल्याला काही ठिकाणाना भेट दिल्याशिवाय चालणार नाही म्हणून थोडक्यात त्या ठिकाणाचा समाचार घेऊ या

अमेरिकेतून युरोपला येण्यापूर्वी वेस्ट इडिजला धावती भेट देऊ या क्रिकेटमुळे आपल्याला या भागाशी खूपच जवळीक निर्माण झाली आहे या बेटात **त्रिनिदाद, जमेका, बार्बाडोस, अंटीगा** वगैरे प्रसिद्ध बेटे आहेत व त्या ठिकाणी जाण्याचा मला एक दोनदा योगही आला त्यापैकी उत्तम हवेचे आणि बीचेस असलेले **'बार्बाडोस'** हे छोटे बेट

साधारण १८० चौ.कि मी क्षेत्रफळाचे हे एक छोटे बेट आहे येथील किनाऱ्यावरील पाढरीशुभ्र वाळू जगप्रसिद्ध आहे व थडीच्या दिवसात हजारो अमेरिकन चार्टर विमानाने येथे येत असतात येथे हॉटेल्सही बऱ्यापैकी आहेत

येथून पुढे युरोपमध्ये पोहोचण्याआधी अटलाटिकमध्ये स्पेनच्या ताब्यात असलेली **'कन्हेरी बेटे'** पर्यटकाना फार आवडतात तेथे **'लास पालमास'** व **'तनरीफे'** ही दोन ठिकाणे फार प्रसिद्ध आहेत विशेष म्हणजे या दोन्ही ठिकाणी सिंधी लोकाची बरीच दुकाने असून भारतीय जेवणही चागले मिळते जगातला मोठा विमान अपघात काही वर्षांपूर्वी 'तनरीफे'च्या विमानतळावर झाला होता त्यात एक बोईंग विमान धावपट्टीवर असताना दुसरे बोईंग, त्याचे शीर कापीत उतरले व दोन्ही विमानातील बहुतेक सर्व प्रवासी (४०० च्या आसपास) मृत्यु पावले त्यानतर मात्र सर्व सुरळीत चालू आहे व पर्यटक बिनधास्तपणे तेथे जातात

वाचकहो, आता आपला शेवटचा टप्पा

## युरोप – नीस व मोनॅको

युरोपमध्ये ठिकठिकाणी समुद्रकिनाऱ्यावर लोक सूर्यस्नान करीत असतातच पण सर्वात प्रसिद्ध म्हणजे **फ्रेंच रिव्हेरा.** तेथे **'नीस'**, **'मोनॅको'** ही ठिकाणे फार प्रसिद्ध आहेत चार वर्षापूर्वी आय टी. यू. च्या **'नीस'** येथे भरलेल्या एका मोठ्या परिषदेस जाण्याचा मला योग आला म्हणून भूमध्य समुद्रावरील फ्रान्सच्या दक्षिणेस असलेले हे शहर पाहता आले येथे निसर्ग व मानवाच्या कल्पकतेने समिश्र जीवन पहाता येते शक्य असेल तशा प्रकारचा आनद पर्यटकाना येथे भोगता येतो. समुद्र किनारा, मऊ ऊबदार वाळू, उत्तम बागा, पायी चालण्यासाठी खास ॲव्हेन्यू व खाण्यापिण्याची रेलचेल हे सर्व उपभोगण्यासाठी खिसा थोडा जास्त गरम असावा लागतो

येथून थोड्या अतरावर **'मोनॅको'** नावाचा फक्त २ चौरस मैलाचा एक देश आहे तेथील कॅसीनो जगप्रसिद्ध आहे की जेथे रावाचे रक व काही थोडेच रकाचे राव, एक-दोन रात्रीत होतात श्रीमत अरबी लोकाचे जुगार खेळण्याचे **'मॉंटि कार्लो'** हे ठिकाण येथेच एका डोंगरावर आहे सुप्रसिद्ध सिनेनटी 'ग्रेस केली' ही एकेकाळी या देशाची राणी होती

वरील सौंदर्यस्थळाशिवाय अजूनही काही स्थळाना जाण्याचा मला योग आला, परतु विस्तार भयास्तव हे प्रकरण इथेच सपवितो

❖

# ७. भूगोलाचे आधुनिक पैलू

- राजकीय, व्यापारी व आर्थिक विषयक भूगोल
- लहानपणची रम्य स्वप्ने व आकर्षणे
- लॉर्डस्‌वरील टेस्ट मॅच
- टेनिसवरील वेडे प्रेम
- मॉस्कोतील बोलशाई बॅले
- विश्वसुंदरींची स्पर्धा
- सोने व हिऱ्यामोत्यांची लयलूट
- पिरॅमिडस्‌ व स्फिंक्स
- ईस्टर बेटावरील गूढ पुतळे
- मृत समुद्र

# हिऱ्या मोत्याची लयलूट



# भूगोलाचे आधुनिक पैलू

## राजकीय, व्यापारी व आर्थिक विषयक भूगोल

पूर्वी भूगोल म्हटला की नैसर्गिक गोष्टींना विशेष प्राधान्य असे व राजकीय गोष्टी गौण मानत असत त्या काळी म्हणजे दुसऱ्या महायुद्धापूर्वी जगात राजकीय व आर्थिक घडामोडी फारच थोड्या होत असत. म्हणून जगाच्या नकाशात क्वचित् बदल होत असे परतु १९४५ मध्ये महायुद्ध सपल्यावर युरोपचा नकाशा बदलण्यास सुरुवात झाली काही देश अजिबात नामशेष झाले, काहींची नावे व राजधान्या बदलल्या तर काहींच्या नव्या सरहद्दी निर्माण झाल्या १९४७ मध्ये भारत ब्रिटीश राजवटीपासून स्वतत्र झाला व ब्रिटीश साम्राज्याच्या ऱ्हासाला सुरुवात झाली जगाच्या नकाशावरील ब्रिटीशाचा लाल गुलाबी रग उडू लागला व पुढील वीस वर्षात स्वतंत्र राष्ट्राचे निरनिराळे रग नकाशावर दिसू लागले. या देशांची व राजधान्याची ब्रिटीशांनी ठेवलेली नावेही बदलली फ्रेंच साम्राज्यही मोडकळीला येऊन आफ्रिकेचा नकाशाही बदलला. गेल्या दहा वर्षात रशियन राजवट बदलून तेथे नवी दहा राष्ट्रे निर्माण झाली व गेल्या वर्षीच युरोपच्या नकाशावरील युगोस्लाव्हिया देश नाहीसा होऊन त्या जागी दोन-तीन तरी नवीन देश येणार असे दिसू लागले

या सर्व घडामोडींमुळे नकाशे तयार करणाऱ्या कपन्याची फारच धावपळ झाली आहे व भितीवरील नकाशे वरचेवर बदलावे लागत आहेत पूर्वी एकदा ॲटलास घेतला की त्याची नवीन आवृत्ती निदान वीस वर्षे तरी घ्यावी लागत नसे परतु आता तो काळ गेला

राजकीय उलाढालीनतर गेल्या वीस वर्षांत जगात

व्यापारी व आर्थिक उलाढाली फार मोठ्या प्रमाणावर होऊन काही देश एकत्र येऊन त्यानी व्यापारी सघ निर्माण केले प्रथम युरोपियन कॉमन मार्केटची स्थापना झाली तेव्हा त्यात फक्त सहा-सात श्रीमत देशच होते नतर त्यात स्पेनसारख्या मध्यम राष्ट्राना प्रवेश मिळाला दक्षिण अमेरिकेत अँडीज पर्वताच्या छायेतील राष्ट्रानी अँडिअन ग्रुप तयार केला मध्य अमेरिकेतील ५ देशाचा आणखी एक सघ तयार झाला आशियात आसिआन व नतर सार्क सघ निर्माण झाले आफ्रिकेतही नावापुरते तरी काही सघ निर्माण झाले. नुकताच अमेरिका, कॅनडा व मेक्सिको याच्यात व्यापारी करार होऊन त्याचा एक बलवान सघ अस्तित्वात आला दुसरीकडे जगातील G7 नामक सात श्रीमत राष्ट्राची एक सघटना व G 15 व Group of 77' नामक निम श्रीमत राष्ट्राच्या सघटना याच व्यापार आणि आर्थिक तत्त्वावर स्थापन झाल्या आहेत १५ एप्रिल १९९४ रोजी भारतासह १२५ देशाच्या व्यापार मत्र्यानी गॅट करारावर सह्या करून एक नवीनच बहुराष्ट्रीय व्यापार यत्रणा अस्तित्वात आणली आहे

वरील राजकीय, व्यापारी व आर्थिक सघटनाचे वेगवेगळ्या रगातील नकाशे लवकरच उपलब्ध होतील अशी आशा बाळगू या जरी वरील प्रमाणे बदल झाले असले तरी जगात ज्या काही ठळक गोष्टी होत्या त्या बहुताशी तशाच राहिल्या आहेत माझ्या जगपर्यटनात यातील ज्या काही वेगळ्या ठिकाणाना मला जाण्याचा योग आला त्याचाच गोषवारा पुढे देत आहे यामध्ये ज्या ठिकाणी नेहमीच पर्यटक जातात व ज्या स्थळाची माहिती सर्वत्र उपलब्ध आहे त्या ठिकाणी जरी मला जाण्याचा योग आला होता तरी त्याची माहिती येथे दिलेली नाही, पण जेथे साधारणत लोक जात नाहीत अशा ठिकाणाचीच माहिती पुढे देत आहे

## लहानपणची रम्य स्वप्ने व आकर्षणे

लहानपणापासून नकाशे पाहात असताना अगर प्रवास वर्णने वाचताना, सिनेमा किवा टी व्ही पहात असताना ज्या

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

(ठाणे जिल्हा वाचनालय)

नेताजी सुभाष पथ, ठाणे

## सभेची सूचना

दि ११ फेब्रुवारी १९९६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरल्यानुसार सस्थेच्या सर्व सभासदाचे नौपाडा शाखा स्वतत्र करण्याबाबत मत आजमावण्यासाठी एक सभा सस्थेच्या सरस्वती मदीर सभागृहात बुधवार दि १६-०९-९८ रोजी सायकाळी ७ वाजता आयोजित केलेली आहे तरी सर्व सभासदानी आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी उपस्थित रहावे, ही विनती

पाडुरग केशव दातार

अध्यक्ष

मराठी ग्रथ सग्रहालय, ठाणे

पैल

व्यापारी व आर्थिक उलाढाली फार मोठ्या प्रमाणावर होऊन काही देश एकत्र येऊन त्यानी व्यापारी सघ निर्माण केले प्रथम युरोपियन ... त्याली तेव्हा त्यात फक्त सहा-सात

राष्ट्राना

छाये

५

आि

नाव

कॅनड

बलट

नामव

आि

रोजी

सह्य

आ

वेग

अ

ज

र

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

(ठाणे जिल्हा वाचनालय)

नेताजी सुभाष पथ, ठाणे

## सभेची सूचना

दि ११ फेब्रुवारी १९९६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरल्यानुसार सस्थेच्या सर्व सभासदाचे नौपाडा शाखा स्वतत्र करण्याबाबत मत आजमावण्यासाठी एक सभा सस्थेच्या सरस्वती मदीर सभागृहात बुधवार दि १६-०९-९८ रोजी सायकाळी ७ वाजता आयोजित केलेली आहे तरी सर्व सभासदानी आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी उपस्थित रहावे, ही विनती

पाडुरग केशव दातार

अध्यक्ष

मराठी ग्रथ सग्रहालय, ठाणे

नाहीत

मी अनु

## लहानपणची रम्य स्वप्ने व आकर्षणे

लहानपणापासून नकाशे पाहात असताना अगर प्रवास वर्णने वाचताना, सिनेमा किंवा टी व्ही पहात असताना ज्या ठिकाणचे मला खास आकर्षण वाटे किंवा ज्या ठिकाणची स्वप्ने मन रगवीत असे, अशा काही स्थळाची स्वप्ने कशी साकार होत गेली ते पहा

## लॉर्डस्‌वरील टेस्ट मॅच

आमच्या लहानपणी जेव्हा क्रिकेट सामन्याची रेडिओवरील धावती वर्णने ऐकूनच समाधान मानावे लागे तेव्हा इग्लड विरूद्ध ऑस्ट्रेलियाची टेस्ट मॅच पहायला मिळणे म्हणजे 'क्रिकेट मधील उच्च शिखर' असे वाटे सुदैवाने जेव्हा १९५६ मध्ये मी प्रथम इग्लडला गेलो तेव्हा ऑस्ट्रेलियन टीम इग्लडमध्ये आली होती. तेव्हा एक दिवस आठ पौंड खर्चून मला लडनच्या लॉर्डस् ग्राऊडवर चालू असलेल्या टेस्ट मध्ये पीटर मे व इतर खेळाडूचा खेळ पहावयास मिळाला त्या वयात ही असाध्य गोष्ट शक्य झाली म्हणून केवढा आनद !

त्याचप्रमाणे जगातील मोठे व प्रसिद्ध क्रिकेट स्टेडियम पहाण्याचीही मला जबर इच्छा होती गेल्या वर्षापर्यंत मेलबोर्नचा स्टेडियम सर्वात मोठा समजला जात असे. तो पाहिल्यावरचा आनद फार काळ टिकला नाही कारण त्यानंतर कलकत्याच्या इडन गार्डनला एक लाख प्रेक्षक मॅच बघतील असा भव्य स्टेडियम तयार झालेला आहे पाहू या केव्हा तो स्टेडियम पाहता येईल ! बार्बाडोसला गेलो असताना ब्रिज टाऊन येथील केन्सींग्टन ओव्हल ग्राऊडवर असलेला 3W स्टॅंड जरी उशीर झाला होता तरी पाहता आला वेस्ट इडिज क्रिकेटचे तीन अजरामर हिरे वॉलकॉट, वीक्स् आणि वॉरिल याचे नाव या 3W स्टॅंडने क्रिकेट क्षेत्रात अजरामर केले आहे

## टेनिसवरील वेडे प्रेम

मी पूर्वी बऱ्यापैकी टेनिस खेळत असल्याने त्या खेळाचेही मला जबदरस्त आकर्षण होते व अजूनही आहे बोटीने ज्या दिवशी मी प्रथम लंडनला पोहोचलो त्या दिवशी क्वीन्स क्लबवर (विबल्डनच्या आधी) ल्यू होड व केन रोझवॉल या जगातील 'नबर १ व २' या खेळाडूची फायनल मॅच होती दुपारी बाराच्या सुमारास एकवीस दिवसाचा बोटीचा प्रवास करून लडनमध्ये अर्लस्कोर्ट नजीक एका खोलीत माझे सामान ठेवून तडक वाट शोधीत, बसने मी क्वीन्स क्लबवर पोहोचलो दुपारी साडेतीन वाजता या जगप्रसिद्ध जोडीची फायनल मॅच पाहिली सुदैवाने त्या दिवशी अमेरिकेची निग्रो खेळाडू अलथिया गिब्सन हिचा खेळही पाहण्यास मिळाला

पुढल्या आठवड्यात विंबल्डनच्या मॅचेस सुरू झाल्या तेथील सेंटर कोर्टची तिकीटे दोन-तीन महिने आधीच विकली जातात हे ऐकल्यामुळे तेथील मॅच पहाणे ही फारच दुरापास्त गोष्ट होती. तरी देखील प्रयत्न म्हणून एकदा दुपारी ट्यूबने विबल्डन स्टेशनवर गेलो. तेथून विबल्डन कोर्टवर जाण्यासाठी विभागीत टॅक्सी मिळत व माणशी दीड पौंडात टेनिस कोर्टापर्यंत जाता येत असे तशा टॅक्सीतून मी जेव्हा उतरू लागलो तेव्हा एक गोरा माणूस माझ्याकडे आला व त्याने "सेंटर कोर्टाचे त्या दिवशीचे तिकीट पाहिजे काय ?" म्हणून विचारले अशा तऱ्हेने भारतात सर्रास तिकीटे मिळतात हे मला जरी ठाऊक होते तरी साहेबाच्या देशातही असे धदे चालतात काय म्हणून मला शका आली ते तिकीट त्याने सोळा पौंडाना देतो म्हटल्यावर मी उगाचच दहा पौंडाला दे असे म्हटले, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तो कबूल झाला व माझ्या बरोबर अगदी सेंटर कोर्टपर्यंत आला त्या दिवशी सेंटर कोर्टवर रामनाथन कृष्णन् आणि येरेसोलाव्ह ड्रॉब्नीची मॅच पहावयास मिळाली

## मॉस्कोतील बोलशाई बॅले

बॅले नृत्यात रशियन बॅले म्हणजे जगात सर्वश्रेष्ठ समजला जातो त्यातल्या त्यात मॉस्कोमधील बोलशाई थिएटर म्हणजे सर्वोत्तम समजले जाते मॉस्कोत बोलशाई थिएटरमध्ये बॅले पहाणे एक अतिरंजित स्वप्नच होते परतु तसा योग एकदा आला फेब्रुवारी १९७० मध्ये एका कॉन्फरन्ससाठी मी भारत सरकारतर्फे जिनिव्हाला गेलो होतो व पुढल्या महिन्यात मॉस्कोला जाण्यासाठी जे शिष्टमंडळ जाणार होते त्यात माझी निवडही झाली होती रशियन शिष्टमडळाचा मुख्य कॉ बदालॉफ याची व माझी आधीपासूनच चांगली ओळख होती बोलशाईची तिकीटे सुद्धा आधी एक-दोन महिने काढावी लागतात असे मी वाचले होते म्हणून मी बदॉलॉफला माझा मनोदय सांगितला मॉस्कोला तोच आमचा यजमान असल्यामुळे एके संध्याकाळी माझे सहकारी श्री. भटनागर आणि मी बदॉलॉफच्या पत्नीसह बोलशाईमध्ये ''गिझेल'' नावाचा बॅले पाहू शकलो एवढ्या कम्युनिस्ट देशात बायका अगदी नटून-थटून, सेंट लावून आलेल्या पाहिल्यावर ही कम्युनिस्ट राज्यात ''और चीज'' आहे असे वाटू लागले.

## विश्वसुंदरींची स्पर्धा

मुलींचे सौंदर्य, त्याची गुणवत्ता, त्याचा एकदर आब, शरीर सौष्ठव इत्यादि गोष्टींना अलिकडच्या जगात फार महत्त्व प्राप्त झाले आहे त्यामुळे या सर्व गोष्टींची जोपासना व प्रगती याकडे तरुण मुलींचे, त्यातल्या त्यात १८ ते २४ वयोगटातील मुलींचे अधिकाअधिक लक्ष वेधले जात आहे त्याच्या भरीला वेगवेगळ्या कपड्याच्या प्रदर्शनात अशा सुदर मुलींना खूपच वाव मिळतो सध्याच्या जाहिरात युगात वेगवेगळी लोशन्स, साबण, क्रीम्स वगैरे सौंदर्य प्रसाधनाचा वापर व रगीत फोटोग्राफी याना तर अगदी उतच आलेला दिसतो

शाळा, कॉलेज, मोठमोठ्या कंपन्यामध्ये व अनेक शहरात अशा सौंदर्यस्पर्धा दरवर्षी वेगवेगळ्या प्रकाराने घडवून आणतात व त्यात ज्या युवती जिकतात त्याना चागली बक्षिसे, मानसन्मान, नोकऱ्या मिळू लागल्या आहेत भारतात **'फेमिना'** ची सौंदर्यस्पर्धा फार प्रसिद्ध आहे व त्यात ज्या युवती निवडल्या जातात त्याना जगातील **'मिस वर्ल्ड'** व सर्वात मोठी म्हणजे **'विश्वसुंदरी'** (मिस युनिव्हर्सची) स्पर्धा जिकण्यासाठी पाठविण्यात येते अशी एखादी मोठ्या दर्जाची स्पर्धा पहाणे म्हणजे परमभाग्य असे समजले जाते सुदैवाने ते भाग्य १९७५ मध्ये आमच्या वाट्याला आले होते

त्या दोन वर्षात (१९७४-७६) युनोतर्फे माझी मध्य अमेरिकेतील सात देशासाठी रिजनल सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती व माझे मुख्य कार्यालय एल् साल्वाडोर देशात **सान साल्व्हाडोर** येथे होते मला कामानिमित्त **ग्वाटेमाला, निकारागवा, कोस्टारिका, हौंड्यूरस्, पनामा** व **बेलिझ** या देशात वरचेवर जावे लागे या सर्व देशांत स्पॅनिश हीच भाषा वापरली जात असे फक्त बेलिझमध्ये इग्रजीचा वापर होत असे. त्यावेळी सालव्हाडोरमध्ये आमच्या दोघाबरोबर आमचा मुलगा जयत हा होता व तेथील मेकॅन एरिक्सन या ॲडव्हर्टायझिग कपनीत नोकरीवर होता


मिस युनिव्हर्सची स्पर्धा जाहीर झाल्याबरोबर ४ दिवसाची आम्ही सीझन तिकीटे काढली होती त्यावेळी भारतातून 'मिस इडिया'ची स्पर्धकही आलेली हेती शेरेटन हॉटेलमध्ये या सर्व सुदऱ्या उतरल्या होत्या त्यावेळी साल्व्हाडोरमध्ये विशेष कोणी भारतीय रहात नसल्यामुळे आम्ही मिस् इडियाला (ही मुलगी बेंगलोरच्या एका एअर फोर्स ऑफिसरची मुलगी होती ) शेरेटनमध्ये भेटल्यावर तिला अतिशय आनद झाला या ओळखीमुळे, शेरेटनमध्ये त्या स्पर्धकाचे जे खाजगी कार्यक्रम चालत तेथे जाण्याला आम्हाला



कोलबियाच्या सुदरीबरोबर श्री जयत गोगटे. (पृष्ठ ७९)

श्री व सौ गोगटे याच्या मध्ये उभे असलेले श्री बदालॉफ श्री गोगटे याच्या डावीकडे बदालॉफ यांची सेक्रेटरी (पृष्ठ ७७)





रगीत दिव्यानी प्रकाशित केलेले दिल्लीतील बहाई मदिर (पृष्ठ ९२)

ॲझ्टेक साम्राज्यातील सूर्याचा पिरॅमिड पायथ्याशी सुमारे ७०० फूट लाब-रुद असलेला हा पिरॅमिड २०० फुटाहून अधिक उच आहे (पृष्ठ १०२)



पूर्ण मुभा मिळत होती नाहीतर इतराना पूर्ण मज्जाव व कडेकोट बदोबस्त होता

स्पर्धेचा पूर्ण सोहोळा प्रत्यक्ष पाहून आम्हाला मनस्वी समाधान तर झालेच परतु कित्येक सुदरींच्या ओळखी होऊन आम्ही त्याच्यासमवेत चहापानही करू शकलो एका नृत्य समारभात तर काही सुदरींच्या बरोबर जयत नाचतही होता व पुढील काही दिवस त्याचे पाय जमिनीवर नव्हतेच.

त्या वर्षी मिस् फिनलड ही विश्व सुदरी म्हणून निवडण्यात आली होती

## सोने व हिऱ्या-मोत्यांची लयलूट

हातामध्ये सोन्याच्या चार बागड्या, गळ्यात सहापदरी मोठा हार पाहिल्यावर पतिराजांना किती बरे वाटते याचा अनुभव पुष्कळ लोकांना आलेला असेलच ! पण सराफाच्या दुकानातील काचेच्या कपाटातील अनेक अशा वस्तू पाहिल्यावर आपल्याकडे काहीच नाही असे वाटू लागते पुढे दुबई किवा मस्कतच्या 'सूक' (सराफी बाजार) मध्ये गेल्यावर एकामागून एक अशा पाच-पचवीस दुकानात असे शेकडो सोन्याचे दागिने काचेच्या कपाटात विद्युत् प्रकाशात लखलखताना पाहिले की वाटते आपण निराळ्याच जगात किवा सुवर्ण नगरीतच वावरत आहोत दृष्टीला एकावेळी इतके सोन्याचे दागिने पहाणे म्हणजे आपण भाग्याचेच लक्षण समजतो

हिऱ्या-मोत्याचा प्रकार मात्र अगदी औरच आहे कुठल्याही झवेऱ्याकडे एका वेळेला हिरे-मोती माफक प्रमाणातच दिसतात परतु एखाद्या काचेच्या खोलीत द्राक्षाचे घड लावल्याप्रमाणे शे-दोनशे मोत्याचे, विद्युत् प्रकाशात चमकणारे घड आपण पाहिले तर काय म्हणाल ? असे दृश्य पहाण्याचा सुयोग मला एकदा आला तो म्हणजे तेहेरानला. एकदा मुंबईहून जिनिव्हाला जाताना वाटेत तेहेरानला दोन दिवस

शाळा, कॉलेज, मोठमोठ्या कंपन्यामध्ये व अनेक शहरात अशा सौंदर्यस्पर्धा दरवर्षी वेगवेगळ्या प्रकाराने घडवून आणतात व त्यात ज्या युवती जिकतात त्याना चांगली बक्षिसे, मानसन्मान, नोकऱ्या मिळू लागल्या आहेत भारतात **'फेमिना'** ची सौंदर्यस्पर्धा फार प्रसिद्ध आहे व त्यात ज्या युवती निवडल्या जातात त्याना जगातील **'मिस वर्ल्ड'** व सर्वात मोठी म्हणजे **'विश्वसुंदरी'** (मिस युनिव्हर्सची) स्पर्धा जिकण्यासाठी पाठविण्यात येते अशी एखादी मोठ्या दर्जाची स्पर्धा पहाणे म्हणजे परमभाग्य असे समजले जाते सुदैवाने ते भाग्य १९७५ मध्ये आमच्या वाट्याला आले होते

त्या दोन वर्षात (१९७४-७६) युनोतर्फे माझी मध्य अमेरिकेतील सात देशासाठी रिजनल सल्लागार म्हणून नेमणूक झाली होती व माझे मुख्य कार्यालय एल् साल्वाडोर देशात **सान साल्व्हाडोर** येथे होते मला कामानिमित्त **ग्वाटेमाला, निकाराग्वा, कोस्टारिका, हौंड्यूरस्, पनामा** व **बेलिझ** या देशात वरचेवर जावे लागे या सर्व देशात स्पॅनिश हीच भाषा वापरली जात असे फक्त बेलिझमध्ये इंग्रजीचा वापर होत असे त्यावेळी सालव्हाडोरमध्ये आमच्या दोघाबरोबर आमचा मुलगा जयत हा होता व तेथील मेकॅन एरिक्सन या ॲडव्हर्टायझिग कपनीत नोकरीवर होता

मिस युनिव्हर्सची स्पर्धा जाहीर झाल्याबरोबर ४ दिवसाची आम्ही सीझन तिकीटे काढली होती त्यावेळी भारतातून 'मिस इंडिया'ची स्पर्धकही आलेली हेती शेरेटन हॉटेलमध्ये या सर्व सुदऱ्या उतरल्या होत्या त्यावेळी साल्व्हाडोरमध्ये विशेष कोणी भारतीय रहात नसल्यामुळे आम्ही मिस् इडियाला (ही मुलगी बेंगलोरच्या एका एअर फोर्स ऑफिसरची मुलगी होती) शेरेटनमध्ये भेटल्यावर तिला अतिशय आनद झाला या ओळखीमुळे, शेरेटनमध्ये त्या स्पर्धकाचे जे खाजगी कार्यक्रम चालत तेथे जाण्याला आम्हाला

थाबण्याची १९७० मध्ये मला सधी मिळाली त्यावेळी इराणचा शहा गादीवर होता व तेहेरान अगदी अत्याधुनिक करण्याचा त्याने चगच बाधला होता अमेरिकेच्या धर्तीवर सर्व काही इराणमध्ये असले पाहिजे ही त्याची जबर इच्छा होती धार्मिक रूढीने लोक दबून मागासलेले रहावेत हे त्याला पसत नव्हते सर्व रस्ते, वहाने, टेलिफोनच्या सोयी, दुकाने वगैरे अगदी अत्याधुनिक असावीत हा त्याचा प्रयत्न तेलामुळे देशात भरपूर पैसाही येत होता.

तेहेरानचे त्या वेळचे खास आकर्षण म्हणजे हिऱ्या, मोत्याचे म्युझियम अगदी आधुनिक पद्धतीने बांधलेले हे म्युझियम म्हणजे तत्रज्ञानाची एक परिसीमाच होती. दोन मोठ्या हॉल्समध्ये साधारण १५ x १० x १० फूट आकाराच्या, सर्वत्र काचा व आरसे यानी तयार केलेल्या व विद्युत् प्रकाशाने लखलखणाऱ्या काही खोल्या बाधलेल्या होत्या काही ठिकणी छतापासून खाली लोंबकळते, वेगवेगळ्या आकाराचे मोत्यांचे घोस द्राक्षाच्या घडाप्रमाणे अत्यंत प्रेक्षणीयरित्या टागलेले दिसत मध्यभागी टेबलावर त्याचे दागिने, हार व इतर कलाकुसरीचे ऐवज मांडलेले होते

पुढल्या खोल्या हिऱ्या-माणकानी भरलेल्या होत्या आपण कानातल्या कुड्यातील सात, सात हिरे किंवा गळ्यातले पेंडट किंवा हिऱ्याच्या एक-दोन बांगड्या पाहून दिपून जातो परतु इथे चादीच्या ताटात वेगवेगळ्या आकाराच्या पैलू पाडलेल्या हिऱ्याच्या राशी दिसू लागल्या. दुसऱ्या खोलीत वेचक पैलू पाडलेले व निळा प्रकाश परीजणारे टप्पोरे सुटे हिरे एका टेबलावर माडून ठेवलेले होते त्यानतर हिऱ्याचे कित्येक तऱ्हेचे हार, दागिने, अगठ्या वगैरे अनेक ऐवज पाहिल्यावर मनाची काय स्थिती झाली असेल याची वाचकहो कल्पनाच करा जगातल्या सुदर, मोठ्या व किंमती हिऱ्याची इथे जणू काय स्पर्धाच चालू होती.

या हॉलमध्ये सर्वत्र आधुनिक पद्धतीने व इलेक्टॉनिक उपकरणे वापरून अगदी कडेकोट बदोबस्त केलेला होता एवढा मोठा खजिना पाहिल्यावर हिऱ्या माणकाकडे पाहण्याची माझी दृष्टी मात्र पार बदलून गेली !

## पिरॅमिडस् व स्फिंक्स

वाचकहो, इतर आणखी एकदोन ठिकाणाच्या भेटीचे मोहक वर्णन करून हे प्रकरण येथेच सपवितो

**कायरो** ही **इजिप्तची** राजधानी असून, ६५ लाख वस्तीचे हे शहर आफ्रिकेत सर्वात मोठे शहर समजले जाते नाईल नदी शहरामधून जाते व तिच्या पश्चिमेला नवे शहर व पूर्वेला जुने शहर वसलेले आहे दिल्ली आणि कायरोमध्ये मला नेहमी खूपच साम्य आढळते

दिल्लीप्रमाणे अगदी पुरातन व आधुनिक स्थळे जवळ जवळ असून दोन्ही शहरे नदीकाठी वंसलेली आहेत दोन्ही शहरात, नव्या भागात रुद रस्ते व आधुनिक इमारती, पण जुन्या भागात (जुन्या दिल्लीप्रमाणे गजबजलेले) अरुद व जुनाट रस्ते दिसतात हातगाडीपासून सर्व तऱ्हेची वहाने दाटीदाटीने, वाट काढीत मंद गतीने पुढे सरकत असतात व रस्त्यावर बाजूला उभे राहून हातगाडीवरील स्वादिष्ट पदार्थ खाण्यात लोक गर्क असतात.

कायरो शहरात पुरातन वस्तूचे व पुतळ्याचे एक सुदर म्युझियम आहे की जे पाहिल्यावर- इजिप्तच्या वैभवशाली गतकाळाची साक्ष पटते शहरापासून थोड्याच अतरावर प्रसिद्ध **पिरॅमिडस्** पहाता येतात त्यांची बाधणी, वापरण्यात आलेली आयुधे, व वाळवटात एवढी प्रचंड कलाकृती पहाताना मन थक्क होते व जगातील ७ आश्चर्यपैकी हे एक आहे याची पुन्हा खात्री पटते हे **गिझा पिरॅमिडस्** नाईलच्या काठाजवळच असून जवळ जवळ ४००० वर्षांपूर्वी बाधलेले आहेत. त्यातील

थाबण्याची १९७० मध्ये मला सधी मिळाली त्यावेळी इराणचा शहा गादीवर होता व तेहेरान अगदी अत्याधुनिक करण्याचा त्याने चगच बाधला होता अमेरिकेच्या धर्तीवर सर्व काही इराणमध्ये असले पाहिजे ही त्याची जबर इच्छा होती धार्मिक रूढीने लोक दबून मागासलेले रहावेत हे त्याला पसत नव्हते सर्व रस्ते, वहाने, टेलिफोनच्या सोयी, दुकाने वगैरे अगदी अत्याधुनिक असावीत हा त्याचा प्रयत्न तेलामुळे देशात भरपूर पैसाही येत होता

तेहेरानचे त्या वेळचे खास आकर्षण म्हणजे हिऱ्या, मोत्याचे म्युझिअम अगदी आधुनिक पद्धतीने बाधलेले हे म्युझियम म्हणजे तत्रज्ञानाची एक परिसीमाच होती. दोन मोठ्या हॉल्समध्ये साधारण १५ x १० x १० फूट आकाराच्या, सर्वत्र काचा व आरसे यानी तयार केलेल्या व विद्युत् प्रकाशाने लखलखणाऱ्या काही खोल्या बाधलेल्या होत्या काही ठिकणी छतापासून खाली लोंबकळते, वेगवेगळ्या आकाराचे मोत्यांचे घोस द्राक्षाच्या घडाप्रमाणे अत्यत प्रेक्षणीयरित्या टागलेले दिसत मध्यभागी टेबलावर त्यांचे दागिने, हार व इतर कलाकुसरीचे ऐवज मांडलेले होते.

पुढल्या खोल्या हिऱ्या-माणकानी भरलेल्या होत्या आपण कानातल्या कुड्यातील सात, सात हिरे किंवा गळ्यातले पेंडट किंवा हिऱ्याच्या एक-दोन बांगड्या पाहून दिपून जातो परंतु इथे चादीच्या ताटात वेगवेगळ्या आकारांच्या पैलू पाडलेल्या हिऱ्यांच्या राशी दिसू लागल्या. दुसऱ्या खोलीत वेचक पैलू पाडलेले व निळा प्रकाश परीजणारे टप्पोरे सुटे हिरे एका टेबलावर माडून ठेवलेले होते त्यानतर हिऱ्यांचे कित्येक तऱ्हेचे हार, दागिने, अगठ्या वगैरे अनेक ऐवज पाहिल्यावर मनाची काय स्थिती झाली असेल याची वाचकहो कल्पनाच करा. जगातल्या सुंदर, मोठ्या व किंमती हिऱ्याची इथे जणू काय स्पर्धाच चाल होती

या हॉलमध्ये सर्वत्र आधुनिक पद्धतीने व इलेक्टॉनिक उपकरणे वापरून अगदी कडेकोट बंदोबस्त केलेला होता. एवढा मोठा खजिना पाहिल्यावर हिऱ्या माणकाकडे पाहण्याची माझी दृष्टी मात्र पार बदलून गेली !

## पिरॅमिडस् व स्फिंक्स

वाचकहो, इतर आणखी एकदोन ठिकाणाच्या भेटीचे मोहक वर्णन करून हे प्रकरण येथेच संपवितो

**कायरो** ही **इजिप्तची** राजधानी असून, ६५ लाख वस्तीचे हे शहर आफ्रिकेत सर्वात मोठे शहर समजले जाते नाईल नदी शहरामधून जाते व तिच्या पश्चिमेला नवे शहर व पूर्वेला जुने शहर वसलेले आहे दिल्ली आणि कायरोमध्ये मला नेहमी खूपच साम्य आढळते.

दिल्लीप्रमाणे अगदी पुरातन व आधुनिक स्थळे जवळ जवळ असून दोन्ही शहरे नदीकाठी वसलेली आहेत दोन्ही शहरात, नव्या भागात रुंद रस्ते व आधुनिक इमारती, पण जुन्या भागात (जुन्या दिल्लीप्रमाणे गजबजलेले) अरुंद व जुनाट रस्ते दिसतात हातगाडीपासून सर्व तऱ्हेची वहाने दाटीदाटीने, वाट काढीत मंद गतीने पुढे सरकत असतात व रस्त्यावर बाजूला उभे राहून हातगाडीवरील स्वादिष्ट पदार्थ खाण्यात लोक गर्क असतात.

कायरो शहरात पुरातन वस्तूचे व पुतळ्यांचे एक सुंदर म्युझियम आहे की जे पाहिल्यावर. इजिप्तच्या वैभवशाली गतकाळाची साक्ष पटते शहरापासून थोड्याच अंतरावर प्रसिद्ध **पिरॅमिडस्** पहाता येतात त्याची बांधणी, वापरण्यात आलेली आयुधे, व वाळवटात एवढी प्रचंड कलाकृती पहाताना मन थक्क होते व जगातील ७ आश्चर्यापैकी हे एक आहे याची पुन्हा खात्री पटते हे **गिझा पिरॅमिडस्** नाईलच्या काठाजवळच असून जवळ जवळ ४००० वर्षांपूर्वी बांधलेले आहेत त्यातील

तीन पिरॅमिडस् सर्वात मोठे म्हणजे चारशे फुटापेक्षा अधिक उच असून पाच हेक्टर भूभागावर दगडानी बाधलेले आहेत पूर्वीचे महान राजे मृत्यूनतर आपले दफन आपल्या जडजवाहिरासह यामध्ये व्हावे म्हणून एवढे भव्य पिरॅमिडस् बाधत असत. त्यात तळाशी काही राण्याचीही थडगी बाधलेली आहेत.

जवळच **'स्फिंक्स'** नावाचा एक अजस्त्र पण अतिशय सुबक असा आडवा पुतळा आहे या पुतळ्याला मनुष्याप्रमाणे डोके व चेहरा असून बाकी शरीर सिहासारखे आहे हा पुतळा २४० फूट लाब असून एका प्रचड दगडामध्ये कोरलेला आहे

दिल्लीत लाल किल्ल्यामध्ये पर्यटकासाठी ज्याप्रमाणे ध्वनी व प्रकाश (साऊंड अँड लाईट) चा शो दररोज सध्याकाळी असतो त्याचप्रमाणे पिरॅमिडस् व स्फिक्स यांची महती सांगणारा असाच शो इतर पर्यटकांबरोबर मलाही पहाण्याची संधी मिळाली हा खेळ पाहिल्यानतर सर्व कलाकृतींचा इतिहास व त्यातील बारकावे नीट ध्यानात येऊन मनावर कायमचे ठसतात

## ईस्टर बेटावरील गूढ पुतळे

दक्षिण अमेरिकेत रहात असताना (१९७१-७३) साली **चिली** या फक्त एकाच देशात कम्युनिस्ट राजवट चालू होती खनिजसपत्ती, फळे, फुले व निसर्ग या सर्व गोष्टी या देशाला परमेश्वराने अगदी सढळ हाताने बहाल केलेल्या होत्या. पण देशाच्या दुर्दैवाने त्यावेळचा हुकुमशहा साल्व्हाडोर अजेंडे याने सर्व गोष्टींची विल्हेवाट लावली होती व **सँटीआगो** ही सुदर राजधानी अक्षरश ऱ्हासाला लागली होती सर्वच गोष्टींचा तुटवडा. सिगारेट, ब्रेड वगैरेंसाठी ठिकठिकाणी रागाच्च रागा

तत्वज्ञानाच्या दृष्टीने कम्युनिझम (साम्यवाद) कितीही चागला असला तरी प्रत्यक्षात त्याची प्रचिती अगदी उलटच आलेली दिसते माझ्या पहाण्यात कम्युनिस्ट देश कगाल

झाल्याची आणखी दोन-तीन उदाहरणे म्हणजे दक्षिण येमेन (राजधानी -एडन), इक्विटोरीअल गिनी, आणि खुद्द रशिया. सर्व गोष्टींनी सपन्न असून सुद्धा काही अविचारी व वेडगळ कल्पना उराशी बाळगून देशाचे किती अपरिमित नुकसान होते हे मला प्रत्यक्ष या ठिकाणी पहाता आले असो

दक्षिण अमेरिकेची माहिती वाचत असताना चिलीच्या किनाऱ्यापासून पश्चिमेला दक्षिण पॅसिफिकमधील २३०० मैल दूर असलेले **ईस्टर** बेट व त्यावरील पुतळ्याबद्दल मला विशेष कुतूहल वाटत असे एवढ्या विशाल पॅसिफिक महासागरात हे बेट म्हणजे नकाशावरील फक्त एक ठिपकाच ! हे बेट चिलीच्याच मालकीचे आहे या बेटावर जाऊन ते पुतळे पहाण्याची कधी सधी मिळेल का याची मी वाट बघत होतो सुदैवाने हा योग १९७२ च्या डिसेंबर मध्ये आला चिलीची राजधानी **सँटिआगो** येथून लानचीले (चिलीअन एअरवेज) च्या बोईंग विमानाने दुपारी एक वाजता आम्ही निघालो वास्तविक इतर विमानाप्रमाणे आम्हाला पुढील पाच तासाच्या प्रवासात एक पूर्ण जेवण व नतर चहा मिळावयास पाहिजे होता पण या साम्यवादी कपनीने आम्हाला फक्त प्रथम जेवणाऐवजी अर्धाग्लास एक शीतपेय दिले मी हा प्रवास करायचा ठरवला तेव्हा माझ्या एका हचिन्सन नावाच्या न्यूझीलडच्या मित्राने सागितले होते की, चिलिअन एअरवेजने प्रवास करायचा असेल तर नेहमी आपल्याबरोबर सँडविचेस बाळगत जा ! त्या वेळी जरी मी मनात हचिन्सनला हसलो असलो तरी चार सँडविचेस बरोबर घेतली होती ! जेव्हा जेवण येत नाही हे पाहिले तेव्हा त्या शीतपेयाबरोबर मी आपली शिदोरी खाल्ली व वेळ मारून नेली

सँटीआगो सोडल्यावर दीड तासाने कॅप्टनने आता आपण रॉबिन्सन क्रुसो बेटावरून लवकरच जाणार आहोत, असे सागितल्याबरोबर आमच्या नजरा ते बेट समुद्रात शोधू

लागल्या लहानपणी रॉबिन्सन क्रुसोची गोष्ट वाचलेली होती. रॉबिन्सन क्रुसो, बोट बुडाल्यामुळे या एकाकी बेटावर कसा राहिला, पुढे त्याला 'फ्रायडे' नावाचा गुलाम कसा मदतीला आला ही सर्व गोष्ट आठवली. नशिबाने आपल्यावर या बेटावर उतरून तशी पाळी न येवो अशी प्रार्थना करीत आम्ही ते बेट पार केले चार तासाचा प्रवास झाल्यानतर हवाई सुदऱ्यानी आम्हाला फक्त एक कप कॉफी व दोन बिस्कीटे दिली कॅप्टनने आणखी पाऊण तासानतर आपण ईस्टर बेटावर उतरणार व दोन तास तेथे थांबून पुढे 'ताहितीस' प्रयाण करणार असे जाहीर केले. आमच्या विमानात ४० अमेरिकन पर्यटकाचा एक समूह होता हे सर्व पर्यटक साधारण साठीच्या आसपासचे होते. त्याचा म्होरक्या मात्र तिशीतील एक तरुण होता. वरील प्रमाणे कॅप्टनने सांगितल्याबरोबर तो तरुण काही पर्यटकाकडे वाकून काहीतरी सागत होता. त्याबरोबर मला शका आली की ईस्टर बेटावर उतरल्यावर तेथील पुतळे पहाण्याबद्दल तो या लोकांना सूचना देत असावा

दुपारी चार वाजता (स्थानिक वेळेप्रमाणे) आमचे विमान ईस्टर बेटावर उतरले विमानतळ अगदी छोटा होता व बाजूला लाल माती दिसत होती. त्याबरोबर मला आमच्या बेळगावच्या विमानतळाची आठवण झाली येथे आठवड्यातून फक्त दोनदा विमान येत असल्यामुळे त्या गावातील बरेच लोक विमान पहाण्यासाठी विमानतळावर जमले होते तेथेच काही बायका शख, शिपल्याच्या वस्तू जमिनीवर पसरून विकायला बसल्या होत्या हे बेट फक्त १० × ७ मैलाचे असून त्यावर अदाजे दोन हजार पॉलिनेशिअन व चिलियन लोकाची वस्ती आहे हे बेट जेकब रोजेव्हिन या डच बोटीच्या कप्तानाने १७२२ मध्ये ईस्टरच्या रविवारी शोधून काढले म्हणून याला 'ईस्टर बेट' असे नाव पडले

विमान थाबल्याबरोबर शिडीवरून उतरतानाच, एका

कोपऱ्यात पाच-सहा जुनाट जीप्स् उभ्या असलेल्या मला दिसल्या आणि तर्क केला, की त्या जीप्स् अमेरिकन पर्यटकांना पुतळे पहाण्यासाठी घेऊन जायला उभ्या असाव्यात उतरल्याबरोबर मी तिकडे गेलो व स्पॅनिश मध्ये जीप-ड्रायव्हरला विचारल्यावर माझा तर्क खरा ठरला खिशातून एक दहा डॉलरची नोट काढून त्याच्या मुख्य ड्रायव्हरला दिल्यावर तो मला त्या पर्यटकाबरोबर पुतळे पहाण्यासाठी नेण्यास तयार झाला. एवढी मात्र खात्री करून घेतली की तो विमान सुटण्याआधी मला परत आणेल तेवढ्यात बाकीचे पर्यटक आले व ते त्याच विमानाने पुढे जाणार असल्याची खात्री झाल्यावर माझा जीव भांड्यात पडला

पधरा मिनिटात आम्ही समुद्रकिनारी एका भल्या मोठ्या चौथऱ्याजवळ आलो तीस-एक पायऱ्या चढल्या नतर एकदम सात दगडी भव्य पुतळे एका ओळीत उभे असलेले दिसू

बनविलेले होते प्रत्येक पुतळ्यावर साधारण ५ फूट उचीची टोपी होती. त्या प्रत्येक पुतळ्याचे वजन साधारण ७०-८० टन असावे सर्व आकृती मात्र पुरुषाच्या होत्या त्यातील एक पुतळा अर्धवट स्थितीतच होता

एवढे प्रचड पुतळे कोणी व कसे बाधले याबद्दल अजून इतके वर्ष चर्चाच चालू आहे एवढे मोठे दगड इतक्या उचावर कसे आणले व ते कसे बसवले याबद्दल फारच आश्चर्य वाटते ते खडकाळ बेट शात झालेल्या ज्वालामुखीपासून तयार झाले आहे असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. या बेटावर इतरत्रही लहान-मोठे शेकडो दगडी पुतळे आढळतात

एका तासात सूर्य खाली जाऊन पुतळ्याच्या मागे जाऊ लागला. व एकदर देखावा अत्यत प्रेक्षणीय दिसू लागला थोड्या वेळात आम्ही जीपमध्ये बसून परत विमानतळावर

येऊन, ताहितीच्या सफरीची तयारी करू लागलो हा अविस्मरणीय देखावा व त्यातून मिळालेला आनंद इतक्या वर्षांनतर अजूनही ताजाच आहे

## मृत समुद्र

इराक-इराणचे युद्ध चालू असताना १९८३ मध्ये युनोच्या कामासाठी मला ओमानमधून बगदादला जावे लागले तेथील दहा दिवसाचे काम सपवून आमच्या सौ. आणि मी **जॉर्डनची** राजधानी **अम्मान** येथे दोन दिवसांसाठी आलो सकाळी एक टॅक्सी करून आम्ही मृत समुद्र पहाण्यास निघालो असता वाटेत एक दोन ठिकाणी थाबलो

जॉर्डनमध्ये पुरातन वस्तू सशोधनाचे काम अजूनही ठिकठिकाणी चालू असून हे काम कसे काळजीपूर्वक करावयाचे व मेहेनतीचे आहे हे आम्हाला प्रत्यक्ष पहाता आले एकेका ठिकाणी पधरा-वीस लोकाचा ताडा लहान-मोठ्या आकाराची कुदळी, फावडी घेऊन शास्त्रज्ञाच्या देखरेखीखाली दिवसभर काम करताना दिसत होता त्यानी आम्हाला या उत्खननातून कोणत्या पुरातन वस्तू सापडत होत्या त्या दाखवून त्याचे वैशिष्ट्य समजावून दिले.

तसेच आणखी पुढे गेल्यावर रस्त्यावर एक पाटी दिसली त्यावर ''समुद्र सपाटीपासून उची = ० फूट'' असे लिहिले होते. म्हणजे आम्ही त्यावेळी समुद्र सपाटीवर होतो आमची गाडी वळणे घेऊन खाली उतरत होती व आम्हाला वाटत होते की आम्ही अक्षरश पृथ्वीच्या पोटात जात आहोत पुढील पाट्या '-२०० फूट', त्यानंतर '-४००', '-६००', '-१००० फूट' अशा होत्या म्हणजे त्यावेळी आम्ही आमच्या मोटारीसह समुद्रसपाटीखाली एक हजार फूट खोलात होतो येथे पाणी अजिबात नव्हते सभोवताली विस्तीर्ण प्रदेश दिसत होता व डोक्यावर निळे आकाश असेच खाली जाता-जाता

आम्हाला एक तळे दिसू लागले पण पुढे गेल्यावर दहा मिनिटातच आम्ही एका समुद्र किनाऱ्यावर आलो हाच तो **मृत समुद्र** ! हा समुद्र सपाटीपासून १३१० फूट खोलीवर आहे


या समुद्राला आता एकही नदी मिळत नाही व आतील सर्व झरे आटून गेले असल्यामुळे नवीन पाणी येतच नाही हा भाग वाळवटात असल्यामुळे येथे पाऊसही पडत नाही व नेहमी सूर्य अगदी प्रखर असतो गेली कित्येक शतके असे घडत असल्यामुळे एकेकाळी मोठा असलेला हा समुद्र दरवर्षी आटत जाऊन आता फक्त ४०० चौ मैल शिल्लक राहिला आहे या जागी एक क्लब होता व लोक समुद्रात डुबत असताना दिसत होते दररोज पाण्याची वाफ होत गेल्यामुळे या समुद्रातील मिठाचे प्रमाण दरवर्षी वाढत असल्यामुळे पाणी जड होत चालले आहे त्यामुळे या पाण्यात माणूस सहज तरगू शकतो व त्याला बुडण्याची भीतीच नाही इतर समुद्रापेक्षा हे पाणी नऊपट खारट आहे यामुळे येथे मासे वगैरे प्राणी जगू शकत नाहीत मृत समुद्राच्या एका बाजूला जॉर्डन तर दुसऱ्या बाजूला ईस्त्राईल हा देश आहे. या जड पाण्याचा ईस्त्राईलने मात्र चागलाच उपयोग करून घेतला आहे त्या पाण्यापासून त्यानी ब्रोमिन, कॅल्शियम क्लोराईड, पोटॅशिअम क्लोराईड वगैरे रसायने तयार करण्याचे कारखाने उभारले आहेत जॉर्डनचे लोक मात्र फक्त बोलतात व आरडाओरडा करीत असतात

हे जगातील सर्वात खोल ठिकाण आहे की जिथे समोर पाणी, पायाखाली वाळू व वरती निळे आकाश !

❖

# ८. धार्मिक स्थळे

- व्हॅटिकन सिटी
- दिल्लीतील बहाई मंदिर
- मक्केच्या दारात
- बुद्ध धर्माची मंदिरे
- हिंदूंची मंदिरे



# धार्मिक स्थळे

परदेशात आणि भारतात भ्रमती करताना इतर स्थळाप्रमाणे अनेक धार्मिक स्थळानाही भेट देण्याचा मला योग आला त्यापैकी ज्या काही ठिकाणाचा व धर्मांचा त्याच्या वैशिष्ट्यामुळे मनावर ठसा उमटला अशा स्थळापैकी खालील ठिकाणे होत

## व्हॅटिकन सिटी

नोव्हेंबर १९५६ मध्ये युरोपहून बोटीने भारतात परत येताना सुवेझ कॅनॉल बद झाल्याचे वर्णन या पुस्तकात इतरत्र केलेलेच आहे त्यावेळी ४ दिवस आम्हाला शरणार्थी लोकाप्रमाणेच रोममध्ये आमच्या इच्छेविरुद्ध रहावे लागले. ते दिवस आम्हाला थोडे नाराजीचेच वाटत होते, तरी पण रोमसारखे सुदर शहर पहाण्याची आलेली सधी जरा सुखदच वाटत होती

रोम शहराच्या वायव्य भागात रोमन कॅथॉलिक धर्माचा प्रमुख **'पोप'** याचे जेथे वास्तव्य असते त्या ठिकाणास **'व्हॅटिकन सिटी'** म्हणतात हे फक्त १०९ एकर क्षेत्रफळाचे जगातले सर्वात लहान राष्ट्र आहे पण याची धार्मिक सत्ता जगात सर्वात मोठी आहे कारण, सर्व जगातील रोमन कॅथॉलिकांच्या धर्मगुरूचे म्हणजे पोपचे हे मुख्य कार्यालय व रहाण्याचे ठिकाण होय या ठिकाणाला **'दि स्टेट ऑफ व्हॅटिकन सिटी'** म्हणतात येथील सेंट पीटर्स चर्च व त्यावरील घुमट जगातील सर्वात मोठ्या चर्चेस् मध्ये गणला जातो पोपचा राजवाडा इतका मोठा आहे की त्यात जवळ जवळ १००० खोल्या व दालने आहेत त्यात म्युझियम, लायब्ररी, प्राचीन वस्तू सग्रहालय, मोठे - मोठे हॉल्स, पोपची रहाण्याची जागा इत्यादिंचा समावेश होतो. प्रसिद्ध चित्रकार मायकेला अँजलोने चितारलेली चर्चमधील छते येथे पहावयास

मिळतात. येथील बागबगिचा अत्यत रमणीय आहे हे सर्व पहाण्यात आम्ही एक सपूर्ण दिवस घालवला त्यामुळे मन उत्साहित झाले

इटलीमध्ये **मिलान** शहरात एका चर्चमध्ये जगप्रसिद्ध असलेले चित्र 'लास्ट सपर' हे चर्चच्या एका भितीवर चितारलेले पहाता आले हे चित्र लिओनार्ड दी व्हिन्सी या चित्रकाराची विख्यात कृती म्हणून प्रसिद्ध आहे

## दिल्लीतील बहाई मंदिर

दोन वर्षांपूर्वी दिल्लीला गेलो असताना तेथे बहाई-अता-उल्ला पथाच्या लोकानी बाधलेले कमळाच्या आकाराचे प्रचड सगमरवरी देऊळ पाहिले या देवळाचे काम गेली कित्येक वर्षे, जगातील उत्तमोत्तम बहाई शिल्पकाराच्या देखरेखीखाली चालले होते हे देऊळ व त्याचा परिसर इतका मोठा, सुंदर व सुशोभित आहे की तो दिल्लीतील इतर, फार प्रसिद्ध कलाकृतींच्या तोडीचा किंवा काकणभर सरसच आहे

कट्टर मुसलमानाच्या जाचाला कटाळून सुमारे १५० वर्षांपूर्वी बहाऊल्ला नामक एक पुण्यपुरुषाने इराण मध्ये **'बहाई-फेथ'** नावाचा एक नवीन विचार प्रवाह सुरू केला. पण इराणमध्ये त्याला खूपच त्रास होऊन कैदही झाली. अखेर त्याने इराकमध्ये आश्रय घेतला.

बहाई पथाचा दिवसेंदिवस प्रचार वाढू लागला त्याचे मुख्य तत्व म्हणजे सर्व मानव एकाच दर्जाचे असून सर्व धर्म एकच शिकवण देतात, फक्त शिकवणीचे प्रकार वेगवेगळे आहेत त्याच्या मदिरात सर्व धर्माच्या लोकाना प्रवेश करता येतो व सामुदाईक प्रार्थना केल्या जातात जगातील मोठमोठ्या ठिकाणी बहाई लोकांची उत्तमोत्तम मदिरे आहेत.

दिल्लीतील मदिर हे पर्यटकांचे एक महत्त्वाचे आकर्षण बनले आहे

## मक्केच्या दारात

मुस्लीम साम्राज्यात ठिकठिकाणी मोठ्या मशिदी बाधण्याची चढाओढ गेली शेकडो वर्षे जगभर चालूच आहे त्यामध्ये **अल् अक्सर मशिद,** दिल्लीतील **जुम्मा मशिद,** ट्यूनीस मध्ये गेल्या वर्षी तयार झालेली जगातील फार मोठी मशिद याचा समावेश होतो काही वर्षांपूर्वी मलेशियातील 'क्वालालपूर' मधील अशीच एक प्रसिद्ध मशिद पहाण्याचा आम्हाला योग आला ही मशिद पूर्वेकडील देशातील सुदर व भव्य अशी मशिद समजली जाते

पधरा वर्षांपूर्वी, सौदी अरेबियातील **जेद्दा** येथे एका दिवसासाठी थाबण्याचा मला योग आला **मक्का, मदीना** येथे जाण्याकरिता हाज यात्रेकरूसाठी सौदी राजाने जगातील सर्वात मोठे 'एअर पोर्ट' येथे अलीकडेच बाधले आहे असे म्हणतात जेद्दा शहरात माझ्या माहितीचे असे कोणीही नव्हते पण तेथे आय. टी यू. ने सौदी टेलिकॉमच्या लोकासाठी चालविलेले एक ट्रेनिंग सेंटर आहे एवढेच मला माहित होते. एअर पोर्टवर चौकशी केल्यावर त्या सेंटरचा पत्ता मिळाला टॅक्सी करून मी तेथे पोहोचलो व तेथील स्विडीश चालकाना भेटलो. आम्ही दोघेही आय टी यू. साठी काम करीत असल्यामुळे दिलजमाई होण्यास फार वेळ लागला नाही त्यानी मला ट्रेनिंग सेंटर दाखवताना आमच्याकडे एक भारतीय तत्रज्ञ आहे, त्याची ओळख करून देऊ का म्हणून विचारले मी होय म्हणताच, दिल्लीतील माझा एक जुना मित्र बी सी गुप्ता माझ्यासमोर उभा राहिला मी दिल्लीस असताना गुप्ता हा पी अँड टी. मध्ये डेप्युटी डायरेक्टर जनरल म्हणून काम करीत होता त्याची व आमची कामानिमित्त वरचेवर भेट होत असे दिल्लीत कितीतरी गुप्ता आडनावाचे ऑफिसर होते म्हणून ओळखण्यासाठी याला आम्ही B C म्हणजे बॉम्बे - कलकत्ता म्हणत होतो कित्येक वर्षांनी आमची भेट झाल्यामुळे आम्हा दोघाना फार आनंद

झाला. दुपारी त्याच्या घरी दिल्ली पद्धतीचे जेवण घेऊन नतर त्याने मला त्याच्या गाडीतून मक्केच्या अर्ध्या वाटेवर नेले जेद्दापासून खुद्द मक्का ८० मैल दूर आहे परतु ४५ मैलावर एक चेक नाका आहे तेथे सर्वांचे पासपोट तपासून फक्त मुस्लीम लोकानाच पुढे जाता येते. असे मक्केच्या दारात जाऊन आम्हाला परतावे लागले असो

## बुद्ध धर्माची मंदिरे

आम्ही दोन वर्षे **बँकॉकमध्ये** असल्यामुळे तेथील लहान, मोठ्या व सर्व तऱ्हेच्या बुद्धाच्या प्रतिमा असलेली मंदिरे आम्हाला पहाता आली त्यात एमेरल्ड (रत्नजडीत) बुद्ध, आडवारलेला बुद्ध वगैरे मंदिरे फारच प्रेक्षणीय आहेत थायलडचा राजधर्म बौद्ध असल्यामुळे सर्वत्र बुद्ध भिक्षूना फार मानाने वागवले जाते कुठल्याही प्रकल्पाची सुरूवात करताना आपल्याकडे श्री गणेशाची जशी पूजा केली जाते त्याप्रमाणे थायलडमध्ये बौद्ध भिक्षूंच्या हस्ते अगदी साग्रसगीत पूजा केली जाते प्रत्येक थाय तरुणाला आयुष्यात निदान तीन महिने तरी बौद्ध भिक्षूप्रमाणे सर्वसगपरित्याग करून रहावे लागते याला राजपुत्रही अपवाद नाही.

थायलडप्रमाणे जपानमध्येही बुद्ध मदिरे प्रेक्षणीय आहेत. त्यातल्या त्यात **टोकिओजवळ 'कामाकुरा बुद्ध'** नावाची बुद्धाची प्रतिमा अगदी भव्य असून फार प्रसिद्ध आहे

## हिंदूंची मंदिरे

भारतात व नेपाळमध्ये प्रवास करताना **सोरटी सोमनाथ,** काशीचे **श्री विश्वेश्वर मंदिर,** काठमाडूचे **पशुपतीनाथ मंदिर,** पुरीचे **जगन्नाथाचे मंदिर** व दक्षिणेकडील बरीचशी मदिरे पहाण्याची संधी आम्हाला प्राप्त झाली परदेशातही आपली मंदिरे ठिकठिकाणी पहावयास मिळाली.

त्यात **मस्कत**मधील नवीन शिव मंदिर, **एडन** शहराच्या बाहेरील गणेश मंदिर, **त्रिनिडाड, गयानामधील** मंदिरेही, तेथील हिंदूना अत्यंत दिलासा व आधार देणारी महत्त्वाची ठिकाणे आहेत **इंग्लंडमधील** ठिकठिकाणची मंदिरे व गुरुद्वारा तसेच **लॉस एंजलीस** मधील १००० ओक्स जवळची (मालीबू हिल्स मधील) अत्यंत रम्य ठिकाणी बांधलेली मंदिरे श्रीमंत भारतीयांची देवस्थाने व श्रद्धास्थाने बनलेली आहेत

**पर्थ,** ऑस्ट्रेलिया मध्ये आम्ही रहात असताना तेथे अगदी नवीनच बांधलेले शिवमंदीर व त्यातील धार्मिक कार्यक्रमास उपस्थित रहाण्याचा आम्हाला योग आला वास्तविक पर्थमध्ये भारतीयांची संख्या जरी अगदीच कमी आहे तरी देखील दक्षिण भारतीय लोकांनी पुढाकार घेऊन शहरानजिक एक उत्तम प्लॉट मिळवून एक भव्य मंदिर बांधले आहे. तेथे दसरा व दिवाळीचे कार्यक्रम अगदी साग्रसंगीत पद्धतीने व भक्तीभावाने केले जातात.

**मॉरिशसमध्ये** एका टेकडीवर नवीन पद्धतीने बांधलेले शिव मंदिर अगदी पहाण्यासारखे आहे. तेथील छोट्याशा तलावात उद्‌घाटनाचेवेळी काशीहून आणलेले गंगेचे पवित्र पाणी मिश्रित केले आहे मंदिराचा परिसर अत्यंत सुंदर व रम्य असा असून त्या टेकडीवरून दिसणारा देखावा अतिशय रम्य आहे.

आणखी उत्तम प्रतीचे मंदिर **ग्रॅंड बे** मधील किनाऱ्यावर अलीकडेच बांधून पूर्ण झाले आहे

थोडक्यात म्हणजे जगात कुठेही गेले तरी भगवान परमेश्वराला सर्व जाती व जमाती मानतात फरक इतकाच की मंदिरातील मूर्ती भिन्न असतात व त्यांचे आकार व बांधणी वेगळी असते पण सर्वांना एकच हवे असते, ते म्हणजे त्या विधात्याचे अभयदान व त्याचीच कृपा

# दक्षिण अमेरिका



कॅरिबियन सागर
अटलांटिक महासागर
कोलंबिया
वेनेजुएला
गियाना
जॉर्जटाउन
कराकास
बोगोटा
क्विटो
इक्वाडोर
लीमा
बोलिविया
ला पाज़
पराग्वे
आसुनसियोन
मातु ग्रोसु
गोयास
साओ पाउलो
रियो दे जानेरो
उरुग्वे
मोंतेवीडिओ
ब्यूनस आयर्स
सैंटियागो
फॉकलैंड द्वीप
36 000 000
किलोमीटर

# ९. दक्षिण अमेरिका व तेथील वास्तव्य

- भारतीयांचा परदेशाचा प्रवास
- दक्षिण अमेरिका व भारतीय
- खंडाची व्याप्ती
- थोडे ऐतिहासिक - माया संस्कृती, इन्का साम्राज्य, अ‍ॅझटेक साम्राज्य, स्पॅनिश साम्राज्य
- काही मजेशीर आठवणी
- पोळीच्या शोधात
- मध्य अमेरिका - सेंट्रल अमेरिकेत नेमणूक
- कॉस्टारिका

पोळ्याच्या शोधात



# दक्षिण अमेरिका व तेथील वास्तव्य

## भारतीयांचा परदेशाचा प्रवास

पूर्वीच्या काळी परदेशाचा प्रवास झाला म्हणजे तो मनुष्य इग्लडला जाऊन (विलायतेला) आला, फार तर युरोपमधील दोन, तीन देश हिंडून आला असाच समज असे याचे मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतीय लोक उच्च शिक्षणासाठी, आय्. सी एस् ची परीक्षा देण्यासाठी किंवा राजेरजवाडे हवापालट किंवा चैन करण्यासाठी किंवा राजकीय कामासाठी बोटीने इंग्लडला जात असत सामान्य माणसाला ही गोष्ट अगदी अशक्यच वाटत असे

त्याच सुमारास काही गुजराथी व थोडी महाराष्ट्रीयन मडळी दक्षिण आफ्रिका किवा पूर्व आफ्रिकेत केनिया, युगाडा वगैरे देशात व्यापाराच्या निमित्ताने जाऊन स्थायिकच होत असत दुसऱ्या महायुद्धानतर भारत व इतर राष्ट्रे, ब्रिटीश राजवटीपासून स्वतत्र झाल्यावर परदेश गमन काही वर्षे थडावले होते. कारण युरोपमधील देश युद्धापासून झालेल्या हानीमधून सावरतच होते परदेशाच्या प्रवासास १९६१ मध्ये जेट युग सुरू झाल्यापासून खरा जोर चढला व दिवसेंदिवस तो वाढतच आहे १९६५ पासून भारतातून इजिनियर झालेली हुशार मुले अमेरिकेत पुढील शिक्षणासाठी जाऊ लागली व नतर तिकडेच स्थायिक होऊ लागली व्यापारासाठी व शिक्षणासाठी इग्लडमध्ये भारतीयाचीही रीघ लागू लागली गेल्या दहा-बारा वर्षात हा लोंढा ऑस्ट्रेलियाकडे वळला आहे

वयस्क मडळी हल्ली मुलाकडे काही घरगुती कारणामुळे सर्रास परदेशात जाऊ लागली आहेत व परदेश गमन हा

नाविन्याचा विषय राहिलेला नाही १९६०-७० च्या सुमारास पजाबातून सरदारजी बोचकी बरोबर घेऊन दिल्लीच्या विमानतळावरून खास विमानाने कॅनडात जात असत एकूण सध्या इग्रजी भाषा बोलणाऱ्या सर्व देशांत भारतीय सर्वत्र दिसू लागले आहेत काही देशात भारतीयाच्या दुसऱ्या पिढ्या आता शाळा-कॉलेजमध्ये शिकत आहेत पण विशेष लक्षात येण्यासारखी गोष्ट म्हणजे ही परदेशात जन्मलेली व वाढलेली नवी पिढी मात्र त्याच्या आई-वडिलाच्या तुलनेने बरीच कमी हुशार असल्याचे पुष्कळाचे आई-वडिल सागतात व त्याच्या भवितव्याविषयी चितेत असतात जसजशा मुली तिकडे मोठ्या होत असतात तशी त्याची सामाजिक व मानसिक कुचबणा होऊ लागल्यामुळे नवीनच समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत सिगापूर, मलेशिया वं हाँगकाँगमध्ये देखील व्यापाराच्या निमित्ताने बरेच भारतीय स्थायिक झाले आहेत

वर सागितल्याप्रमाणे भारतीय जसे इंगजी बोलणाऱ्या देशात सर्रास जाऊन आपले नशीब काढू लागले आहेत त्याप्रमाणे गेल्या पधरा-वीस वर्षांत त्याचा ओघ गल्फमध्येही खूपच वाढला आहे यात विशेष म्हणजे केरळी व दक्षिण भारतीयाचा खूपच भरणा आहे. महाराष्ट्रीयन व गुजराथी त्यामानाने बरेच कमी आहेत ऊस शेतीसाठी अनेक शेतमजुराना यू. पी आणि बिहारमधून मॉरिशस व दक्षिण अमेरिकेत गयाना इकडे बऱ्याच वर्षांपूर्वी नेण्यात आले होते ते लोक पिढ्यान् पिढ्या आता तिकडेच स्थायिक आहेत

## दक्षिण अमेरिका व भारतीय

जेट युगामुळे जरी जग लहान वाटू लागले व भारतीय सर्वत्र पसरू लागले तरी अजून दक्षिण अमेरिकेत मात्र भारतीयाचा शिरकाव अगदीच तुरळक किबहुना नाहीच असे म्हणावे लागते याची मुख्य कारणे म्हणजे

- तेथे इग्रजी भाषा नसून स्पॅनिश भाषाच वापरली जाते फक्त ब्राझीलमध्ये पोर्तुगीज भाषा आहे

- युरोप, अमेरिकेपेक्षा अतर खूपच जास्त आहे

- त्या खडात उच्च शिक्षणाची अशी खास सोय नाही

- व्यापार, धद्यासाठी अगदी कमी वाव आहे शिवाय भारतातून नियमित जहाज वाहतूक नाही

या व इतर कारणामुळे भारतीयाना या प्रचड मोठ्या खडाविषयी व तेथील सस्कृती व लोकाविषयी अगदी जुजबीच माहिती आहे

सुदैवाने आम्हाला युनोच्या नेमणुकीमुळे जवळजवळ पाच वर्षे या खडात निरनिराळ्या देशात राहण्याची व प्रवास करण्याची सधी मिळाल्यामुळे वाचकाना या खडाची ओळख करून देताना मला खरा आनद होत आहे

## खंडाची व्याप्ती

दक्षिण अमेरिकेला पुष्कळदा लॅटिन अमेरिका असेही सबोधिले जाते या खडाची व्याप्ती अगदी प्रचड म्हणजे भारताच्या जवळ जवळ सात पट आहे. पण लोकसंख्या फक्त चाळीस कोटीच आहे एकटा ब्राझील देश भारतापेक्षा अडीच पट मोठा आहे उत्तरेस मेक्सिको, त्याखाली मध्य अमेरिका व नतर दक्षिणेस अर्जेंटिना-चिलीचे दक्षिण टोक म्हणजे केप हॉर्न इथपर्यंत हा खड पसरलेला आहे विशेष म्हणजे या खडातील सर्व देशामध्ये स्पॅनिश भाषा बोलली जाते सर्व पृथ्वीच्या पाठीवर हे एकच उदाहरण आहे की जेथे इतक्या देशात एकच भाषा बोलली जाते ब्राझीलमध्ये जरी पोर्तुगीज भाषा आहे तरी ती स्पॅनिशच्या इतकी जवळ आहे की एक स्पॅनिश व दुसरा पोर्तुगीज बोलून आपले विचार एकमेकास समजून देऊ शकतो थोडे मराठी-हिंदी व गुजराथी याच्यासारखे

प्रतिस
वा. क्र.

येथील पूर्वीचे आदिवासी, ज्याना इंडियन्स म्हणतात, ते रगाने निमगोरे व आपल्याकडच्या पहाडी लोकांसारखे दिसतात.

गेल्या तीनशे वर्षात युरोपमधून खूपच गोरे लोक इकडे आल्यामुळे आता सर्व रग रूपाचे लोक येथे आढळतात तरी खरे सत्ताधारी श्रीमत व सुशिक्षित लोक गौरवर्णीयच आहेत. येथील हवामान बरेचसे भारतासारखे असल्यामुळे स्वभावाने व वागण्यातही हे लोक थड युरोपिय देशातील लोकाप्रमाणे थड वृत्तीचे नसून भारतीयाप्रमाणे मोकळे व Warm Hearted आहेत त्याच्यामध्ये कृत्रिम शिष्टाचार अगदी कमी असून लवकर ते दुसऱ्याशी दोस्ती करतात या स्वभाव वैशिष्ट्यामुळे आमची या लोकाशी लवकरच जवळीक होऊन दिलजमाई होत असे

## थोडे ऐतिहासिक

## माया संस्कृती

इ स २५० ते ९०० या काळात माया साम्राज्य व सस्कृती **मेक्सिकोतील युकाटान, ग्वाटेमाला, बेलिझ** व **एल् साल्व्हाडोर** व **हॉन्डयूरसचा** अर्धा अधिक भाग येथे अतिशय भरभराटीत होती. या साम्राज्यात ठिकठिकाणच्या भागात स्वतत्र राजे राज्य करीत असत व वरचेवर लहान लहान लढायाही होत असत या काळात कलाकुसर, चित्रकला, खगोलशास्त्र, गणित व शिल्प या गोष्टींची फार प्रगती झालेली आढळते

माया लोकाचे देव म्हणजे सूर्य, चद्र, पर्जन्य असे जे प्रत्यक्षात दिसतात हेच देव होते मोठे-मोठे शे-दीडशे फूट उचीचे पिरॅमिडस् तयार करून त्यावर या देवताची मदीरे बाधली जात ग्वाटेमालामध्ये टिकाल व मेक्सिकोमध्ये काही ठिकाणी ही देवळे आम्हाला प्रत्यक्ष पहाता आली हे लोक एकत्र कुटुबपद्धतीने रहात व मृत्यूनतर त्याना त्याच्या चीजवस्तू,

भाडी, जडजवाहिरासह पुरण्याची प्रथा पाळीत असत कल्पना अशी की या सर्व वस्तूचा त्या माणसाला दुसऱ्या जगात उपयोग होईल !

माया लोकानी एक वेगळ्या पद्धतीचे पण बिनचूक असे कॅलेंडर तयार केले होते त्यात वर्षाचे ३६५ दिवसच होते पण त्यात २० दिवसाचे १८ महिने असत व शेवटचे ५ दिवस अशुभदिवस म्हणून समजले जात असत या पाच दिवसात ते लोक उपास-तापास, यज्ञ, याग करून बळी देत असत.

पुढे ही माया सस्कृती व त्याचे राजेरजवाडे नाहीसेच झालेले दिसतात त्याच्या सस्कृतीचे अवशेष मात्र अजूनही आढळतात

## इन्का साम्राज्य

ॲंडिज पर्वताच्या पश्चिमेस पॅसिफिकच्या किनाऱ्यापर्यंत जो चिचोळा २५०० मैल लाबीचा प्रदेश पसरलेला आहे त्यात सन १४०० ते १५०० पर्यंत इन्का सस्कृतीचे साम्राज्य भरभराटीत होते हा भाग म्हणजे सध्याचा **पेरू** व **चिलीचा** प्रदेश होय या साम्राज्याची कुस्को ही राजधानी होती तेथे अलीकडे उत्खननाचे काम करून कुस्को हे पर्यटकाचे अगदी महत्त्वाचे स्थान बनले आहे **लीमाहून** लहान विमानाने पर्यटक तेथे जातात

इन्का राज्याची लोकसख्या सुमारे ६०-७० लाख होती त्यात उत्तम कारागीर आणि इजिनिअर याचा समावेश होता त्यानी राज्यात सर्वत्र चागले रस्ते व कालवे बाधले राजे व सरदार यानी एकापेक्षा अनेक बायका करण्याची पद्धत असे लग्ने मात्र त्या त्या समाजातील मुला- मुलींशीच होत विशेष म्हणजे इन्का राजा आपल्या बहिणीशीच लग्न करीत असे

## ॲझ्टेक साम्राज्य - मेक्सिको सिटी

याच सुमारास चौदाव्या शतकात ॲझ्टेक इडियन्स्नी **टेनोचितितलान** नावाचे एक शहर **टेक्सकोको** तलावाच्या मध्यभागी असलेल्या एका बेटावर बाधले शहरात शिरण्यासाठी त्यानी चोहोबाजूनी पूल बांधून रस्ते तयार केले व त्यावरून या राजधानीच्या शहरात सर्व बाजूनी प्रवेश करता येत असे १६ व्या शतकात जेव्हा स्पॅनिश लोक युरोपहून या भागात वसाहत करण्यासाठी आले तेव्हा त्यानी हे शहर काबीज करून तेथे आपली राजधानी केली व त्याचे नाव **मेक्सिको** असे ठेवले पुढे या स्पॅनिश लोकानी या तळ्यातील सर्व पाणी काढून तेथे घरे बाधून शहर मोठे केले हेच मेक्सिको जगातील आज, सर्वात मोठे शहर समजले जाते व त्याची लोकसख्या एक कोटीच्या वर आहे त्याचबरोबर हे अतिशय प्रदूशीत शहर आहे हे शहर कोरड्या तलावावर बाधल्यामुळे खालील जमीन थोडीफार खचते त्यामुळे कित्येक इमारती थोड्या तिरक्या झालेल्या आढळतात दिल्लीप्रमाणे येथेही शहरात जुन्या सस्कृतीचा आधुनिक सस्कृतीशी मिलाप झालेला दिसतो

## स्पॅनिश साम्राज्य

१६ व्या शतकात युरोपमध्ये स्पेन हा देश अतिशय बलवान समजला जात असे व त्यानी आपले लक्ष दक्षिण अमेरिका काबीज करण्याकडे वळवले होते त्याच्याजवळ उत्तम जहाजे, खलाशी व सैन्य तयार होते त्यानी दक्षिण अमेरिकेत स्वाऱ्या करून एकामागून एक देश काबीज करून सर्वत्र स्पॅनिश साम्राज्य पसरविले याच सुमारास पोर्तुगीजानी ब्राझीलमध्ये आपले पाय रोवले कित्येक देशातील आदिवासींची स्पॅनिश लोकानी कत्तल करून त्याना नाहीसे केले या नवीन वसाहतींत रहाण्यासाठी युरोपच्या थडीला कटाळलेले जर्मन, इटालियन, स्पॅनिश व इतर लोक बोटी भरभरून इकडे रहाण्यासाठी येऊ

लागले व त्यानी शहरे बाधून आपले नवे जीवन सुरू केले

सुमारे दोनशे वर्षांच्या कठोर स्पॅनिश राजवटीने दक्षिण अमेरिकेतील ही सर्व राज्ये त्रस्त झाली होती व त्यानी स्पेनविरुद्ध बड करण्यास सुरूवात केली. त्याच्या नशिबाने या सुमारास म्हणजे सन १८०० च्या आसपास युरोपमध्ये नेपोलिअन बोनापार्ट या फ्रेंच राजाचे वर्चस्व सर्वत्र वाढू लागले त्यामुळे स्पेन व पोर्तुगालची सत्ता सकटात आली व त्याची दक्षिण अमेरिकेवरची पकड ढिली झाली या सधीचा फायदा घेऊन दक्षिण अमेरिकेतील देशानी आपण स्वतत्र असल्याचे घोषित करून तेथे ठेवलेल्या छोट्याशा स्पॅनिश सैन्याचा पराभव केला अशा तऱ्हेने हे स्पेनचे साम्राज्य सपुष्टात आले व ही राष्ट्रे स्वतत्र झाली तरी देखील आजपर्यंत त्याच्यावर स्पॅनिश व युरोपिय सस्कृतीचा पगडा कायम आहे

## काही मजेशीर आठवणी

युनोतर्फे माझी पहिली नेमणूक **पराग्वे** या देशात झाली व जून १९७१ च्या अखेरीस अंजली, आमच्या सौ. व मी पराग्वेची राजधानी असुनसिऑनला पोहोचलो हा देश दक्षिण गोलार्धात असल्यामुळे जून- जुलैमध्ये येथे खूपच थडी होती दिल्लीहून जाताना आम्ही बरोबर गरम कपडे नेले होतेच. विमानतळावर आम्हाला नेण्यासाठी आलेल्या दोघानी आमच्यासाठी ओव्हरकोट व शाली आणल्या होत्या त्यामुळे येथील लोक ऊब देणारे असतील असे आम्हाला वाटू लागले आणि नंतर तो समज अगदी खरा ठरला

दुसऱ्या दिवशी मी कामावर गेल्यावर अजली व नलू दोघींना हॉटेलमधल्या खोलीत चहा पाहिजे होता म्हणून अंजलीने रूम सर्व्हीसला फोन केला व तिच्या मोडक्या स्पॅनिश मध्ये "ते कोन लेचे" म्हणजे 'चहा दुधासह' मागवला त्याने पुढचे वाक्य विचारल्यावर तिचे स्पॅनिश सपले व तिने फोनच

खाली ठेवला थोड्या वेळाने रूममध्ये चहा आला पण त्या बरोबर गार दूध आले भाषा येत नसल्याने गरम दुधाला काय म्हणायचे हे या दोघींना कळेना व त्या वेटरला याना काय पाहिजे ते समजेना अखेर नलूने चहाच्या किटलीत एकदा व नतर दुधाच्या भाड्यात एकदा बोट घालून त्याला समजावले व अखेर गरम दूध मिळाले

## पोळीच्या शोधात

भारतात जेवणात रोज पोळी खाण्याची सवय आम्ही बरोबर नेलेली कणिक घर थाटल्यानतर दोन-तीन आठवड्यात सपणार होती म्हणून आम्ही सुपर मार्केट आणि इतर दुकानात कणकेच्या शोधात फिरत होतो तिकडे सर्वत्र पाव मिळे पण कणिक कोठेच मिळत नसे माझ्या ऑफिसमधील सेक्रेटरी एमा हिला आमचा प्रश्न सागितला त्या गावात इतरत्र गहू कोठेच मिळत नसे एमाने मोठ्या हुशारीने गावात एका मैदा तयार करण्याच्या गिरणीमालकाशी ओळख काढून, त्याला आम्हाला गहू मिळतील काय म्हणून पृच्छा केली आम्ही कोण, कुठले, वगैरे ऐकल्यावर त्या गिरणी मालकाला आपल्या देशात एक हिंदी कुटुब आले आहे हे ऐकून आश्चर्य वाटले त्याने एमाला सागितले की तू श्री गोगटे याना माझ्या ऑफिसमध्ये घेऊन ये ठरल्याप्रमाणे आम्ही दोघे त्याच्या ऑफीसमध्ये गेलो त्या मॅनेजरने आमचे फार प्रेमाने स्वागत केले व ५ किलो गहू आम्हाला बहाल केले व सागितले की यापुढे केव्हाही तुम्ही ५-५ किलो गहू येथून विनामूल्य घेऊन जा

पुढे त्याने एमाला सागितले की या आयुष्यात मी भारतीय माणसाला कधीही पाहिले नव्हते म्हणून मी गोगटे याना येथे बोलावले मला पाहून त्याला काय वाटले कोण जाणे पण आमचे काम मात्र झाले

वाचकहो, नुसते गहू मिळून भागत नाही पोळी तयार

होण्यासाठी अजूनही बरेच प्रयास करावे लागतात मिळालेल्या गव्हापैकी २ किलो गहू घेऊन मी थोड्या अतरावर असलेल्या गिरणीत गेलो. ती गिरणी नेहमी मका दळत असे. कारण तेथील सर्वसामान्य लोक ब्रेड किंवा मक्याच्या रोट्याच खात असत गहू दळण्यासाठी आलेले हे बहुतेक पहिलेच गिऱ्हाईक त्यानी पाहिले असावे त्याला जरा आश्चर्याचा धक्काच बसला असावा त्याने गव्हाकडे पाहून नतर हातात घेऊन मला म्हटले की आमच्या गिरणीत हे गहू दळता येत नाहीत कारण ते मक्यापेक्षा फार कडक आहेत व आमची चक्की ते दळू शकणार नाही

लहानपणी बेळगावला आमची एक पिठाची गिरणी होती व शाळेतून फावल्या वेळी मी गिरणीत काम करून दळणे काढीत होतो बेळगावात त्या काळी दर आमावस्येला सर्व दुकाने, गिरण्या वगैरेंना सुट्टी असे त्या दिवशी चक्की खोलून जात्याना टाकी मारण्याचेही मी काम केले असल्याने मी त्या गिरणी मालकाला त्याच्याच शब्दात स्पॅनिशमध्ये हे 'गहू कसे दळता येतील' हे सागू लागलो तरी तो ऐकेना नाईलाजाने गहू घेऊन मी घरी परतलो तेवढ्यात आमच्या सौ ना एक कल्पना सुचली बरोबर येताना सामानात त्यानी मुबईहून एक मोठ्या आकाराचा ग्राइडर आणला होता. त्यातून या गव्हाचे हाताने फिरवून तुकडे केले व मी पुन्हा त्या गिरणीत गेलो मोठ्या नाखुषीने का होईना त्याने ते दळून थोडी जाड कणिक आम्हाला दिली पहा, पोळी मिळणे हे काही सोपे काम नाही

आमच्या घरी कामाला एक मध्यम वयाची मेड (बाई) आम्ही ठेवली होती. ती दिसायला गोरी पान, काळे डोळे असलेली स्पॅनिश बाई होती ती जेव्हा बाहेरून घरी येई तेव्हा अगदी चागले कपडे घालून लिप्स्टिक वगैरे लावून येत असे. तिला पाहिल्यावर ही मेड आहे असे कोणाला वाटणारही नाही. घरी आल्यावर ती तडक मेडच्या खोलीत जाई व आपला

निळसर युनिफॉर्म घालून आमच्या सौ. च्या समोर हसतमुखाने आता काय करू म्हणून प्रश्न करी तिला फक्त स्पॅनिश येई इंग्रजीचा गधही नव्हता अजली व आमच्या सौ. स्पॅनिश डिक्शनरी घेऊन मग तिला कांदे, बटाटे, भाज्या व इतर जिन्नस दाखवून त्याचे स्पॅनिश शब्द लिहून वेळ मारून नेत असत जरी घरात आम्ही तिघेच होतो तरी रोज आम्हाला दोन लिटर दूध लागे. सकाळी व रात्री आम्ही दूध पीत होतो ते पाहून तिला आश्चर्य वाटे शिवाय आम्ही शाकाहारी असल्यामुळे घरात मासे, बीफ वगैरे कधी आणत नसू. दक्षिण अमेरिकेत उत्तम तऱ्हेचे गोमास (बीफ) मिळत असे व प्रत्येक मनुष्य ते रोज खातही असे दोन तीन महिन्यानतर त्या मेडने आम्हाला सागितले की आसपासचे लोकानी कुतुहलाने आम्ही काय खातो पितो याची चौकशी केल्यावर आम्ही शाकाहारी असल्याचे तिने सागितल्यावर त्याना आश्चर्य वाटे आम्ही बीफशिवाय चागली प्रकृती कशी ठेऊ शकतो हे त्यांना कोडेच वाटे

'व्हॅलेंटाईन डे'' म्हणजे प्रेमिकाना प्रेम व्यक्त करण्याचा दिवस जगभर हा दिवस १४ फेब्रुवारीला साजरा केला जातो पण पराग्वेमध्ये मात्र हा दिवस २१ सप्टेंबरला साजरा केला जातो त्याचे कारण काय असेल ते असो. असुनसिऑन शहरातला काही भाग असा आहे की ज्या भागात त्या दिवशी कोणीही स्त्री-पुरुष आपल्या आवडीच्या व्यक्तीला फूल देऊन आपले प्रेम व्यक्त करू शकतात त्या दिवशी अशा प्रेमप्रदर्शनाचा कोणीही राग मानत नाही.

त्या गावात किवा देशातही म्हणा आमचे एकच भारतीय कुटुब असल्यामुळे सर्वांचे लक्ष आमच्यावर असे त्यामुळे आम्ही काय करतो, काय खातो, पितो वगैरे गोष्टी लोकाच्या चट्कन नजरेत येत रस्त्यावरून जाताना आमच्या सौ. ची साडी पाहून अक्षरश· मोटारी आपला वेग कमी करून आमच्याकडे वळून वळून पहात असत पण एक गोष्ट मात्र

सत्य आहे की लोक वागण्यात अगदी चागले असल्यामुळे आमचे जीवन सुखावह झाले

सेंट्रल अमेरिकेतही भारतीय वस्ती नसल्यामुळे आम्ही जेथे-जेथे जात होतो तेथे साडीमुळे आम्हाला व्ही आय पी प्रमाणे वागणूक मिळत असे

## मध्य अमेरिका

## सेंट्रल अमेरिकेत नेमणूक

१९७४ च्या सुरवातीस आम्ही पाराग्वेहून दिल्लीला परतलो फेब्रुवारीमध्ये कॅम्लीन कपनीचे श्री दिलीप दाडेकर याच्याशी अजलीचे लग्न ठरले आणि ३१ मार्च ७४ रोजी दादरच्या वनिता समाजात मोठ्या थाटामाटाने लग्नसोहळा पार पडला त्यानतर आमच्या सौ आणि मी जड अत करणाने परत दिल्लीला जाण्याच्या तयारीत होतो, तेवढ्यात दिल्लीहून मला फोन आला की आय टी यू. कडून सेंट्रल अमेरिकेसाठी रीजनल ॲड्व्हायजर म्हणून माझी नियुक्ती झाली आहे व मी दिल्लीला गेल्यावर याबाबत पुढे काय करावयाचे ते ठरणार आहे

दिल्लीला गेल्यावर मला सागण्यात आले की, मी नुकताच पाराग्वेहून परत आलो आहे व जरी आय टी यू ने मला नियुक्त केले आहे तरी आम्ही तुम्हाला सोडू इच्छित नाही म्हणून मी म्हटले की माझ्याऐवजी जर दुसरा भारतीय अधिकारी असा असेल की ज्याला हे सर्व गुणविशेष आहेत व ज्याला अस्खलित स्पॅनिश भाषा येते तर अशा माणसाची नियुक्ती सरकारने करून आय टी यू. ला कळवावे नाहीतर ही नेमणूक भारताऐवजी इतर कुठल्यातरी देशाला निश्चित जाईल नंतर मी आमच्या मत्रालयाच्या सेक्रेटरींनाही भेटलो व असा तोडगा निघाला की मी जर सरकारी नोकरीतून रिटायर

होण्यास तयार असेन तर मला ही नवी नेमणूक स्विकारता येईल त्यावेळी माझ्या सरकारी नोकरीची ३० वर्षे पूर्णही झाली होती म्हणून मी 'हो' म्हटले व माझा जाण्याचा मार्ग खुला झाला

सेंट्रल अमेरिकेत मेक्सिकोच्या दक्षिणेस स्पॅनिश बोलणारे ६ देश आहेत ते म्हणजे ग्वाटेमाला, एल् साल्व्हाडोर, निकाराग्वा, हॉंड्यूरस, कॉस्टारिका व पनामा पूर्व किनाऱ्यावर एक 'बेलिझ' नावाचा देश आहे तेथील सर्व लोक निग्रो असून भाषा इग्रजी आहे पूर्वी बेलिझ ही एक ब्रिटीश कॉलनी होती माझी मुख्य कचेरी सान्साल्व्हाडोर येथे होती त्यामुळे तेथेच आम्ही आमचे नवीन बिऱ्हाड थाटले.

रेडिओ फ्रिक्वेन्सी मॅनेजमेंट व मॉनिटरींग या विषयात हे देश अनभिज्ञ होते व प्रत्येक देश आपल्या मर्जीप्रमाणे फ्रिक्वेन्सीचे वाटप करीत होता या सर्व गोष्टी आतरराष्ट्रीय नियमानुसार करावयाच्या असतात व त्यावर योग्य ती देखरेख ठेवावी लागते माझे महत्त्वाचे काम म्हणजे या प्रत्येक देशात जाऊन ती कामे योग्य पद्धतीने करण्याची पद्धत त्याना घालून देऊन सर्व कामात सुसूत्रपणा आणण्याचे होते गेली कित्येक वर्षे ही कामे करीत असलेले सरकारी लोक प्रथम या नव्या शिस्तीवर नाखूष होते त्याच्याशी बोलून त्याच्या वरिष्ठाची मने वळवून हे काम तडीला नेणे फार कठीणच होते

या प्रत्येक देशात दर खेपेला एक ते दोन आठवडे राहून ही कामे करावी लागत काही वेळा आमच्या सौ माझ्या बरोबर येत पण इतर वेळी मला एकटेच जावे लागे सुदैवाने माझा मुलगा जयत त्याचे इग्लडमधील शिक्षण सपवून कॅनडात आला होता तेथे रहाण्याऐवजी त्याला आमच्याकडे येण्याविषयी आम्ही सुचविले व काही आठवड्यात तो मोठ्या खुषीने आमच्या बरोबर राहू लागला. थोडे दिवसात त्याला मॅकॉन एरिक्सन नावाच्या अमेरिकन जाहिरात कपनीत त्याच्या

आवडीची नोकरीही मिळाली.

अमेरिकेतील देशाना बनाना रिपब्लिक्स् का म्हणतात हे सान साल्व्हाडोर इथे रहात असताना लक्षात आले. त्याचे जरी खरे कारण या देशातून अमेरिकेत व इतरत्र केळी निर्यात केली जातात हे असले तरी राजकीय दृष्ट्या हे देश केळ्याच्या सालीप्रमाणे निसरडे म्हणजे अस्थिर असत बहुतेक प्रत्येक देशात दर दोन-तीन वर्षात राज्यक्राती होऊन नवीन मिलिटरी राज्य स्थापले जात असे सुदैवाने आम्ही तेथे असलेला काळ राजकीय दृष्ट्या जरी स्थिर होता तरी प्रत्येक राष्ट्रावर नवीनवी नैसर्गिक आपत्ती कोसळत होती

१९७३ साली निकाराग्वात मोठा भूकप, १९७४ मध्ये 'फीफी' या तुफानाने एल् सालव्हाडोर व हॉंड्यूरस मध्ये प्रचड नुकसान होऊन केळ्याच्या बागा उध्वस्त झाल्या होत्या त्याचवेळी मी पॅनॲमच्या विमानाने मायामीहून साल्व्हाडोराला जात होतो त्या तुफानात आमचे विमान सापडले व जरी मी पट्टा बाधला होता तरी विमानाला बसलेल्या उसळीमुळे मी वर फेकला गेलो व माझे डोके वरती रॅकवर जोरात आदळले. आज देखील वीसवर्षांनंतर सुद्धा त्या ठिकाणी दाबले तर अजून दुखते. १९७५ मध्ये ग्वाटेमाला मध्ये फार मोठा भूकप होऊन तेवीस हजार पेक्षा अधिक लोक मरण पावले होते. पुढे दोन वर्षांनी पनामामध्ये कॅनॉलसाठी दगली व जाळपोळी झाल्या

## कॉस्टारिका

**कॉस्टारिका** हा देश मात्र अगदीच निराळा आहे. हा देश अगदी प्रगत असून तेथे हुकूमशाही नसून पूर्ण लोकशाही आहे या देशाच्या तीनही बाजूचे देश लष्करी हुकूमशहाचे अमलाखाली जरी होते तरी कॉस्टारिका मात्र लोकशाहीवालाच राहिला सर्वात विशेष म्हणजे या देशात लष्कर अजिबात नव्हते जगात असा देश अगदी विरळाच **सान होसे**

एअरअपोर्टवर उतरल्याबरोबर हा देश सभ्य लोकाचा आहे हे लक्षात येते. एअरपोर्टवरील वागणूक, टॅक्सीवाल्याचे वागणे, बाहेर हॉटेल, रेस्टॉरटस्, दुकाने व बाजारातील लोकाचे वागणे एक वेगळीच सस्कृती दाखवीत असे सरकार स्थिर राहून दर चार वर्षांनी निवडणुका होत व तोच प्रेसिडेंट पुन्हा पुढल्या खेपेस निवडणुकीसाठी उभा राहू शकत नसे.

भारतात पूर्वी एक जयती शिपिंग नावाची प्रसिद्ध मोठी कपनी होती जेव्हा त्या कपनीचे दिवाळे वाजले तेव्हा त्याचा प्रमुख जयती धर्मतेजा याने कॉस्टारिकात पळ काढला होता तेथे आमची व त्याच्या पत्नीची नेहमी भेट होत असे पुष्कळसे रिटायर्ड अमेरिकन लोक उत्तरेकडील थडी टाळण्यासाठी कॉस्टारिकात कायमचे रहाण्यासाठी आले आहेत येथील हवा पुण्यासारखी आहे विशेष म्हणजे **सान होसे** या राजधानीच्या गावी (उची ३ हजार फूट) बहुतेक वेळा बरोबर दुपारी एक वाजता पाऊस सुरू होऊन पाच वाजता आकाश निरभ्र होत असते येथील लोक युरोपियन वळणाचे व सुशिक्षित आहेत या देशाचे मुख्य उत्पन्न कॉफी, कापूस, साखर वगैरे

दक्षिण अमेरिकेतील इतर देशांचा उल्लेख या पुस्तकात इतरत्र केलेला वाचकाना आठवत असेलच जर पुन्हा प्रवासाचा योग आला तर दक्षिण अमेरिकेला भेट जरूर द्या. भारतीयाप्रमाणे स्वागत करणारे लोक जगाच्या दुसऱ्या भागातही आहेत याची आपल्याला प्रचिती येईल जाण्यापूर्वी थोडेसे स्पॅनिश शिका म्हणजे जास्त आनद लुटता येईल

# १०. आणखी भ्रमंती

- कॅरिबिअनची सफर
- यूनोतर्फे छोट्या छोट्या नेमणुका
- एडनची नेमणूक
- थायलंड व ओमान


एअरअपोर्टवर उतरल्याबरोबर हा देश सभ्य लोकाचा आहे हे लक्षात येते. एअरपोर्टवरील वागणूक, टॅक्सीवाल्याचे वागणे, बाहेर हॉटिल, रेस्टॉरटस्, दुकाने व बाजारातील लोकाचे वागणे एक वेगळीच सस्कृती दाखवीत असे सरकार स्थिर राहून दर चार वर्षांनी निवडणुका होत व तोच प्रेसिडेंट पुन्हा पुढल्या खेपेस निवडणुकीसाठी उभा राहू शकत नसे.

भारतात पूर्वी एक जयंती शिपिंग नावाची प्रसिद्ध मोठी कपनी होती. जेव्हा त्या कंपनीचे दिवाळे वाजले तेव्हा त्याचा प्रमुख जयती धर्मतेजा याने कॉस्टारिकात पळ काढला होता तेथे आमची व त्याच्या पत्नीची नेहमी भेट होत असे. पुष्कळसे रिटायर्ड अमेरिकन लोक उत्तरेकडील थडी टाळण्यासाठी कॉस्टारिकात कायमचे रहाण्यासाठी आले आहेत येथील हवा पुण्यासारखी आहे विशेष म्हणजे सान होसे या राजधानीच्या गावी (उंची ३ हजार फूट) बहुतेक वेळा बरोबर दुपारी एक वाजता पाऊस सुरू होऊन पाच वाजता आकाश निरभ्र होत असते येथील लोक युरोपियन वळणाचे व सुशिक्षित आहेत या देशाचे मुख्य उत्पन्न कॉफी, कापूस, साखर वगैरे

दक्षिण अमेरिकेतील इतर देशांचा उल्लेख या पुस्तकात इतरत्र केलेला वाचकाना आठवत असेलच. जर पुन्हा प्रवासाचा योग आला तर दक्षिण अमेरिकेला भेट जरूर द्या. भारतीयाप्रमाणे स्वागत करणारे लोक जगाच्या दुसऱ्या भागातही आहेत याची आपल्याला प्रचिती येईल. जाण्यापूर्वी थोडेसे स्पॅनिश शिका म्हणजे जास्त आनद लुटता येईल

# १०. आणखी भ्रमंती

- कॅरिबिअनची सफर
- यूनोतर्फे छोट्या छोट्या नेमणुका
- एडनची नेमणूक
- थायलंड व ओमान







## कॅरिबिअनची सफर

माझ्या पायचक्राला आणखी गती मिळावी म्हणूनच की काय एक दिवस जिनिव्हाहून मला साल्वाडोरला एक टेलेक्स आला तो अशा प्रकारे आय टी यू. ने दक्षिण अमेरिकेचे सर्व देश व कॅरिबिअन बेटे याच्यासाठी एका नव्या तत्राचा अवलब करण्यासाठी एक सेमिनार, **'लीमा'**, पेरू, येथे भरविण्याचे योजिले आहे यासाठी लिमाहून कार्लोस रोमेरो नावाचा इजिनियर स्पॅनिश भाषा बोलणाऱ्या देशांना भेटी देणार आहे त्याला इग्रजी येत नसल्यामुळे तुम्ही त्याच्याबरोबर कॅरीबिअनमधील **ट्रिनिदाद, टोबॅगो, जमेका, बार्बाडोस** वगैरे ठिकाणी दोन आठवड्यासाठी जाल का ? कामाचे स्वरूप समजून घेतल्यावर मी हो म्हटले आणि ही दोन आठवड्याची सफर केली नतर सेमिनारमध्ये भाग घेण्यासाठी मला पेरूची राजधानी लीमा येथेही दोन आठवडे जावे लागले माझे दोन वर्षांचे सेंट्रल अमेरिकेतील काम सपल्यानतर पुन्हा कॅरिबिअनच्या 'विडवर्ड' आयलडच्या देशासाठी **सेंट कीट्स** या बेटावर झालेल्या सेमिनारमध्ये भाग घेण्यासाठी १० दिवस जावे लागले या निमित्ताने एका मागून एक असे देश पाहता आले

## युनोतर्फे छोट्या छोट्या नेमणुका

काही काही देशाना एक ते तीन महिन्यापर्यंतच या क्षेत्रात मदतीची जरूरी असते त्याकरिता युनोतर्फे मला एडन, सायप्रस, नेपाळ, लायबेरीया, इक्विटोरीअल गिनी, इराक, व्हेनेझुएला वगैरे ठिकाणी जावे लागले आय् एम् ओ. तर्फेही मला दोनदा दोन-तीन महिन्यांसाठी सेंट्रल अमेरिकेत पुन्हा जावे लागले

## एडनची नेमणूक

या नेमणुकापैकी एडनची नेमणूक व तेथील वास्तव्य जरा निराळेच होते प्रथम मी एडन १९५६ मध्ये इग्लडला बोटीने जाताना एक दिवसच पाहिले होते त्यावेळी ते ब्रिटीशांच्या ताब्यात होते व 'ड्यूटी फ्री पोर्ट' म्हणून प्रसिद्ध होते दर आठवड्यातून दोनदा पी अँड ओ च्या बोटी तेथे एक-एक दिवस मुक्काम करीत होत्या व प्रवासी कॅमेरे, इलेक्ट्रिक शेव्हर, रेडिओ वगैरे वस्तू खरेदी करीत असत जो फिलीप्सचा इलेक्ट्रीक शेव्हर एडनला चार पौंडाला मिळे तोच इग्लडमध्ये ७ पौंडाला घ्यावा लागे त्यामुळे युरोपमधील लोकही बऱ्यापैकी खरेदी येथेच करीत असत. दुकाने व रस्ते गजबजलेले व सर्वत्र उत्साही वातावरण असे

जानेवारी १९७७ मध्ये युनोतर्फे मी दीड महिन्याच्या नेमणुकीवर एकटाच एडनला पोहोचलो व एअर पोर्टवरून मोटारीने स्टीमर पॉईंटवरील हॉटेलमध्ये जाऊन एक चागली खोली मिळवली संध्याकाळी बाहेर हिंडताना, तीस वर्षांपूर्वीचे एडन व आत्ताचे एडन यात जमीन-आसमानाचे अतर दिसू लागले सर्वत्र स्मशान शातता होती. बहुतेक सर्व जुनी प्रसिद्ध दुकाने बदच होती. मोठ-मोठ्या इमारतींवरचे रग उडून गेले होते व त्या जीर्ण अवस्थेत दिसत होत्या ही सर्व साम्यवादाची (कम्युनिझमची) देणगी

मध्यतरीच्या काळात आम्हाला स्वातत्र्य पाहिजे म्हणून दक्षिण येमेनच्या लोकानी एडनमध्ये बरेच दगे केले व लुटालूट केली अखेर ब्रिटीशानी तेथून पाय काढला व एडन दक्षिण येमेनची राजधानी झाली ही सर्व स्वातत्र्याची चळवळ रशियाच्या चिथावणीवरून येमेनी लोकानी केली होती त्यामुळे त्या देशात साम्यवाद आला व सर्व सुरळीत चालू असलेल्या गोष्टी बद पडल्या प्रवासी बोटींचे युगही सपुष्टात आल्यामुळे

एडनमध्ये पर्यटक येण्याचे थाबले व दारिद्र्य सर्वत्र भेडसावू लागले उत्तर येमेन मात्र या क्रातीपासून बचावला.

मी ज्या ऑफिसमध्ये काम करीत होतो, तेथे माझ्यासाठी एका पारशी मुलीची सेक्रेटरी म्हणून तात्पुरती नेमणूक केली होती. ती मुलगी कामात हुशार होती. दोन-तीन दिवसानी तिने मला सांगितले की चुकून जर आपण रस्त्यावर कोठे भेटलो तर तुम्ही मला ओळख दाखवू नका मी सुद्धा तुम्हाला ओळख दाखविणार नाही. कारण या कम्युनिस्ट देशात कुठल्याही परकीयाशी आम्हाला मिसळण्याची बदी आहे

रोज दुपारी दीड वाजता मी क्रेटर या प्रतिष्ठीत वस्तीच्या भागात एका गुजराथी घरगुती खानावळीत जेवण्यास जात असे माझा ड्रायव्हर मला गाडीतून तेथे सोडत असे व नतर एक तासाने येऊन मला माझ्या हॉटेलमध्ये पोहोचवत असे यावेळी माझ्यावर पाळत ठेवण्यासाठी एकाची नेमणूक झाली होती आठ-दहा दिवस पाळत ठेवल्यावर ही प्रथा बंद झाली

एडनमध्ये कथ्थापान खाण्याची बहुतेक लोकाना सवय होती ती म्हणजे एका विड्याच्या पानाची सुपारीएवढी केलेली गोळी असे त्यामधे कात व काही खास पदार्थ घातलेले असत. ती गोळी तोंडात गालाजवळ ठेवून त्याचा अर्क कित्येक तास घेऊन, लोक काहीशा गुंगीतच सर्वकडे फिरत हे खाण्याचे (चघळण्याचे) तेथील लोकाना व्यसनच होते एडनमध्ये साप्ताहिक सुट्टी शुक्रवारी असे म्हणून या कथ्था पानाची विक्री फक्त गुरूवारी दुपारी दोन नतर होई. व शनिवारनतर बद असे माझा दीड महिन्याचा मुक्काम केव्हा सपतो असे मला झाले होते

१९९० मध्ये उत्तर व दक्षिण येमेन याची एकी होऊन **येमेन** हे एक राष्ट्र बनले व त्याची राजधानी **सन्ना** येथे झाली पण हा मधुचद्र मे १९९४ मध्ये संपुष्टात येऊन पुन्हा या दोघात लढाई सुरू झाली आहे.

## थायलंड व ओमान

पुढे १९७८ मध्ये थायलडमध्ये दोन वर्षे राहण्याची सधी मिळाली

बॅंकॉक मध्ये पुन्हा एकदा आम्ही बिऱ्हाड थाटले वरचेवर बिऱ्हाड थाटणे व नव्याने दर खेपेला वेगवेगळ्या देशात ससार सुरू करणे या बाबतीत आमच्या सौ. आनदाने तयार होत असत स्वत पूर्ण शाकाहारी राहून सर्वत्र रहाणे फार कठीण काम असते ते त्यानी अगदी कुशलतेने पार पाडले. ठिकठिकाणचे हवा, पाणी, खाण्याच्या पद्धती यातील फरकही त्यानी व्यवस्थित पचवून प्रकृती उत्तम ठेवली त्याच्या अशा कायम मिळणाऱ्या सहकार्यामुळेच आमचे हे भटकते जीवन सुखावह व यशस्वी झाले.

बॅंकॉकला दोन वर्षे राहून पुण्यात आल्यावर आता कुठेही जायचे नाही असे आम्ही ठरवले होते पण एक महिन्यानतर टेलिफोन खणखणला तो जिनिव्हाचा होता व त्यानी मला थोडे दिवसासाठी अत्यत जरूरीच्या कामासाठी मस्कत, ओमानमध्ये यावे अशी आग्रहाची विनती केली त्यांना मी प्रथम नाहीच म्हटले, पण पुन्हा दुसरे दिवशी त्या डिपार्टमेंटच्या मुख्याचा फोन आला. त्याला जर आय टी. यू. आम्हा दोघाचा खर्च करणार असेल तर मी तयार आहे असे सागितले त्यावर त्याने होय म्हणून मला गप्प केले प्रथम फक्त ३ महिन्यासाठी म्हणून आम्ही मस्कतला गेलो ते तेथे अडीच वर्षे राहिलो. मस्कतला मराठी समाज खूप मोठा असल्यामुळे व सर्व पदार्थ पुण्या-मुबईसारखे मिळत असल्यामुळे जीवन अगदी सुसह्य झाले मार्च १९८४ मध्ये आम्ही ओमानमधून परत आलो व आय टी यू. च्या कामातून निवृत्ती घेतली

❖

# ११. अनपेक्षित भेटलेल्या व्यक्ती

– अर्जेंटिनातील भारतीय राजदूत

– पाकिस्तानी जोडपे

– रेझिस्टेन्सियातील भारतीय इंजिनिअर

– महाराष्ट्रीयन चेहेरा

– मालाबोत पुणेकर

– गयानातील आर्किटेक्ट ओमानमध्ये

– पर्थमध्ये साल्व्हाडोरमधील सेक्रेटरी

– स्वामी चिन्मयानंद व बाबा मुक्तानंदांची भेट

# अनपेक्षित भेटलेल्या व्यक्ती

## अर्जेंटिनातील भारतीय राजदूत

दक्षिण अमेरिकत पराग्वे या देशात १९७१-७३ मध्ये रहात असताना त्या सबध देशात भारतीय नागरिकाची संख्या फक्त तीनच होती. एक म्हणजे आमची मुलगी अंजली, आमच्या सौ. आणि मी स्वत । आमच्या सौ नेहमी साडी नेसून सर्वत्र फिरत असल्यामुळे तेथील लोकांना तो एक कुतूहलाचा व चर्चेचा विषय झाला होता. आम्ही कोठे कोठे गेलो याची बातमी तिसऱ्या दिवशी माझ्या सेक्रेटरीच मला सागत असत.

**असुनसिऑनच्या** प्रसिद्ध ग्वारानी हॉटेलच्या लॉबीमध्ये एक दिवस आम्ही तिघे बसलो होतो तेवढ्यात एक गृहस्थ आमच्याकडे येऊन स्पॅनिश मध्ये विचारू लागले की आम्ही ''इंदू'' आहोत काय ? (दक्षिण अमेरिकेत Indian म्हणण्याऐवजी भारतीयाना ''इदू'' म्हणून संबोधितात.) आम्ही हो म्हटल्यावर तो गृहस्थ म्हणाला, ''थोडे थांबा. मी आपल्याला एका मोठ्या गृहस्थाची ओळख करून देतो.'' त्याने थोड्या वेळात आम्हाला लिफ्टमधून सातव्या मजल्यावर एका प्रशस्त खोलीत नेले. तेथे भारताचे अर्जेंटिनातील राजदूत श्री खुराणा व त्यांच्या पत्नी बसल्या होत्या. आम्हाला एकमेकाना पाहून आश्चर्याचा धक्काच बसला भारत सरकारने श्री. खुराणा याची अर्जेंटिना बरोबर पराग्वेचेही भारतीय राजदूत म्हणून नेमणूक केली होती व दुसऱ्या दिवशी ते आपले राजकीय ओळखपत्र (Credentials) पराग्वेचे प्रेसिडेंट स्ट्रॉयसनेर याना समारभपूर्वक सुपूर्त करणार होते यानतर खुराणा कुटुबियाची व आमची ओळख वाढून मधून-मधून जाणे-येणे



बाबा मुक्तानंद

# अनपेक्षित भेटलेल्या व्यक्ती

## अर्जेंटिनातील भारतीय राजदूत

दक्षिण अमेरिकत पराग्वे या देशात १९७१-७३ मध्ये रहात असताना त्या सबध देशात भारतीय नागरिकांची सख्या फक्त तीनच होती एक म्हणजे आमची मुलगी अजली, आमच्या सौ आणि मी स्वत· । आमच्या सौ नेहमी साडी नेसून सर्वत्र फिरत असल्यामुळे तेथील लोकांना तो एक कुतूहलाचा व चर्चेचा विषय झाला होता आम्ही कोठे कोठे गेलो याची बातमी तिसऱ्या दिवशी माझ्या सेक्रेटरीच मला सागत असत

**असुनसिऑनच्या** प्रसिद्ध ग्वारानी हॉटेलच्या लॉबीमध्ये एक दिवस आम्ही तिघे बसलो होतो तेवढ्यात एक गृहस्थ आमच्याकडे येऊन स्पॅनिश मध्ये विचारू लागले की आम्ही ''इदू'' आहोत काय ? (दक्षिण अमेरिकेत Indian म्हणण्याऐवजी भारतीयाना ''इदू'' म्हणून संबोधितात ) आम्ही हो म्हटल्यावर तो गृहस्थ म्हणाला, ''थोडे थाबा मी आपल्याला एका मोठ्या गृहस्थाची ओळख करून देतो.'' त्याने थोड्या वेळात आम्हाला लिफ्टमधून सातव्या मजल्यावर एका प्रशस्त खोलीत नेले. तेथे भारताचे अर्जेंटिनातील राजदूत श्री खुराणा व त्याच्या पत्नी बसल्या होत्या आम्हाला एकमेकाना पाहून आश्चर्याचा धक्काच बसला भारत सरकारने श्री खुराणा याची अर्जेंटिना बरोबर पराग्वेचेही भारतीय राजदूत म्हणून नेमणूक केली होती व दुसऱ्या दिवशी ते आपले राजकीय ओळखपत्र (Credentials) पराग्वेचे प्रेसिडेंट स्ट्रॉयसनेर याना समारभपूर्वक सुपूर्त करणार होते यानतर खुराणा कुटुबियाची व आमची ओळख वाढून मधून-मधून जाणे-येणे

ही होऊं लागले

## पाकिस्तानी जोडपे

एकदा आम्ही एका डॉक्टरकडे गेलो असता आमच्या सौ. ची साडी पाहून त्या डॉक्टरने आम्ही कुठले ? काय ? म्हणून चौकशी केली व पाकिस्तान भारतापासून किती दूर आहे असे विचारले. आम्ही ही चौकशी कशासाठी करीत आहात असे विचारल्यावर ती डॉक्टरीण म्हणाली, ''येथून ३० मैलावर एक पाकिस्तानी दांपत्य एका तेलाच्या कारखान्यात नोकरीसाठी काही महिन्यापूर्वी आले आहे तुम्हाला हवे असेल तर मी त्याची ओळख करून देईन'' पुढे लवकरच त्याची भेट होऊन आमची चांगलीच गट्टी जमली

## रेझिस्टेन्सियातील भारतीय इंजिनीअर

श्री खुराणाच्या भेटीत या भागात आणखी कोणी भारतीय राहातात का असे विचारल्यावर कळले की अर्जेंटिनात **रेझिस्टेन्सिया** या गावी (असुनसिऑनपासून सुमारे २०० मैलावर) एक कापडाची मोठी गिरणी आहे तेथे ३-४ भारतीय कुटुंबे आहेत आमच्या बरोबर एक वर्ष राहून अंजली पुण्याला फर्ग्युसन कॉलेजला परत गेली त्यामुळे आम्हाला फारच एकाकी वाटू लागले होते म्हणून आम्ही एका रविवारी सकाळी बसने रेझिस्टेन्सियाला गेलो व बस ड्रायव्हरला आम्हाला कोठे जायचे ते सांगितले यापूर्वी आम्ही त्या भागात कधीही न गेल्यामुळे थोडे साशंकच होतो सुमारे १२ वाजता त्या बस ड्रायव्हरने कापड गिरणीच्या जवळच आम्हाला सोडले रविवार असल्यामुळे गिरणी बंद असणार याची आम्हाला कल्पना होतीच गेटजवळ गेल्यावर आम्ही वॉचमनशी चौकशी करू लागलो, तेवढ्यात एक गोरा साहेब आपल्या गाडीतून गिरणीतून बाहेर येत होता त्याच्याकडे चौकशी केल्यावर त्याला या भारतीय इजिनिअराची पूर्ण माहिती होती असे

कळले त्यामुळे त्याने आपल्या गाडीतून आम्हाला श्री माथुर याच्याकडे नेले थोड्याच वेळात त्या चारही कुटुंबियांची ओळख होऊन आमचे जेवणही झाले

विशेष म्हणजे पुढे १८ वर्षांनी त्यातील एक इजिनिअर मला बेळगावला आमच्या कापड गिरणीत काम करताना भेटले तेव्हा आम्ही दोघानी स्पॅनिशमध्ये मनसोक्त गप्पा केल्या

## महाराष्ट्रीअन चेहरा

एकदा सध्याकाळी जर्मनीतील फ्रँकफुर्ट रेल्वे स्टेशनावर मी कॉफी घेत एका स्टॉलवर उभा होतो वेळ अगदी गर्दीची होती बोरीबदरच्या गर्दीची छोट्या प्रमाणावर आठवण होत होती. तितक्यात एक गृहस्थ समोरून आले व मला अस्खलित मराठीत विचारू लागले की आपण मराठी बोलता का ? त्या गृहस्थाला मी आयुष्यात कधीही पाहिले नव्हते व विशेष म्हणजे इतर सर्व लोकाप्रमाणे मी सुद्धा सूट घातलेला होता. त्याचा हा प्रश्न ऐकून मी चकित झालो ते सद्गृहस्थ डोंगरे नावाचे बडोद्याचे रहाणारे गेली कित्येक वर्षे जर्मनीत स्थायिक होते त्यानी मलाच मराठीत हा प्रश्न का विचारला ? त्यावर ते म्हणतात, ''अहो, महाराष्ट्रीयन चेहरा कुठे लपेल का ?''

## मालाबोत पुणेकर

युनोच्या कामानिमित्त पश्चिम आफ्रिकेच्या **इक्वीटोरील गिनी** नामक एका भयानक देशात मला तीन आठवड्यांसाठी जाण्याचा एकदा प्रसग १९७८ साली आला त्या वेळी त्या देशात मॅसिया नामक एका अत्यत क्रूर हुकूमशहाचे राज्य चालू होते एकेकाळी स्पेनच्या अमलाखाली हा देश अगदी भरभराटीत होता. याची राजधानी **मालाबो** (पूर्वीचे नाव साता इसाबेला) ही पश्चिमेला समुद्रात ७० मैलावर होती व देशाचा मुख्य भाग आफ्रिकेच्या भूखडावरच होता या साम्यवादी

राजवटीत हा देश अगदी कगाल होऊन तेथील निग्रो नागरिकाची फार दैन्यावस्था झाली होती जगातील उत्तम दर्जाचा कोको या देशात होत असे दरवर्षी ६० हजार टन कोकोची निर्यात होई मॅसियाच्या कम्युनिस्ट/फॅसिस्ट राजवटीत कोकोची निर्यात फक्त ६ हजार टनावर आली होती या देशात पूर्वी मोठमोठी दुकाने उघडलेली होती फ्री-पोर्ट प्रमाणे (करमुक्त) व्यापार चालत असे पश्चिम आफ्रिकेचे सर्व देश येथूनच विदेशी माल खरेदी करीत. येथील काही मोठी दुकाने भारतीयाची (सिधी लोकाची) होती.

परतु जेव्हा मी तेथे गेलो तेव्हा ही सर्व भरभराट लोप पावलेली होती. तिथल्या उत्तम हॉटेलमध्ये जेवणात फक्त चण्याची उसळ व भाजलेली रोटी मिळत होती एका बियर कॅनला आठ डॉलर पडत होते त्या वेळी तेथील यूनो ऑफिसचा मुख्य रॉबर्टस् नावाचा एक इग्लिश माणूस होता दिवसभर काम सपल्यावर तो मला म्हणाला, ''आपल्याला काही भारतीयाना भेटायची इच्छा आहे का ? आता या बेटावर फक्त दोनच भारतीय एका सिधी दुकानाची देखभाल करीत आहेत '' आनदाने मी 'हो' म्हटले व सध्याकाळी पाच वाजता आम्ही दोघे त्याच्या घरी गेलो त्यांची ओळख करून दिल्यावर तो इग्लिश माणूस निघून गेला, व आमच्या गप्पा सुरू झाल्या. ते दोघे वयाने तिशीच्या घरात व जवळचे नातलग होते आश्चर्य म्हणजे दोघेही पुण्याचेच व स्पष्ट मराठी बोलणारे निघाले त्याच्या घरचे एक शूमार्ट पुण्याच्या अपोलो सिनेमा समोर होते तो दिवस दिवाळीतील लक्ष्मी पूजनाचा होता व त्या दिवशी मी स्वत· लक्ष्मी पूजा सागितली । पहा, जग किती लहान आहे ते ।

## गयानातील आर्किटेक्ट ओमानमध्ये

दक्षिण अमेरिकेत प्रवास करताना एकदा १९७५ साली

ब्रिटीश गयाना मध्ये जॉर्जटाऊन येथे ३-४ दिवस कामानिमित्त मला जावे लागले. त्यावेळी गयानातील जीवित अत्यत असुरक्षित होते. दिवसाढवळ्या तेथे हमरस्त्यावर सर्रास लूटमार होत असे विशेषत परकीय माणसावर हे हल्ले फार होत असत. या लूटमारीला Choke and rob असे म्हणत म्हणजेच तुमच्या मागे एका सायकलवरून दोन निग्रो तरुण येत त्यातील एकजण तुमच्या गळ्याभोवती दोरी आवळे व तेवढ्यात दुसरा तुमची चीजवस्तू हिसकावून घेई

एका रात्री मी युनोतर्फे तेथे गेल्यामुळे एक छोटासा भोजन समारंभ आयोजिला होता व त्याला ७-८ जोडपी आली होती त्यातील ४ भारतीय जोडपी होती गयानातील काम सपवून मी त्रिनिदादला गेलो पुढे ७ वर्षांनी मी जेव्हा ओमानमध्ये मस्कत येथे काम करीत होतो तेव्हा चार दिवसासाठी ओमानच्या दक्षिणेस सलाला येथे कामानिमित्त गेलो होतो व तेथे 'हॉलीडे इन' नामक हॉटेलमध्ये रहात होतो तिथल्या Receptionist ला मी भारतीय असून मराठी बोलतो हे कळल्यावर त्याने मला एखाद्या मराठी बोलणाऱ्या गृहस्थांना भेटायचे काय ? म्हणून विचारले. मी 'हो' म्हणताच त्याने त्याना फोनवरून बोलाविले व अर्ध्या तासात सावंत नावाचे गृहस्थ आले. ते आल्यावर काही वेळ माझ्याकडे पहात उभे राहिले व त्यानी आपली ७ वर्षांपूर्वी गयानात भोजनप्रसगी भेट झाल्याचे वर्णन केले श्री सावत एक प्रसिद्ध आर्किटेक्ट असून स्वस्त घरे बांधण्यात त्याचे प्राविण्य आहे त्याच्या उत्तम स्मरणशक्तीला अभिवादन करून नंतर आम्ही बिअर-पान केले श्री सावंत आता मुंबईत स्थायिक झाले आहेत

असे आणखी कितीतरी प्रसग आहेत. पण वाचकहो, आणखी एक दोन प्रसग सागून हा विषय पुरा करतो.


## पर्थमध्ये साल्व्हाडोरमधील सेक्रेटरी

१९९२ मध्ये ऑस्ट्रेलियात पर्थ मध्ये आम्ही तीन महिने राहिलो होतो एकदा आमच्या सौ आणि मी बसमध्ये प्रवास करीत असताना आमच्या समोर थोड्या अतरावर दोन मध्यमवयीन गोऱ्या बायका आपापसात आमच्याकडे काहीशा कुतुहलाने पाहून बोलत होत्या थोड्या वेळाने एक बाई आमच्याकडे आली आणि विचारू लागली, की काही वर्षापूर्वी (म्हणजे १६ वर्षापूर्वी) मी मध्य अमेरिकेत सान् साल्व्हाडोर मध्ये तेथील कम्युनिकेशन डिपार्टमेंट मध्ये काम करत होतो का ? हे ऐकून मी चकीतच झालो व हो म्हटले. मी पुढला प्रश्न विचारण्याच्या आतच त्या बाईने मला सागितले की, ''माझी मैत्रीण त्या देशातली आहे व तिला इग्रजी नीट बोलता येत नाही. (कारण ती स्पॅनिश बोलत असे.) म्हणून मी आपल्याशी बोलत आहे तिचे नाव इरमा आहे ती तुमची सेक्रेटरी म्हणून काही दिवस तुमच्या बरोबर काम करीत असे '' नतर इरमाशी बोलल्यावर पूर्ण ओळख पटली साल्व्हाडोरमध्ये चाललेल्या राजकीय व इतर जाचाला कटाळून इरमा आपल्या मुलासह ऑस्ट्रेलियात मायग्रेट झाली होती


आता तर जग आणखीनच लहान वाटू लागले

## स्वामी चिन्मयानंद व बाबा मुक्तानंदांची भेट

कॅरिबिअन बेटावरील **'जमेका'** या प्रगत बेटावर आय टी यू. च्या कामासाठी मला १९७५ मध्ये तीन दिवसाचा दौरा काढण्याचा एकदा योग आला तेथे युनोच्या कचेरीत गेल्यावर युनोतर्फे कोणकोण विशेषज्ञ आहेत याची यादी चाळत असता श्री वैद्य हे मराठी नाव दिसले. श्री. वैद्य त्या देशात लेदर (कातड्याचे) विशेषज्ञ म्हणून काम करीत होते थोड्या वेळात त्याच्याशी फोनवरून बोलणे झाले व दुपारी चार वाजता त्यांच्या घरी चहाला गेलो बोलता बोलता श्री वैद्य म्हणाले




१० ● सौ नलिनी व श्री वा म गोगटे (पृष्ठ १३६)



१९७० मध्ये दिल्लीत भरलेल्या इटरनॅशनर रेडिओ कॉन्फरन्ससाठी जमलेल्या प्रतिनिधींची श्री गोगटे राष्ट्रपतीभवनात राष्ट्रपती गिरींशी ओळख करून देताना (पृष्ठ १४३)

अधिवेशन चालू असताना (पृष्ठ १४३)



की आज सध्याकाळी 'स्वामी चिन्मयानदाचे' एक भाषण-प्रवचन येथील टाऊन हॉलमध्ये आहे. तुम्हाला आवड असल्यास आपण सगळेच तिकडे जाऊ या

इतकी वर्षे स्वामीजींविषयी पुष्कळदा वाचण्याचा योग आला होता परंतु प्रत्यक्ष त्याना पहाण्याचा किंवा ऐकण्याचा योग आज प्रथमच येत असल्यामुळे मला खूप आनद झाला. प्रेक्षकानी टाऊन हॉल अगदी पूर्ण भरला होता त्यात बरेचसे निग्रो, अमेरिकन, ब्रिटीश, आणि भारतीय लोकही होते. पुरुषाबरोबर बऱ्याचशा स्त्रियाही हजर होत्या यापूर्वी स्वामीजींची या बेटावर एक-दोन भाषणे झाली असल्यामुळे तेथील लोकाना त्याची महती कळलेली होती ठरल्याप्रमाणे सध्याकाळी ठीक सहा वाजता स्वामीजींच्या अस्खलीत इग्रजी भाषणाचा प्रवाह सुरू झाला बरोबर एक तासात त्यानी हिंदू तत्त्वज्ञान यावर इतका प्रकाश टाकला की सर्व श्रोते मत्रमुग्ध झाले भाषण सपल्यावर वैद्य कुटुबियासोबत थोडा वेळ स्वामीजींच्या सान्निध्यात आम्हाला राहाता आले एवढ्या महान पुरुषाच्या दर्शनाचा योग जमेकासारख्या बेटावर मला यावा म्हणून अजूनही आश्यर्च वाटते

## बाबा मुक्तानंदांची प्रथम भेट

मुबईपासून ४० मैलावर वज्रेश्वरी नजीक **'गणेशपुरी'** येथे **'गुरुदेव सिद्धपीठ'** नामक मुक्तानदाचा आश्रम गेली कित्येक वर्षे आहे आम्ही बहुतेक काळ उत्तर भारतात रहात असल्यामुळे या आश्रमाची भेट होण्याचा योग पुष्कळ वर्षे आलाच नाही माझ्यापेक्षा आमच्या सौ बाबा मुक्तानदाच्या व त्याच्या नतर गुरुमाईच्या खऱ्या भक्त आहेत व त्या नियमाने सत्सग व इतर कार्यक्रमात भाग घेतात

१९७६ मध्ये सेंट्रल अमेरिकेतील माझी दोन वर्षांची नेमणूक सपवून आमच्या सौ., जयंत आणि मी न्यूयॉर्कला

आलो व थोडे दिवस तेथे एका अपार्टमेंटमध्ये रहात होतो एकदा सध्याकाळी तेथे श्री. गडकरी याच्या घरी गेलो असता नित्यानद बाबा व मुक्तानदाचे फोटो पाहिले व आमच्या सौ एकदम खूष झाल्या मग या संत लोकाविषयी मोठ्या श्रद्धेने बोलणे सुरू झाले तेव्हा आम्हाला कळले की न्यूयॉर्कच्या उत्तरेस सुमारे शभर मैलावर **'फॉल्सबर्ग'** म्हणून एक ठिकाण आहे तेथे नव्यानेच बाबा मुक्तानदानी आपला आश्रम सुरू केला आहे. हे ऐकताच आम्ही त्या आश्रमात फोन करून तेथे राहण्याचीही सोय असते हे कळल्यावर तिसऱ्या दिवशी सकाळी बसने तेथे गेलो

सुदैवाने बाबा आश्रमात होते त्यांनी हसतमुखाने आमचे स्वागत करून म्हटले की, ''हम आपकाही इतजार कर रहे हैं ।'' हे ऐकून आम्हाला धन्य वाटले या आश्रमाच्या जागी पूर्वी एक हॉटेल होते व त्या आवारात स्वतत्र चार-पाच घरकुले होती व प्रवेशद्वारानजीक मोठा हॉल व इतर खोल्या होत्या आवारातील छोट्या छोट्या रस्त्याना भारतीय नावे दिली होती दोन दिवस आम्ही तेथील दैनदिन कार्यक्रमात भाग घेऊन परत आलो व जयत आणि आमच्या सौ केनेडी एअरपोर्टवरून भारतात परतले व मी 'पोर्टोरीको' वरून कॅरिबियन मध्ये सेंट कीटस् बेटावर एका सेमिनारमध्ये चार लेक्चर्स देण्यासाठी दुसऱ्या दिवशी रवाना झालो हा फॉल्सबर्गचा आश्रम आता खूपच मोठा झाला असून तेथे साधकासाठी सर्व सोयी केलेल्या आहेत यानतर आमच्या सौ व मी गणेशपुरीला काही वेळा जाऊन आलो


विशेष म्हणजे आम्ही जेव्हा सिडनेला गेलो होतो तेव्हा तेथे **हर्लस्टोन पार्क** स्टेशन नजीक असलेला बाबांचा आश्रम पाहिला. पुढे पर्थमध्ये रहात असताना तेथील ऑस्ट्रेलियन लोकांसमवेत दर रविवारी सकाळी आठ वाजता गुरुगीतेच्या कार्यक्रमात आम्ही भाग घेत होतो. टोकियोमध्येही आम्ही एका

सत्सगात भाग घेऊ शकलो. विशेष म्हणजे त्या सत्सगात सर्व जपानी स्त्री-पुरुष होते व सर्व सत्सग जपानी भाषेतच चालला होता  आमच्यासाठी मुद्दाम हेडफोनची सोय करून एक जपानी मधून मधून त्याच्या जपानी इग्रजीत आम्हाला भाषातर करून सागत होता  भारतीय पद्धतीच्या सत्सगामध्ये जपानी लोकानी भाग घेतलेला पाहून नवलही वाटले आणि आनदही झाला

❖

# १२. भूगोल प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी : थोडे आत्मचरित्र :

- गोगटे कुटुंबीय
- शिक्षणातील खाचखळगे
- विवाह व संसार
- जयंतचे शिक्षण आणि विवाह
- अंजलीचे शिक्षण आणि विवाह
- सिव्हिल एव्हिएशन
- इंग्लंडची पहिली सफर
- संचार मंत्रालयात नेमणूक
- यूनो आणि विकसनशील देशांना सहाय्य
- आय टी यू म्हणजे काय ?
- तंत्रज्ञांची निवड कशी करतात ?
- निवृत्तीनंतरचा व्यवसाय



# भूगोल प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी
## : थोडे आत्मचरित्र :

१९५६ च्या जून महिन्यात "स्ट्रॅथमूर" या २४ हजार टनी बोटीने मी इंग्लंडला गेलो. तो माझा पहिला परदेश प्रवास. त्यानंतर आजतागायत मी सतत परदेश प्रवास करीत आलो. जवळ जवळ ८० देशांना भेटी दिल्या त्यांपैकी १८ देशांमध्ये कमी अधिक मुदतीसाठी तेथील लोकांच्या बरोबर त्यांच्याच कार्यालयात काम करण्याची मला संधी मिळाली तिथले प्रदेश डोळ्यांनी पाहिले. तिथल्या लोकांचा परिचय वाढतच गेला आणि त्यामुळे त्यांच्या चालीरीतींची मला थोडीफार का होईना माहिती झाली हे सगळे अनुभवण्यासाठी मला बरेच परिश्रम करावे लागले अडचणी आल्या तरी चिकाटी न सोडता शिक्षण पूर्ण करावे लागले जगप्रवासी होईपर्यंतचा माझा प्रवास कसा झाला हे इथे थोडक्यात सांगितले तर वावगे ठरू नये

माझा म्हणजेच **वामन महादेव ऊर्फ मोहन गोगटे** याचा जन्म टेंभू या लहानशा गावी (कऱ्हाडपासून तीन मैलावर) १० सप्टेंबर १९१९ रोजी झाला. वडील कऱ्हाड येथे डॉक्टर होते व प्लेगच्या साथीमध्ये त्यानी कऱ्हाडच्या आसपास सायकलवरून दौरा करून इनॉक्युलेशनचे फारच मोठे काम केले होते

माझे प्राथमिक शिक्षण कऱ्हाड येथे झाले मुलाना चांगले शिक्षण मिळावे म्हणून वडिलानी आपले सर्व बिऱ्हाड बेळगाव येथे नेले तेथील चिंतामणराव हायस्कूलमध्ये शिक्षण घेऊन १९३६ मध्ये मी मॅट्रिकची परीक्षा चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण झालो

## गोगटे कुटुंबीय

त्यावेळी गोगटे कुटुबीय म्हणजे आई, वडील, मोठा भाऊ - मधुकर, मोठी बहीण लीलाताई, धाकटा भाऊ - वासू, व सर्वात लहान बहीण विमल असे एकदर सात जणाचे होते ते दिवस जागतिक मदीचे असल्यामुळे सर्व मध्यमवर्गीय कुटुबियाप्रमाणे आम्हालाही त्याची चागलीच झळ पोहचत होती

माझे मोठे बधू मधुकर म्हणजे बेळगावचे प्रसिद्ध उद्योगपती व कारखानदार म्हणून जे सर्वांना परिचित आहेत ते रावसाहेब गोगटे बेळगाव, पुणे, मुबई व महाराष्ट्रात इतर ठिकाणी त्यानी अनेक सस्थाना बऱ्याच मोठ्या देणग्या देऊन आपले नाव अजरामर केले आहे

मोठी बहीण लीलाताई हिचा विवाह ठाणे येथे श्री नानासाहेब गागल याच्याशी झाला नाना पुढे मुबई हायकोर्टमध्ये रजिस्ट्रारच्या हुद्यावरून रिटायर झाले व स्वत ची वकिलीची प्रॅक्टीस करीत असत लीलाताईला भूगोल व इतर वाचनाची व लेखनाची खूपच आवड आहे

धाकटा वासुदेव स्टेट ट्रान्सपोर्टमधून ऑफिसर म्हणून रिटायर झाला व पुढे नालासोपारा येथे गोगटे मिठागराचा प्रमुख म्हणून काम पाहू लागला वासूनाना चार वर्षांपूर्वी आम्हाला सोडून गेले धाकटी बहीण दिसायला अतिशय सुदर व मोठी समाजकार्यकर्ती होती तिचे लग्न पुण्यात श्री तात्यासाहेब बापट याच्याशी झाले दुर्दैवाने आता दोघेही हयात नाहीत.

## शिक्षणातील खाचखळगे

१९३६ मध्ये मॅट्रीकची परीक्षा पास झाल्यावर बिकट आर्थिक परिस्थितीमुळे कॉलेजमध्ये नाव घालणे शक्य नव्हते

म्हणून मुबईस मी रेडिओ इलेक्ट्रीक या इन्स्टिट्यूट मध्ये रेडिओ व वायरलेसचे शिक्षण घेण्यास आरभ केला एके दिवशी वडिलानी त्याचा आत्तेभाऊ नरहरी वर्तक याच्याकडे ठाकूरद्वार मध्ये जितेकर वाडीत मला नेऊन सोडले व आता तू रेडिओ शिकून मोठा हो असे सागितले एक वर्षाचा रेडिओ कोर्स सपवून मी सरकारी परीक्षा पास केली पुढे वायरलेस ऑपरेटरच्या परीक्षेसाठी अठराव्या वर्षी कलकत्ता गाठले १९३७ च्या नोव्हेंबरमध्ये अत्यत कठीण अशी वायरलेस ऑपरेटरची परीक्षा पास झालो या परीक्षेत १०० मुलापैकी फक्त ५ किंवा ६ मुलेच परीक्षा पास होत असत व "पहिल्या खेपेस पास होणे म्हणजे अत्यत कठीणच हा विषय बहुतेक अँग्लो-इडियन, ख्रिश्चन व पारशी मुलेच शिकत असत मराठी मुलापैकी पास होणारा मी बहुदा पहिलाच विद्यार्थी असेन

पुढील एक दोन वर्षात मुबईतच नोकरी करून मी सिटी अँड गिल्डस्, लडनच्या सर्व परीक्षा पास केल्या १९३९ च्या जूनमध्ये मुबई सोडून मी पुण्यातील स प महाविद्यालयाला जोडून असलेल्या रेडिओ स्कूलमध्ये नोकरी धरली व पुढल्या वर्षी एफ् वाय् सायन्सच्या वर्गात नाव घातले कितीही श्रम पडले तरी रेडिओ, वायरलेस बरोबर मुबई विश्व विद्यालयाची सायन्सची पदवी मिळविण्याची माझी खरी इर्षा होती

१९४४ मध्ये माझी जी आय् पी रेल्वेत मुबईला वायरलेस सुपरवायझर म्हणून नेमणूक झाली दरम्यान ए एम् आय ई ई लडनच्या परीक्षा देऊन इलेक्ट्रिकल इजिनियरच्या तुलनेची पदवी मी सपादन केली या सर्व खटाटोपात बी एस् सी ची पदवी मिळविणे लाबले तेवढ्यात माझी मुबईहून झाशीला बदली झाली अखेरीस १९४६ मध्ये मला परीक्षेस बसण्याची परवानगी मिळून B Sc ची पदवी पदरात पडली ! असो या सर्व शिक्षणात मला 'गुरु' असा कोणी लाभला नाही बहुतेक सर्व शिक्षण नोकरी

साभाळून फावल्या वेळात स्वत च अभ्यास करून यश सपादावे लागले त्याकाळी हल्लीप्रमाणे क्लासेस्ची पद्धत नव्हती म्हणून "कमवा आणि शिका" हे फार कठीण जात असे

## विवाह व संसार

१९४५ च्या जुलैमध्ये माझी मुबईहून झाशीला बदली झाली ऑक्टोबरमध्ये एक आठवड्याच्या रजेवर पुण्यात आलो असताना माझा विवाह कु नलिनी लेले हिच्याशी ठरला व त्याच वर्षी शेवटच्या दिवशी व शेवटच्या मुहूर्तावर (३१ डिसेंबर १९४५, गोरज मुहूर्त) पुण्याच्या गोखले हॉलमध्ये आम्ही विवाहबद्ध झालो पुढच्या वर्षी झाशीहून माझी बदली भुसावळला झाली तेथे आम्ही नोव्हेंबर १९४७ पर्यत राहिलो

## जयंतचे शिक्षण आणि विवाह

जयतचा जन्म पुणे येथे २६ जानेवारी १९४९ रोजी झाला त्याचे शालेय व कॉलेजचे शिक्षण दिल्ली येथे होऊन त्याने दिल्ली युनिव्हर्सिटीची कॉमर्सची डिग्री सपादन केली पुढे उच्च शिक्षणासाठी त्याने इग्लडमध्ये वॉटफर्ड युनिव्हर्सिटीत प्रवेश घेतला आणि ॲड्व्हरटायझिंग व मार्केटिंगचे डिप्लोमे सपादन केले नतर ट्रेनिंगसाठी कॅनडात गेला व त्यानतर आमच्याबरोबर सान साल्व्हाडोरमध्ये राहून एक वर्ष एका अमेरिकन ॲड्व्हरटायझिंग कपनीत नोकरीही केली पुढे आम्ही पुण्यात स्थायिक व्हावयाचे ठरवले तेव्हा जयतने पुण्यात प्रतिभा ॲड्व्हरटायझिंगमध्ये काम सुरू केले नंतर त्याने स्वत चा प्लॅस्टीक कारखाना भोसरी येथे सुरू केला डिसेंबर १९७७ मध्ये कु ज्योती देवळी-राव हिच्याशी त्याचा विवाह झाला त्यावेळी ज्योती एम् कॉम झाली होती पुढील दोन-तीन वर्षांत तिने Financial Management हा विषय घेऊन डॉक्टरेट मिळवली ती जयतला त्याच्या धद्यात नेहमी साथ देत असते

त्याना कविता व मधुरा नावाच्या दोन कन्या आहेत

## अंजलीचे शिक्षण आणि विवाह

अंजलीचा जन्म विलेपार्ले, मुबई येथे ३ सप्टेंबर १९५३ रोजी झाला पुढे १९५६ मध्ये माझी बदली दिल्लीला झाल्यामुळे आम्ही सर्व दिल्लीस गेलो तिचे शालेय शिक्षण दिल्लीच्या सेंट थॉमस स्कूलमध्ये झाले बारावीची परीक्षा चागल्या तऱ्हेने पास झाल्यानतर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये १९७० मध्ये तिने प्रवेश घेतला. त्यावेळी ती त्याच कॉलेजच्या वसतिगृहात राहात असे

तिचे कॉलेजचे पहिले वर्ष पूर्ण झाले तेव्हा जून १९७१ मध्ये युनोतर्फे माझी दक्षिण अमेरिकेत पाराग्वे या देशात 'सल्लागार' (Adviser) म्हणून नियुक्ती झाली. आम्ही कॉलेजच्या अधिकाऱ्याना विनती केल्यावरून त्यानी अजलीला एक वर्ष कॉलेजमधून रजा दिली व अजलीसह आमच्या सौ व मी, विमानाचा बारा हजार मैलाचा प्रवास करून असुनसिऑन येथे पोहोचलो वाटेत कुवेत, अथेन्स, झूरिक, जिनीव्हा, पॅरीस व रिओ-डी-जानिआरो येथे थाबून ती शहरे पाहिली व असुनसिऑनला पोहोचलो

पाराग्वेमध्ये लोकाना इग्रजी अजिबात येत नाही सर्वत्र फक्त स्पॅनिश भाषाच वापरली जाते थोड्याच महिन्यात अजली बऱ्यापैकी स्पॅनिश शिकली. तीन सप्टेंबर १९७१ रोजी आम्ही तिचा अठरावा वाढदिवस घरी साजरा केला तेव्हा तिने १५ मैत्रिणी बोलावल्या होत्या असुनसिऑनहून आम्ही अर्जेंटिनाची राजधानी ब्यूनॉस आयरिस, बीच सिटी मार देल प्लाता, ब्राझीलमधील जगप्रसिद्ध इग्वासूचा धबधबा, सान होसे द कापोस हे रिसर्च लॅबोरेटरीज असलेले शहर, इत्यादि ठिकाणी अजलीसह गेलो होतो.

मे १९७२ मध्ये ती **एकटी** भारतात परत आली येताना

लडन, फ्रँकफूर्ट, जिनिव्हा या ठिकाणी ती उतरली इतक्या लहानपणी म्हणजे वयाच्या अठरा-एकोणिसाव्या वर्षी एवढे जग पाहिल्यामुळे तिच्या वागण्यात व दृष्टीत खूपच चागला फरक झाला

३१ मार्च १९७३ रोजी मुबईच्या कॅम्लीन कपनीचे श्री दिलीप दिगबर दाडेकर याच्याशी तिचा विवाह दादर वनीता समाजात साजरा झाला त्याच वर्षी पुढे जूनमध्ये ती बी ए ची परीक्षा ही पास झाली तिला केतकी, अदिती या दोन मुली व राहुल हा मुलगा आहे दिलीप स्वत अत्यत कर्तृत्ववान असून कॅम्लीनच्या भरभराटीत त्याचा सिंहाचा वाटा आहे

अजलीने नेटका ससार करून धद्यातही स्वतःचे स्वतत्र स्थान निर्माण केले होते सर्व आप्तेष्ट, तसेच नोकर वर्गातील लोकाना आपलेसे करून, १२ डिसेंबर १९९३ रोजी इहलोकाची यात्रा सपवून आणि आम्हा सर्वांना सोडून तिने परलोकी गमन केले

## सिव्हिल एव्हिएशन

शिक्षणात आलेल्या अनेक व्यत्ययामुळे मला प्रथम श्रेणी ऑफिसर्सच्या परीक्षेला कधीच बसता आले नाही परतु सुदैवाने ती उणीव फेडरल सर्व्हीस कमिशनबरोबर झालेल्या मुलाखतीमुळे (Interview) लवकरच भरून निघाली व सिव्हिल एव्हिएशन डिपार्टमेंटमध्ये प्रथम श्रेणीच्या टेक्निकल ऑफिसरच्या हुद्यावर माझी नेमणूक १९४७ च्या नोव्हेंबर महिन्यात झाली वास्तविक ही मुलाखत एप्रिल १९४७ मध्ये म्हणजे स्वातत्र्य मिळण्यापूर्वी चार महिने झाली होती. त्यानंतर दिल्लीच्या सर्व कचेऱ्या भारत विभाजनाच्या कागदपत्र वाटपामध्ये गुतलेल्या होत्या पुष्कळ कागदपत्रे गहाळही झाली होती मुलाखतीनतर दोन-तीन महिन्यात काही बातमी नाही म्हणून मी जवळ जवळ आशाच सोडली होती १५ ऑगस्टला

भारत स्वतंत्र झाला व खूपसे कागदपत्र दिल्लीहून पाकिस्तानात गेले सुदैवाने आमची फाईल दिल्लीत सुखरूप होती व नोव्हेंबरमध्ये माझ्या नेमणुकीचे पत्र भुसावळच्या रेल्वे कचेरीत आले भुसावळचे बिऱ्हाड बंद करून, आमच्या सौ ना पुण्याला सोडून मी एकटाच दिल्लीमार्गे उत्तर प्रदेशात सहारणपूरच्या सिव्हिल एव्हिएशनच्या ट्रेनिंग सेंटरमध्ये 'टेक्निकल ऑफिसर' म्हणून रूजू झालो. त्यावेळी सहारणपूरला मुसलमान वस्ती खूपच असल्यामुळे फारच अस्थिर वातावरण होते.

पुढे एक महिन्यानंतर आमच्या सौ ना घेऊन माझे वडील पुण्याहून दिल्लीला आले त्यावेळी उत्तरेत गाड्या अगदीच थोड्या होत्या व त्यात प्रचड गर्दी होती अर्धी अधिक माणसे डब्याच्या टपावरूनच प्रवास करीत होती. सहारणपूरच्या गाडीत फक्त बायकाच्या फर्स्ट क्लासमध्ये आमच्या सौ ना जेमतेम सामानसह प्रवेश मिळाला पण वडिलाना कोठेच शिरता आले नाही म्हणून सौ एकट्याच सहारणपूर स्टेशनवर सध्याकाळी चार वाजता पोहोचल्या व मला ऑफिसमध्ये फोन केला दोन तासानी दुसरी गाडी दिल्लीहून आली व त्यात माझे वडील आले. आमची तिघाची भेट झाल्यावर हायसे वाटले. त्यावेळचे तेथील वातावरण अगदीच अस्थिर व भयाण असल्यामुळे आम्ही सुटकेचा निश्वास टाकला पुढे दीड वर्षांनी आमची बदली दिल्लीला झाली तेथून दीड वर्षांनतर मुबईला साताक्रूझ विमानतळावर रिजनल कट्रोलरच्या ऑफिसमध्ये १९५२ मध्ये बदली झाली

मुबईत असताना मला गुजरात, काठेवाड येथील सर्व विमानतळाना भेटी देण्यासाठी वरचेवर जावे लागे तेव्हा द्वारकेचे सोमनाथाचे देऊळही पाहता आले माझ्या रोजच्या ऑफिसच्या कामाचा एक विशेष भाग म्हणजे इडियन एअरलाईन्स व एअर इडियाच्या सर्व विमानाच्या रेडिओ

उपकरणाची तपासणी दरवर्षी जमिनीवर व हवेत उड्डाण केल्यावर करावी लागे यामुळे वरचेवर विमान प्रवास वाढू लागला एअरपोर्टवरील सर्व रेडिओ उपकरणेही तपासावी लागत व मधून मधून ती मापन करावी लागत त्यामुळे भारतीय व परकीय विमान कपन्याशी सबध वाढू लागले मनातल्या मनात असे वाटू लागले की आपले या विषयातील ज्ञान बरेच कमी पडत आहे व काहीतरी करून अजून प्रात्यक्षिक उच्च शिक्षण मिळविले पाहिजे सरकारतर्फे परदेशी शिक्षण मिळविण्यासाठी माझा क्रम लागायला निदान पाच-सहा वर्षे तरी लागतील असे दिसल्यावर रजा घेऊन स्वखर्चाने मी इग्लडला व युरोपला जाण्याचे ठरविले सुदैवाने सरकारने याला आडकाठी आणली नाही

## इंग्लंडची पहिली सफर

इग्लडला जाण्याचे ठरविल्यानतर, तिकडे मला काय काय शिकायचे आहे त्याचे तपशीलवार पत्र लडनमधील भारतीय राजदूत कार्यालयातील शिक्षण अधिकाऱ्याना पाठविले हेतू हा की मी तिथे जाईपर्यंत ते योग्य ठिकाणी सपर्क साधून माझ्या प्रॅक्टिकल शिक्षणाची सोय करतील शिवाय माझ्या माहितीच्या दोन-तीन ब्रिटीश कपन्याकरवी त्यांच्या हेड ऑफिसला इग्लडमध्ये पत्रे पाठविली होती मुबईहून पी अँड ओ च्या स्ट्रॅथमूर नावाच्या २४ हजार टनी बोटीने २ जून १९५६ ला मी प्रयाण केले वाटेत बोट एडन, सुवेझ, मारसेल्स व जिब्राल्टर येथे थाबून २१ जूनला लडनला पोहोचली एक-दोन दिवसात राहण्याची सोय करून मी भारतीय राजदूताच्या कचेरीत शिक्षण अधिकाऱ्याना भेटलो व पुढच्या शिक्षणाची त्यानी काय सोय केली आहे याची विचारणा केली

ते शिक्षण अधिकारी महाराष्ट्रीयन होते मला पाहताच

मोठ्या रुबाबाने आबट चेहरा करून मला सागू लागले की, ''तुम्ही इकडे का आलात ? असली शैक्षणिक व्यवस्था करावयाला निदान सहा महिने तरी लागतात व सागू लागले की तुमचे पैसे व वेळ वाया घालविता आहात. भारतात या गोष्टींची जाणच नाही,'' वगैरे. तो पर्यंत मी उभाच होतो. त्याचे बोलणे झाल्यावर त्याच्या समोरची खुर्ची जोरात ओढून त्यावर बसलो व त्याना चार गोष्टी सुनावल्या व त्याची रजा घेतली. या सर्व घटनेने मी थोडा खचून गेलो पण आशावादी असल्यामुळे नवीन प्रयत्नांना सुरूवात केली दुपारी जेवण झाल्यावर मार्कोनी कपनीतील ऑफिसरना (ज्यांना हिंदुस्तानातून आधी पत्र पाठविले होते त्याना) फोन करून मी लडनला आल्याचे सागितले. त्यानी फोनवर हसत व उत्साहाने माझे स्वागत केले व दुसरे दिवशी सकाळी ऑफिसमध्ये या म्हणून निमत्रण दिले

दुसऱ्या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे साडेनऊ वाजता मी ऑफिसमध्ये गेलो कॉफी घेता घेता त्याने मला काय हवे होते ते समजावून घेतले मार्कोनी कपनीचे मुख्यालय व फॅक्टरी लंडनपासून ५० मैलावर चेम्सफोर्ड येथे आहे. ताबडतोब त्यांनी फोन करून माझ्या शिक्षणाची सहा आठवड्यांची व्यवस्था केली व दोन-तीन दिवसात माझी गाडी रुळावर आली. केवढा हा फरक !

पुढे केंब्रिजमध्ये 'प्लेसी' नामक कपनीत तीन आठवडे, ब्रिटीश सिव्हील एव्हिएशनमध्ये दोन आठवडे इत्यादि ठिकाणी मी माझ्या शिक्षणाची सोय करून घेतली. परतीच्या प्रवासात फ्रान्स व जर्मनीत १० दिवस काम करून इटलीतील जिनोआ बदरात व्हिक्टोरिआ बोटीने प्रवास सुरू केला त्या प्रवासाचे वर्णन पुस्तकात दुसरीकडे केलेले वाचकाना आढळेल मुबईला परत आल्यावर माझी बदली पुन्हा दिल्लीला झाली.

## संचार मंत्रालयात नेमणूक

दिल्लीत परत आल्यावर यू.पी.एस्.सी तर्फे माझी निवड सचार मत्रालयात 'असिस्टट वायरलेस-ॲड्व्हायजर' म्हणून जानेवारी १९५७ मध्ये झाली पुढे १९६३ मध्ये मला एक महिना जपान व तीन महिने अमेरिकेत शिक्षणासाठी फेलोशिप मिळून पहिली पृथ्वी प्रदक्षिणा करता आली

दिल्लीतील माझ्या कामाचे स्वरूप जरा वेगळे आणि व्यापक असे होते त्यातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे भारतात जे जे सरकारी अगर बिन-सरकारी विभाग वायरलेसचा उपयोग करतात त्याच्या रेडिओ फ्रिक्वेन्सी वापरासबधी समन्वय साधणे व त्याच्यावर देखरेख ठेवणे अशा अर्थी होता त्यात डिफेन्स, ए आय् आर , टी व्ही , पोलीस, रेल्वे, वगैरे सरकारी खाती शिवाय तेल कपन्या, रेडिओ अमॅच्युअर्स, इलेक्ट्रिसिटी बोर्डस् याचा समावेश होता

आतरराष्ट्रीय रेडिओ क्षेत्रात समन्वय साधणे व निरनिराळ्या रेडिओ कॉन्फरन्सीस् मध्ये भारताची बाजू माडून देशाच्या हिताचे सरक्षण करणे हा कामाचा आणखी एक महत्त्वाचा भाग होता यासाठी मधूनमधून जिनिव्हा व इतर देशात होणाऱ्या कॉन्फरन्सीस व कमिशनमध्ये भाग घेण्यासाठी परदेशी जावे लागे ही कामे विशेष जोखमीची असत. भारताचे हितशत्रू शोधून काढणे व वेळीच त्याच्या कारवायाचा बदोबस्त करणे आवश्यक असते अशाच हुद्यावर असताना मी ज्या परीक्षेसाठी वीस वर्षांपूर्वी कलकत्त्याला गेलो होतो त्या परीक्षेचा प्रमुख परीक्षक झालो ही परीक्षा पास होण्यासाठी नवीन नियमानुसर सर्व पायलट, नॅव्हिगेटर यानाही परीक्षेस बसावे लागत असे त्यावेळी पास झालेले हे पायलट नतर मोठ्या बोईंग विमानाचे कमाडर झाले आहेत व ते मला प्रवासात अजूनही भेटतात



सौ ज्योती व श्री जयत गोगटे. (पृष्ठ १३६)

सौ अंजली व श्री दिलीप दाडेकर (पृष्ठ १३७)



सरकारी नोकरीत जागा रिकाम्या होतील त्याप्रमाणे पदोन्नती होत असते. १९६९ मध्ये मला सर्वात वरची जागा म्हणजे Wireless Adviser to Government of India मिळाली. दरम्यानच्या काळात १९६७ मध्ये UNESCO चे एक शिष्टमडळ सॅटलाईट टी व्ही. वरून शिक्षण या विषयाची चर्चा करण्यासाठी भारतात आले होते त्या शिष्टमंडळाशी चर्चा करण्यासाठी भारतातर्फे माझीही नियुक्ती झाली होती. तेव्हा डॉ. विक्रम साराभाईंच्या बरोबर आमच्या बऱ्याच मुलाखती होत असत सध्या आपण जो भारताचा इन्सॅट २ बी - टी. व्ही व दळणवळणासाठी वापरतो त्या प्रकल्पाची पायाभरणी सुमारे वीस वर्षांपूर्वी आमच्या या समूहाने केली होती.

## यूनो आणि विकसनशील देशांना सहाय्य

दुसऱ्या महायुद्धानंतर १९४७ साली युनायटेड नेशन्स या सस्थेची, जगात शांतता राखण्यासाठी नव्याने न्यूयॉर्कमध्ये स्थापना करण्यात आली भारत हा देश अगदी प्रथमपासून या सस्थेचा सभासद असून नेहमी फार महत्त्वाची भूमिका बजावीत आला आहे जरी प्रथम यू. नो. ची स्थापना जगात राजकीय स्थैर्यासाठी झाली होती तरी दिवसेंदिवस या सस्थेचे इतर क्षेत्रातही हातपाय पसरू लागले यूनोच्या आधी स्थापन झालेल्या आतरराष्ट्रीय सघटना म्हणजे आय टी. यू., यू. पी, यू., आय् एल्. ओ वगैरे संस्था आपापल्या क्षेत्रात काम करीत होत्याच या सर्व सघटनांचेही जगातील बहुतेक तीच राष्ट्रे सभासद होती या सर्वांच्या कामात सुसूत्रता यावी म्हणून सर्व देशांनी असे ठरविले की या सर्व सस्था युनोच्या छत्राखाली आणाव्यात. विकसनशील (Developing) देशाना तांत्रिक, आर्थिक, व शैक्षणिक सहाय्य मिळावे म्हणून युनोने एक आपलाच नवीन भाग स्थापन केला व त्याला युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्रॅम (यू.एन् डी.पी ) म्हणून नाव दिले. त्यामुळे यू.एन ची मुख्य कचेरी जगातील शांतता कायम राखण्याचे

काम करू लागली व यू.एन् डी पी. विकसनशील देशाना वर निर्देशित केलेल्या स्पेशलाईझ्ड एजन्सीद्वारे मदत करू लागली अशा एजन्सीज् आता प्रत्येक क्षेत्रात काम करू लागल्यामुळे हा व्याप खूपच वाढला आहे

यापैकी माझा सबध **इटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियन** (आय टी यू. ITU) जिनिव्हा, व इटरनॅशनल मॅरिटाईम ऑर्गनायझेशन (आय एम् ओ IMO) लडन, याच्याशी १९७१ पासून येऊ लागला

## आय. टी. यू. म्हणजे काय ?

वरील प्रश्न मला पुष्कळ लोकानी आतापर्यंत केला त्याचे थोडक्यात उत्तर असे -

आय टी यू ही सस्था १८६५ मध्ये प्रथम जेव्हा टेलिग्राफ दळणवळण चालू झाले तेव्हा युरोपमधील वीस राष्ट्रानी पॅरिस येथे स्थापन केली पुढे काही वर्षांनी ही मुख्य कचेरी जिनिव्हा (स्वित्झर्लंड) मध्ये हलविण्यात आली या विज्ञानात पुढे टेलिफोन, वायरलेस, रेडिओ, टी व्ही याची प्रगती झाली व आतरराष्ट्रीय दळणवळण सुसूत्रपणाने व्हावे म्हणून आय टी यू. या विषयात सर्वत्र काम करू लागली पुढे मायक्रोवेव्ह, उपग्रहामार्फत दळणवळण, उपग्रह टी.व्ही इत्यादी आधुनिक व नवीन तत्राचा वापर सुरू झाला. या क्षेत्रात इतकी झपाट्याने प्रगती होत गेली की बऱ्याचशा विकसनशील देशाना तशी प्रगती करता आली नाही व ते जगाच्या मागे पडू लागले याचे मुख्य कारण म्हणजे अत्याधुनिक तात्रिक शिक्षणाचा अभाव व पैशाची चणचण यामुळे या दोन पातळींवरच्या देशांमधील दरी वाढू लागली

या उणीवा भरून काढण्यासाठी हे देश आय टी यू. कडे तत्रज्ञांची व आर्थिक मदत घेऊ लागले यू.एन डी पी च्या सहाय्याने आय टी यू. ने या मदत कार्यास चालना दिली व

आमच्या सारख्या तत्रज्ञाची निवड करण्यास सुरूवात केली

## तंत्रज्ञांची निवड कशी करतात ?

जेव्हा एखाद्या देशाला एखाद्या दळणवळण तत्राची प्रगती करण्याची जरूरी भासते तेव्हा तो देश आपल्या पुढे काय प्रश्न आहेत याची सविस्तर माहिती आय.टी यू. कडे पाठवितो पुष्कळदा जिनिव्हाचे ऑफिसर अशा देशाना भेटी देतात तेव्हा या गोष्टींचा उहापोहही होतो व मदतीची चक्रे फिरू लागतात उदाहणार्थ -माझी जेव्हा आय टी यू. तर्फे म्हणजेच युनोतर्फे १९७१ मध्ये निवड झाली तेव्हा ती कशी झाली ते पाहू या

पराग्वे देशात रेडिओ व वायरलेसचा वापर गेली कित्येक वर्षे वाढत होता व तो शिस्तबद्ध रीतीने न झाल्याकारणाने तेथील रेडिओ फ्रिक्वेन्सीच्या वाटपात बरेच घोटाळे निर्माण झाले होते या बाबतीतील कायदे करण्याची व सुव्यवस्था लावण्याची फारच आवश्यकता त्या देशाला भासू लागली व सर्व डिपार्टमेंटवर देखरेख ठेवण्यासाठी उपाय योजण्याची त्या सरकारला जरूरी भासू लागली हे सर्व काम करण्यासाठी त्या देशाकडे हवे ते तत्रज्ञान व तत्रज्ञ नव्हते व आवश्यक त्या उपकरणासाठी पैसाही नव्हता ही सर्व हकीकत त्यानी आय.टी यू. ला कळवली त्यावर आय टी यू. व यू.एन् डी पी यानी मिळून त्या देशाला एक योग्य तत्रज्ञ व उपकरणासाठी मदत देण्याचे आश्वासन दिले

त्यासाठी प्रथम आय टी यू. ने एक जाहिरातवजा पत्रक तयार केले त्यात पराग्वे देशाला कशा तऱ्हेचा तत्रज्ञ पाहिजे, त्याच्या कामाची रूपरेषा, नोकरीची मुदत, पगार वगैरे माहिती देऊन ते पत्रक सर्व राष्ट्रांना पाठविले तसे आय टी यू. चे पत्र भारत सरकारकडे जानेवारी १९७१ मध्ये पोहोचले. भारत सरकारने हे पत्रक दिल्लीला सरकारी डिपार्टमेंटस्ना पाठवून

योग्य उमेदवारांचे अर्ज मागवले. यासाठी मीही अर्ज केला होता. दिल्लीत सर्व अर्जांची छाननी होऊन माझी निवड झाली व माझा अर्ज जिनिव्हाला गेला ही पहिली चाळणी

भारताप्रमाणे इतर देशानी देखील आपल्या इच्छुक तत्रज्ञाची नावे व त्याचे अर्ज आय टी.यू.कडे पाठविले त्यात स्पेन, फ्रान्स, इटली, ब्रिटन, जर्मनी वगैरे देशाचे अर्जदार होते. या सर्व अर्जांची छाननी आय.टी यू. च्या एका कमिटीने करून त्यातील दोन अर्जदाराची निवड केली त्या निवडीत एक माझेही नाव होते ही झाली दुसरी चाळणी

आय टी यू. ने. ही दोन नावे पराग्वे सरकारकडे पाठवून त्यातील एकाला पसत करा म्हणून सुचविले त्या देशातील अधिकाऱ्यानी दोन्ही अर्ज पाहून माझी निवड केली ही तिसरी चाळणी असा हा तत्रज्ञ निवडीचा प्रकार इतर विषयातील तत्रज्ञाची आय.टी यू. अशाच प्रकारे निवड करीत असे अशा तऱ्हेने निवड झाल्याची तार मला भारत सरकारतर्फे मिळाली व आम्ही पराग्वेला प्रयाण केले त्यानतर आजतागायत मी सतत प्रवास करीत आलो आहे

## निवृत्ती नंतरचा व्यवसाय

६५ व्या वर्षी निवृत्ती घेतल्यानतर, सुदैवाने प्रकृती चागली राहिल्यामुळे मला पेन्शनर प्रमाणे स्वस्थ आराम करणे जमेल असे वाटेनासे झाले म्हणून मी Computer चे पुढील शिक्षण घेण्यास सुरुवात केली एक वर्षानतर अमेरिकेत जाऊन IBM चा त्या वेळचा उत्तम पर्सनल कॉम्प्यूटर खरेदी करून पुण्यात बसविला व माझ्या आवडीच्या तात्रिक विषयाचे सॉफ्टवेअर पॅकेजेस् तयार करू लागलो. तरुण मुलाच्या बरोबरीने काम केल्याचा आनदही मिळू लागला अजून काही दिवस तरी असेच काम चालू ठेवण्याचा इरादा आहे या नवीन कामामुळे अधून-मधून परदेशाच्या वाऱ्या कराव्या लागल्या

तोही एक आनंदाचाच भाग होता.

आता मागे वळून पहाता असे वाटते की फळाची फार हाव न धरता आपण जर कर्म करीत राहिलो तर यश उशिरा का होईना, पदरात पडतेच उतार वयात हरीभक्तीपासून मनुष्याला जसा आनद प्राप्त होतो तसाच आनंद आपल्या आवडत्या छदात एकरुप होऊनही मनुष्याला मिळू शकतो. असा छद मात्र निरुपद्रवी व इतराना त्रास न होईल असा असावा. अशा एखाद्या छदात मग्न झालेल्या माणसाला मानसिक आनद तर मिळतोच पण त्याची इतरत्र बघण्याची दृष्टीही थोडी विशाल होते. तो बारीकसारीक, न आवडणाऱ्या गोष्टींकडे कानाडोळा करून जास्त महत्त्वाच्या बाबींकडेच लक्ष पुरवतो यामुळे आसपासच्या लोकाना सुख लागून तो स्वत ही सुखी होतो

❖

REFBK-0027494



आर्क्टिक महासागर
शून्य रेखा (मेरिडियन)
ग्रीनलंड
अलास्का (सं सं)
उत्तर अमेरिका
ओटावा
वाशिंगटन
मेक्सिको सिटी
वेस्ट इंडिज
आंतरराष्ट्रीय तिथिरेषा
दक्षिण अमेरिका
बोगोटा
कॅराकस
लिमा
बोलिव्हिया
ब्राझिलिया
सँटियागो
ब्युनॉस आयर्स
माँटेव्हिडिओ
पोर्तुगाल
लिस्बन
स्पेन
लंडन
पॅरिस
डब्लिन
डेन्मार्क
कोपनहेगन
पोलंड
वॉर्सा
स्टॉकहोम
हेलसिंकी
मॉस्को
बुखारेस्ट
काळा समुद्र
अंकारा
अल्जीरिया
लीबिया
इजिप्त
आफ्रिका
नायजर
मॉरिटानिया
माली
सेनेगल
गांबिया
गिनी
नायजेरिया
लागोस
सुदान
खार्टूम
आदिस अबाबा
इथिओपिया
मोगादिशु
केनिया
नैरोबी
टांझानिया
अंगोला
लुआंडा
झांबिया
लुसाका
बोट्स्वाना
विंडहुक
दक्षिण आफ्रिकेचे प्रजासत्ताक
केपटाउन
तनानारिव
सौदी अरेबिया
रियाध
बगदाद
तेहरान
काबूल
इस्लामाबाद
पाकिस्तान
दिल्ली
अरबी समुद्र
बंगालचा उपसागर
श्रीलंका
कोलंबो
सोवियत रशिया
आशिया
उलान बटोर
मंगोलिया
चीन
बिजिंग
कोरिया
रंगून
थायलंड
बँकॉक
हनोई
हाँगकाँग
फिलिपाइन्स
मनिला
क्वालालंपूर
मलेशिया
जाकार्ता
न्यू गिनी
विषुववृत्त
हिंदी महासागर
ऑस्ट्रेलिया
कॅनबेरा
न्यूझीलंड